द.व्यं.जहागीरदार



# अमेरिका

## एक तंत्रज्ञानाने झपाटलेला देश

म. ग्रं. सं. ठाणे
विषय भूप्रवास
सं. क्र. ६४८

REFBK-0024217

९४८
२४२१७
६।७।९४

# अमेरिका : एक तंत्रज्ञानाने झपाटलेला देश

डॉ. द. त्र्यं. जहागिरदार

REFBK 0024217
REFBK-0024217

अमेय प्रकाशन

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदानप्राप्त

अमेय : प्रवासवर्णन

प्रकाशन क्रमांक : त्रेसष्ट

प्रथम आवृत्ती : १४ एप्रिल १९८३ गुढीपाडवा

© द. व्यं. जहागिरदार, मराठवाडा विद्यापीठ परिसर, औरंगाबाद ४३१ ००४

प्रकाशक : मनोहर पिंपळापुरे
अमेय प्रकाशन, २ विजयानन्द बिल्डिंग, नेहरू मार्ग, धनतोली, नागपूर ४४० ०१२

मुद्रक - म. पां. वनहट्टी
नारायण मुद्रणालय, २२४ टिकेकर रोड, धनतोली, नागपूर ४४० ०१२

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

किंमत : वीस रुपये

शंभर मैल दूर असूनही ज्यांची शेवटची भेट शक्य झाली नाही वे
दहा हजार मैल दूर असल्यामुळे जिची शेवटची भेट अशक्य झाली
त्या माझ्या आईवडिलांना
ती. कै. दादा व ती. कै. वहिनीस–
सादर समर्पण.

# प्रास्ताविक

अमेरिका म्हणजे अमाप श्रीमंती. सारा समाज स्वैराचारी. पिण्याची तेथे मजाच मजा, जिकडे तिकडे नाइट क्लब्स, रात्रीच्या जुगाराचा गोंधळ अशा प्रकारची अमेरिकेची प्रसिद्धी आपल्या साहित्यात पुष्कळ वेळा वाचण्यात आली. काही विचारवतांनी तेथील सचोटी व परिश्रमाबाबत लिहिले होते तेही वाचले होते तेथे दोन वर्षे वास्तव्य केल्यावर मनावर बिंबला तो तेथील कष्टाळू विद्यार्थी व सुजाण नागरिक त्यांचीच ही कथा ! परदेशात विशेषतः अमेरिकेत सशोधन करण्यास, उच्च डिग्री मिळविण्या साठी जाणाऱ्या तरुणांना तेथील विद्यापीठांची व तंत्रज्ञानाच्या अचाट झेपेची माहिती द्यावी म्हणून हे प्रयोजन जे दिसले ते लिहिले आहे. गोष्टी रजक करण्यासाठी स्वतःचा मालमसाला वापरलेला नाही. हे आहे एका विज्ञानप्रेमी माणसाचे शास्त्रीय अवलोकन, कुठलेही भिंग न लावता केलेले !

महाराष्ट्र राज्य साहित्य सस्कृती मडळाने १९८१ साली नवलेखकांना अनुदान या योजनेच्या अंतर्गत या हस्तलिखितास प्रसिद्धीसाठी रु. १७०० अनुदान दिले याबद्दल मंडळाचे मी आभार मानतो अमेय प्रकाशन नागपूरचे श्री. मनोहरराव पिंपळापुरे, विद्या बुक्स औरगाबादचे श्री. वसंतराव पिंपळापुरे यांच्या कष्टाचे तसेच नारायण मुद्रणालयाचे श्री. म पां. बनहट्टी यांनी केलेल्या सहकार्याचा ऋणनिर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो

वर्षप्रतिपदा, शके १९०५
१४ एप्रिल १९८३

द. व्यं. जहागिरदार

## अनुक्रम


१ डॉगवुड आणि पिकनिक्स / ४

२ मुंबई ते अटलांटा / ९

३ प्रवास आणि संशोधन / १३

४ शाळा आणि विद्यापीठ / २१

५ तंत्रज्ञानाची झेप आणि कम्प्युटरच्या लीला / ३६

६ टी. व्ही. आणि रेडिओ / ५४

७ कुटाळू आणि निःसंकोची समाज / ६९

८ अमेरिकेतील भारतीय / १०१

९ चटका लावून गेलेले प्रसंग / ११४

क्र. ... प्रवास ... शाखा (स्थळ

# १. मुंबई ते अटलांटा

शुक्रवार तारीख सात आक्टोबर १९७७ मुंबईला संध्याकाळी पाऊस हत्तीच्या सोंडेने कोसळला रात्री नऊ वाजता पाऊस जरासा थांबला. निसर्गाचे रौद्र रूप पाहिले की मनाची प्रसन्नता क्षणकाल विचलीत होते. साधं परगावी जायचे तर मनाची अशी अवस्था होते येथे तर दहा हजार मैल दूर जायचे होते

सिंगापूर एअरलाइन्सचे विमान दोन अडीच तास उशीरा येणार होते. एअरइंडियाची न्यूयॉर्कची फ्लाइट निघून गेली होती पॅसेंजर लाउंज क्षीण झाला होता सिंगापूरने जाणारे आम्ही आठ-दहा जण असू. औरंगाबाद-मुंबई प्रवासाचा शीण, मुंबईला पुनः सर्व नातेवाईकांना भेटण्यासाठी उगाच केलेली धावाधाव यामुळे रात्रीचा दीड वाजला होता आणि झोप आवरत नव्हती सोळा ऑगस्टला फेलोशिप मिळाल्याचे तारेने समजले होते तोच क्षण आणि तोच दिवस खरा आनंदाचा अवघ्या दीड महिन्यात पासपोर्ट, व्हिसा, सर्व झाले होते पण घरच्या सर्वांना सोडून दीर्घकाळ परदेशी राह्यच हा विचार मागील पाच-सात दिवसात सतत डोके वर काढत होता' परदेशी जाताना मानसिक तयारी फार महत्त्वाची ती झाल्यासारखी वाटत होती म्हणूनच एअरपोर्टवर आईचा, पत्नीचा, मुलांचा, भावांचा, मित्राचा व विद्यार्थ्यांचा निरोप घेताना अगदी हसरी मुद्रा ओढून ताणून आणली होती. माझ्यापेक्षा धैर्य दाखविले ते आईने कॅन्सरचे ऑपरेशन होऊन जवळपास एक'वर्ष झाले होते पण तिने केव्हाही लवकर परत ये असे म्हटले नव्हते तिचे एकच म्हणणे होते, खूप काम कर व येताना सर्व देश पाहून ये, कारण असा योग पुनःपुन. मिळत नाही 'बरंय येतो' असं तिला सांगताना तिच्या डोळ्यातील अश्रू मला स्पष्ट दिसलेत उगाच तिचे सांत्वन वगैरे करण्याची आवश्यकता असूनही मी मनाला आवर घातला....

....डोळयात पाणी आलेला तिचा चेहरा हेच तिचे शेवटचे दर्शन .

सिंगापूरच्या जम्बोच्या आगमनाची अनाउन्समेंट झाली एअरपोर्ट बसमध्ये जाऊन बसलो त्यानतर विमानात झोप केव्हा लागली ते समजले नाही जाग आली तेव्हा जम्बो दुबाईला उभे होते तेथून मग अथेन्स आणि मग लंडनच्या वेळेप्रमाणे दुपारी अकरा वाजता लडन लंडनला TWA ची फ्लाइट घेतली न्यूयॉर्कच्या वेळेनुसार दुपारी चार वाजता केनेडी एअरपोर्टवर केनेडी एअरपोर्ट जगातले सर्वात मोठे आणि सर्वात गजबजलेले, पण पहिल्या प्रवासाच्या मानसिक ओढाताणीमुळे त्याची भव्यता त्यावेळेस जाणवलीच नाही. पुढील दोन वर्षात काही कारणांनी तीन–चार वेळा हा एअरपोर्ट पाहणे झाले, कारने संपूर्ण एअरपोर्ट पालथा घातला तेव्हा त्याची भव्यता समजली. दुपारी दोनपासून रात्री अकरा-पर्यंत साधारण दर एक मिनिटाला तेथे एक विमान उतरते व एका विमानाचे उड्डाण होते. उडणारी विमाने रनवेच्या एका टोकाला येऊन उभी राहतात तेव्हा प्रत्येक विमानाच्या मागे दहा–बारा विमाने उभी असतात, जगाच्या कानाकोपऱ्यात जाण्यासाठी तैय्यार ! आपल्याकडे नागपूर, पुणे मध्यवर्ती बसस्थानकावर जितक्या बसेस तितकी येथे विमाने व औरंगाबाद शहराएवढा या एअरपोर्टचा विस्तार

रात्री साडेनऊ वाजताची न्यूयॉर्क–अटलाटा ही इस्टर्न एअरलाइन्सची फ्लाइट मिळाली बरोबर अकरा वाजून पधरा मिनिटांनी विमान अटलां-टाच्या हार्टस्फिल्ड विमानतळावर उतरले होते. ' जागीरदारची वाट पाहत डॉ हाफकिन्स बाहेर उभे आहेत ' अशी विमानातच अनाऊंसमेंट झाली पायऱ्या उतरायला लागलो खाली 'इस्टर्न'ची माणसे छत्र्या घेऊन उभी होती. मुबईचा ' तो पाऊस ' पुनः अटलांटाला हजर झाला होता

सुटकेस घेतल्यात प्रोफेसर हॉफकिन्स भेटलेत मला घेण्यासाठी रात्री बारा वाजता ते एअरपोर्टवर वीस मैलांचा ड्राइव्ह करून आले होते

' ही माझी बायको, जेन.' कारच्या स्टीयरींगवर बसलेल्या जेनची प्रोफेसरांनी ओळख करून दिली.

मी मागच्या सीटवर जाऊन बसलो....
दरवाजा घट्ट बंद केला ...
कार वेगाने घराकडे धावू लागली. ..
पाऊस आता पूर्ण थांबला होता. .
जीवनाचा नवीन अध्याय सुरू झाला होता.. .

# २. डॉगवुड आणि पिकनिक्स

सोमवारी सकाळी प्रोफेसर हॉफकिन्स यांचे कारने विद्यापीठाकडे जाताना एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली जिकडेतिकडे हिरवंगार दिसत होत घर प्रशस्त वाटत होती त्याच्या आजूबाजूला खूपशी हिरवळ होती घरांच्या समोर फुलझाडे होती घर बांधताना निसर्गाची देणगी कायम ठेवण्यात आलेली होती रविवारी म्हणजे आल्या आल्या पहिल्याच दिवशी प्रोफेसरांचे घर पाहतानाही काही गोष्टी नजरेतून सुटल्या नव्हत्या दिवाण-खान्याच्या एका बाजूला सपूर्ण भिंत उचीची काच लावलेली होती. या काचेतून देवदार आणि पाईन वृक्षांची उचउच झाडे दिसायची त्यांच्या पानांचा खाली पडलेला पाचोळा दिसायचा त्यातून धावणाऱ्या खारी दिसायच्या, प्रोफेसरांच्या घराच्या मागे छोटा ओढा होता, त्यावर एक छोटेखानी लाकडीपूल, साध्या काठयाचा केला होता ओढा खळखळ वाहत होता, पाणी नितळ होते. इंग्रजी कवितात brooks म्हणून सतत खळखळ वाहणाऱ्या ओढयासारखा तो एक सामान्य परतु निसर्गरम्य ओढा होता

थोडया फार फरकाने अमेरिकेतील सर्व घरे अशीच होती. ..आजु-बाजूला नीरव शातता होती पानाफुलांचा आवाज होत होता पण दिवाण-खान्यात तो ऐकू येत नव्हता, फक्त पानांची हालचाल डोळयांना दिसायची कुडयात फुले होती बाजूला बोगनवेल लाल पानांनी डवरली होती आणि हनीसकलच्या पानांचा, फुलांचा एक मद मादक सुगध सर्वत्र पसरला होता न्यूयॉर्कला प्रभूच घर देखील असेच आहे त्याने तर लहान मुलांचे पाळणे, झोके, घसरगुडी, सी–सॉ यासारखे खेळ या नैसर्गिक वातावरणात पक्के बसवून घेतले आहेत मध्ये एक लाकडाच साध भलं लांबच लांब टेबल आहे व त्याच्या चारही अगानी बाक आहेत उन्हाळयात शनिवार, रविवारचे दुपारचे जेवण आम्ही येथेच बसून घेतो असं प्रभू म्हणाला

प्रभूसारखीच व्यवस्था देशपांडे यांचेकडे, कोल्हे यांचेकडे आहे व लिंडाचे घरही असेच आहे.

कॅथीचे वडील तर जॉर्जियाच्या पोलीस यंत्रणेचे अधिकारी. दोन मजली प्रचंड मोठा बंगला, आजूबाजूला तसलेच श्रीमंत लोक घर जमिनी-पासून उंच होते. दिवाणखान्याच्या काचेतून शंभर दीडशे फूट दूरवर असलेले तळे होते तेथे जाण्यासाठी केलेल्या पायऱ्या दिसत होत्या. छोटे-खानी लाकडी नावा एका बाजूला ठेवल्या होत्या कॅथीचे वडील रसिक असावेत. एका मोठ्या कपाटात शेक्सपीअरचे सारे वाङ्मय होते. बाजूच्या शोकेसमध्ये एनसायक्लोपिडीया ब्रिटानिकाचे सर्व खंड होते. हे सारं साहित्य, स्टिरिओमधून येणारी बिथोव्हिनची सिंफनी, खालचे ते तळे आणि त्याला संपूर्ण मागील बाजूने वेढणारे ते सारे डौलदार वृक्ष म्हणजे खरं जीवन होत जीवनाचा गोड आस्वाद घेतल्यासारखे होते प्रचंड औद्योगिकरण झालेल्या या समाजाने हा सारा निसर्ग आदराने जतन करून ठेवला आहे टिकवून ठेवला आहे न्यूयॉर्क ते अटलांटा हे नऊशे वीस मैलाचे अंतर पाच राज्यातून प्रवास हा एकदा कारने केला न्यूयॉर्कचा गजबजलेला प्रदेश सोडल्यावर उरलेल्या आठशे–साडेआठशे मैल संपूर्ण हमरस्त्याच्या आजूबाजूला दिसायचे ते हे उंचचउंच वाढलेले वृक्ष व त्यांच्या सावलीत निःस्तब्ध विसावलेली हिरवळ.

हिवाळ्याची नांदी सुरू झाली Fall आला पानांची पडझड सुरू झाली पण या पडझडीच्या आधी पानांचे रंग बदलू लागलेत एकाच झाडाची हिरवी पाने, पण काही पिवळट, काही किरमिजी तर काही चक्क लाल झालीत. झाडावर निरनिराळ्या रंगांची उधळण झाली प्रत्येक झाड वेगळे दिसू लागले व रस्त्यावरची ही रंगीत मेजवानी डोळ्यात साठविण्या-साठी स्त्री–पुरुष आपल्या गाड्या शनिवार रविवारी सत्तर ऐंशी मैल पळवू लागलेत ही रंगवैचित्र्यता म्हणजे एखाद्या जाणकार पेंटरने साध्या पांढऱ्या कागदावर फेकलेले चित्रविचित्र रंगाचे फराटे होते यात कुठलीही सूत्र-बद्धता नव्हती तरीही ते पहावेसे वाटत होते. या पानावर सूर्यप्रकाश निरनिराळ्या अंगाने पडू लागला की ते सारे चमकू लागत ‘ फॉल

कलरस्' हे तिकडचे नैसर्गिक वैशिष्ट्य. हे सार दोन तीन आठवडे टिकते आणि मग हळूहळू लाल पाने, पिवळी पाने, कोरडी होतात आणि कुठलाही वारा नसताना आपोआप गळू लागतात, आणि हिवाळ्याच्या पूर्वी झाडं अगदी निष्पर्ण होऊन जातात मग दिसतात झाडांचे ते प्रचंड बुंधे आणि शरीरावरील त्या काटक्या पान शोधूनही सापडत नाही. उघडी बोडखी झाडे रंग उधळलेल्या भिंतीसारखी विरूप दिसतात पण कुरूप दिसत नाहीत त्याच्यातही सौंदर्य असते पण त्याकड फारसे लक्ष जात नाही

हिवाळा जोरात असतो उष्णतामान–१०° शतांश इतके खाली येते

मग कधीतरी बर्फ हळूहळू पडायला लागते कापसाच्या म्हातारी-सारखा पांढराशुभ्र मऊसूत बर्फ हळूहळू काटक्यावर पडायला लागतो जमायला लागतो आणि पाहता पाहता झाडाच्या डोक्यावरील सारे केस पांढरे होऊन जातात. बर्फाचेच झाड तयार होते हा बर्फ एक दोन दिवसातच कठीण होतो. त्या आधी बर्फाचे ततू झाडावर लोंबकळू लागतात उष्णतामान बर्फ गोठण्याच्या खाली असते त्यामुळे बर्फाचे पाणी होणार नसते बर्फाला वजन असते तो कठीण झाला की त्याचे वजन साध्या काटक्याना पेलवत नाही, आणि घरातला हा पाहुणा वितळण्यापूर्वीच काटक्याना झाडापासून वेगळा करतो झाडे मग आणखीनच केविलवाणी दिसू लागतात. मऊ वाटला म्हणून आश्रय दिला पण वेटा माझेच शरीर ओरबाडतो म्हणून वृक्षराजाला थोडा विषादही वाटत असावा. थोडा संतापही आलेला असावा. पण चार पावसाळे पाहिलेल्या त्या वृक्षराजाची थांबण्याची तयारी असते कारण त्याला हे माहीत असते की येथे काहीच कायमचे नाही. सारे तात्पुरते आहे, क्षणकाळाचे आहे. वृथा शोक कशाला !

मार्च अर्धा सपतो आणि वृक्षाचे भाग्य फुलू लागते. कुठेकुठे हळूच कोवळ्या हिरव्या पानांची चाहूल लागते वसताच्या आगमनाची चाहूल शीतल वारा हळूच कानात सांगून जातो मग फार काळ थांबावेच लागत नाही आजची पाच दहा पाने, उद्या शभराने होतात आणि परवा लाखाने काही कळण्याच्या आतच हिरव्या रंगाची उधळण सुरू होते

पण समोरचा तो वेटा 'डॉगवुड' याचा म्होरक्या. वसंताचे आगमन

प्रथम त्यालाच कळणार. कारण तो बेटा याचा सखा क्षणात हा बहरू लागेल आणि साध्या पातळ पाढऱ्याशुभ्र पानानी हे छोटेखानी झाड डौलाने मिरवू लागेल. रस्त्यारस्त्यावर डॉगवुडची ही पांढरी पाने वसंताच्या आगमनाच्या तुताऱ्या किंवा जाझ संगीताचे बँड वाजवू लागतील सपला तो त्रासदायक हिवाळा संपला म्हणून दवंडी पिटवतील घरोघरी जाऊन निरोप देतील आणि पुढच्या दोन तीन आठवड्यात सारी हौशी मंडळी 'डॉगवुड'ची पाने पाहण्यासाठी मैलोगणती भ्रमती करतील आपल्याकडे पावसाळ्याची चाहूल जशी सूचक सरीने येते तशी तेथे वसंताची उन्हाळ्यात उत्तप्त झालेल्या धरणीवर पहिल्या पावसाचा शिडकाव झाला की जो सुगंध येतो तोच ते सांगत असतो, संपला रखरखीत उन्हाळा संपला हिवाळा मात्र आपल्याकडे चोरपावलानेच येतो तो येतो केव्हा ते कळत नाही. आला तसा जातानाही तो निमूटपणे जातो.

साऱ्या यूरोपमध्येही वसंताचे हे आगमन वैशिष्टयपूर्ण वर्डस्वर्थने म्हटलेच आहे 'I should have been in England, now it is spring there' शाळेत गोल्डन डॅफोडिल्सवरील ही कविता शिक्षकानी अगदी चांगल्या भाषेत शिकविली होती वसंताची कल्पना दिली होती ती समजली पण हृदयात जाऊ शकली नाही अमेरिकेच्या दोन वर्षांच्या वास्तव्यामुळे वसंताची महती समजली कारण तिने सरळसरळ डोळ्यांना साद घातला होता, ती कानांनी ओळखली होती शेवटी काय अनुभवांचे जीवंत शब्दांकन बऱ्याच वेळेला जवळपास अशक्य असते वर्डस्वर्थचा अनुभव आम्हाला समजला नाही कारण त्याचा प्रदेश आम्हाला अनोखा होता त्याची माती आम्ही पाहिली नव्हती, त्याच्या शब्दांना जो अर्थ होता तो आमच्यापर्यंत येऊच शकत नव्हता.

वसंत आला आणि स्त्रीपुरुष नाचू बागडू लागलेत संगीत वातावरणात घुमू लागले पिकनिक सुरू झालेत शनिवार रविवारी सारी माणसे पार्कमध्ये जमू लागलीत उष्णतामान १०–१५°श इतक 'वादळ' स्वेटर अंगात अडकविला तरी चालण्यासारखे होते उगाच त्या जाडजूड ओव्हरकोटाची आवश्यकता नव्हती डाऊनटाऊनच्या हिरवळीवर दोन तीन हजार

माणसे लंचसाठी जमू लागलीत काही हौशी बॅंडकपन्या आपली सेवा या रसिकांच्या पदरी दाखल करू लागल्यात. जिकडे तिकडे आनद पसरला. बुधवारपासूनच शनिवार रविवारचे कार्यक्रम ठरू लागलेत. सारं वातावरणच पिकनिकमय झाले. घरात कोणी राहू नका असं निसर्ग साद घालू लागला; आणि माणस घराबाहेर पडू लागलीत

प्रत्येक पार्कमध्ये नुसता बगीच्याच नव्हता तर दूर अंतरावरून सहकुटुब आलेल्या स्त्रीपुरुषाच्या, मुलामुलाच्या करमणुकीची खास व्यवस्था होती. गावाच्या बाहेर असणारे मोठे पार्क कमीत कमी चार चौरस मैल क्षेत्रफळ असलेले होते. तेथे घोड्यावर रपेट करण्यासाठी घोडे भाड्याने मिळत होते, तर नुसतीच सायकलची ride घेण्यासाठी भाड्याने सायकली मिळत होत्या व या रपेटासाठी एक अलग रस्ता होता. स्वीमिंग पूल होता, लहान बोटी होत्या, नावा होत्या त्या भाड्याने घेऊन तलावात हिंडता येत होते लहान मुलांसाठी झोके होते, पाळणे होते घरून आणलेले चेंडू, फ्रीसबी खेळण्यासाठी मुबलक जागा होती सर्कशीचा तबू होता माशाचे खेळ होते एकूणकाय दिवसभर अगदी चैन करता येण्यासारखी परिस्थिती होती बरं फर्लांगाच्या अतरावर रेस्टॉरेंट होती तेथे सॅंडविचेस, वेफर्स, कोक व मुख्य म्हणजे आईस्क्रीम मिळत होते बगीच्यातील मोकळया जागेवर लाकडी टेबले, बाक होती, पाण्याचा कारजा होता, जेवून उरलेले पदार्थ, टिनाचे डबे, कोकच्या रिकाम्या बाटल्या फेकण्यासाठी एक उंच पिप ठेवला होता पेटल्या निखाऱ्यावर कोंबडी भाजण्यासाठी शेगड्या जागोजागी होत्या. घरून फक्त कोळसे आणि जळण्याचे तेल आणायचे इतकी चोख व्यवस्था होती कडेवर असलेल्या मुलांना सतत कडेवर हिंडवणे त्रासाचे म्हणून बाबागाडी भाड्याने मिळत होती लहान मुलांसाठी सोई हे तर या देशाचे वैशिष्टयच डिस्नेवर्ल्डला ज्या रेस्टरूम्स पाहिल्यात, त्यामध्ये लहान मुलांसाठी कमी उंचीच्या सीटस् होत्या सिंक होत्या. आपल्याकडे अगदी सिनेमा टॉकीजमध्ये देखील असा कोणी विचार करीत नाही

उन्हाळयाच्या सुरुवातीलाच स्वातंत्र्य दिवस असतो चार जुलैची पहाट होते तीच प्रसन्न चेहऱ्याची अटलाटाला अगदी सकाळी सहा

वाजता वीस हजार स्त्रीपुरुष रोडरनर स्पर्धेसाठी लीनॉक्स स्वेअरला जमलेले असतात. यात सहा वर्षांपासून साठ वर्षांपर्यंतचे सारे आहेत, अगदी वॉशिंग्टन, टेक्सास, सॅन्फ्रान्सिस्को येथूनही काही हौशी मंडळी आली आहेत. टी.व्हीचा "ब्लींम्पी" आकाशात तरंगतो आहे. त्यातील कॅमेऱ्यातून तो फोटो घेतो आहे. टी.व्ही च्या पडद्यावर ही सारी माणसे मुंग्यांसारखी दिसत आहेत. साडेसहाला रेस सुरू होते आणि वारुळातून मुंग्या बाहेर पडाव्यात तशी झपाट्याने माणस, मुले बाहेर पडत आहेत. रेसचा मार्ग हायवेवरून जातो, आज हायवे वाहनांकरिता बंद आहे. रस्त्यांच्या बाजूला काही माणसे उभी राहून चीअरअप करताहेत. स्क्वेअरपासून सहा मैल असलेल्या पीडमट पार्कमध्ये एक तासाच्या आत पोहोचेल त्याला अटलांटा जर्नल अॅन्ड कॉन्स्टिट्युशन या वर्तमानपत्रातर्फे टी शर्ट वाटण्यात येतात, टी शर्टांची चळत दिसते. पेपरची माणसे सीमारेषेवर उभी असतात. मागील वर्षी (१९७९) साडेपाच हजार टी शर्टस् वाटलेत.

दुपारी डाउनटाऊनला मोठी परेड होती. प्रत्येक प्रांताच्या राजधानीच्या शहरी परेड असते. शाळांचे बँड असतात. पोलीस बँड असतो. उमद्या घोड्यावर बसलेले किंवा मोटारसायकलवर बसलेले पोलिसचे अधिकारी निरनिराळी Formations करून दाखवितात. त्यांच्यामागे उघड्या मोटारीत जॉर्जियाचे गव्हर्नर बस्बी आपल्या पत्नीसह, त्याचे मागे मेयर जॅक्सन, सीनेटर टॅलमगेड, पोलीस प्रमुख आपआपल्या कुटुंबासमवेत असतात. लठ्ठ शरीराचे विदूषक, उंच काठ्यांवर चालणारे जोकर. फुग्यांच्या माळा घातलेल्या स्त्रिया होत्या व सर्वांच्या शेवटी एक पन्नास फूट उंची असलेले 'बलून' होते.

परेड संपली. डाऊनटाऊनचा रस्ता कागदाचे तुकडे, आईस्क्रीमचे रिकामे कप यांनी भरला होता. आणि मग एकदम कार्पोरेशनचा मोठा रोडरोलर आला आणि पाहता पाहता सारे कागदाचे तुकडे तो ओढून आपल्या अगडबंब पोटात रिचवू लागला. त्याच्या मागोमाग होता पाण्याचा टॅकर. तीक्ष्ण फवाऱ्याने तो पाणी फेकू लागला. आणि रस्ता खऱ्या अर्थाने

धासून पुसून लख्ख झाला त्यानंतर एक प्रचंड वजनाचा हॉट ब्लोअर ठेवलेला टँकर आला आणि रस्त्यावर गरम हवेचा झोत फिरू लागला पाहता पाहता रस्ता अगदी कोरडा झाला हे सारे अवघ्या पाच सात मिनिटात झालं आधी झालेल्या परेडइतकच हे चटका लावून जाण्याइतपत सूत्रबद्ध होत. शेवटचे ते बलून सीमारेषेच्या बाहेर पडले आणि अवघ्या पाच दहा सेकंदात कपटे गोळा करणारा तो रोलर खडखड आवाज करू लागला इतकी तत्परता, अचूकता दिसून आली रस्ता पूर्ववत झाला आणि थांबलेली रहदारी पुनः सुरू झाली अमेरिकेतल्या अतिस्वच्छ, काळ्याशार रस्त्यांच रहस्य त्या दिवशी मला समजल

रात्री साडेनऊ वाजता निरनिराळ्या ठिकाणी फटाक्याची आतिषबाजी होती. पाच दहा हजार स्त्री-पुरुष स्टोनमाउंटन पार्कच्या हिरवळीवर जमली होती. समोर बँड जोरात चालू होता. अंधार पडू लागला तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते साडेनवाचा ठोका पडला आणि एकदम धडाम्-धुमचे आवाज सुरू झालेत प्रकाशाचे नळकांडे उंचचउंच जाऊ लागले निरनिराळ्या रंगाची आतषबाजी सुरू झाली. एखादा गोळा उंच गेल्याचे दिसे. त्याच्या पोटातून सप्तरंगी स्फुल्लिंग बाहेर पडू लागायचे. त्या रंगाचे निरनिराळे आकार व्हायचे मग एकदम अमेरिकेचा राष्ट्रध्वजाचा आकार दिसू लागला रात्रीच्या साडेदहा वाजता हे सारे संपले. त्यानंतर पार्कींग-लॉट मधून गाडी काढण्यास तब्बल अडीच तास लागलेत सारा हमरस्ता कार्सनी भरून गेला होता उंच टेकडयावर आमची गाडी आली की समोरच्या शेकडो गाड्यांचे tail-lights मिळून एक लांबचलांब एकदोन मैलाची लाल रेषा तयार झाल्याचे दिसत होते.

स्वातंत्र्यदिवसाइतक्याच मोठ्या परेडस् thanks giving Day ला असतात. नोव्हेंबरमध्ये हा दिवस झाला की मग नाताळाची गर्दी सुरू होते SALE च्या जाहिराती जिकडेतिकडे झळकू लागतात ग्रिटींग कार्डस् विकत घेण्याची प्रत्येकालाच घाई झालेली असते शॉपिंग सेंटर सुशोभित केले जातात नाताळाचे प्रेझेंटस् घेण्यासाठी सारी झुंबड उठते शनिवारी रविवारी तर कार पार्क करायलाही लवकर जागा मिळत नाही मोठमोठे फुगे,

सान्ताक्लासची भली उचउच चित्रे, रंगीबेरंगी पताका याचा जल्लोष असतो इंग्लडच्या पहिल्या एलिझाबेद राणीच्या काळातील पोषाख करून स्त्री पुरुष गमत म्हणून शॉपिंग सेंटरमध्ये एखाद्या कंपनीची जाहिरात करतात.

तेवीस, चोवीस डिसेंबरला ऑफिसेस, बँका आनंदात डुबून जातात. गुळगुळीत कागदात गुंडाळलेली प्रेझेंटस एकमेकावर रचून बँकेच्या मोठ्या हॉलमध्ये ठेवलेली असतात चित्रविचित्र पोशाख घालून मंडळी हिंडत असतात विद्यापीठाच्या पोष्टातील तरुण पोस्टमास्तर डोक्यावर कलाबतूंनी मढविलेला मुकूट व डोक्यावर अर्धा फूट उंचीची प्लॅस्टिकची तार aerial सारखी अडकवून आनंदाने पत्रवाटप करीत असतात

एकतीस डिसेंबरला रात्री सारे जागे असतात वाईन, व्हिस्की, बीयर पोटात जात असते पार्टीची रंगत वाढत असते आणि आपल्या प्रियकराच्या आलिंगनात बद्ध झालेल्या प्रिया अगदी रात्री बाराचा ठोका पडला की किंचाळून उठतात सारा हॉल चीत्कारांनी भरून जातो ड्रम्स, पाईप्स, चर्चच्या घंटा, बँडस्च्या कर्कश आवाजातदेखील त्या हॉलमधील 'चीत्कार' लपून राहत नाही माणसं बेहोष झाली असतात, रात्र पुढे सरकत असते

नव्या वर्षाचा पहिला दिवस उगवतो तेव्हा सारे झोपेत असतात !

निसर्गाच्या निरनिराळ्या रूपाचे निरनिराळ्या ठिकाणी दर्शन झाले. आमच्या विद्यापीठातील डॉ. गोकर्ण यांचे कार अपघाताने निधन झाले. अटलांटापासून वीस मैल दूर असलेल्या दफनभूमीत आम्ही सर्व त्यांचे मित्र गेलो होतो ती दफनभूमी नव्हतीच, तो होता नयनमनोहर बगीचा ! मधूनमधून होते चबुतरे काही सिमेंटचे तर काही संगमरवरी पुष्कळशा चबुतऱ्यावर फुलांच्या माळा होत्या. आजुबाजूला सर्वदूर फुलझाडे होती. गुलाब फुलला होता हनीसकलच्या गंधाने सारे आसमंत भरून गेले होते. तेथे चिरकाल विश्रांती घेणारे ते सारे अचेतन देह खर म्हणजे फार फार समाधानी असतील.

सुरेश भटांनी म्हटले आहे,

‘ तारकांच्या मांडवाखाली चिता माझी जळावी ’

या तारकांच्या मांडवाखाली क्षणकालात भस्मीभूत होण्यापेक्षा चिरतनकाल फुलझाडाच्या सगाती झोप घेणारे ते सर्व अचेतन देह त्या क्षणी मला सुखी वाटलेत

# ३. प्रवास आणि संशोधन

अमेरिकेतील जॉर्जिया स्टेट युनिव्हर्सिटीकडून रसायनशास्त्र विषयात पोस्ट डॉक्टरल रिसर्च फेलोशिप मला मिळाल्याचे ऑगस्ट १९७७ मध्ये समजले आणि १० ऑक्टोबरला मी तेथे रुजू झालो जॉर्जिया प्रांताची राजधानी असलेल्या अटलांटा या शहराच्या अगदी मध्यवस्तीत हे विद्यापीठ आहे अटलांटा हे शहर न्यूयॉर्कच्या दक्षिणेस ९०० मैल असून सध्या या गावाचे महत्त्व आहे कारण प्रेसिडेंट जिमी कार्टर इकडचेच तसेच मार्टिन लुथर किंग येथलेच. वीस लाख वस्तीचे हे शहर असून याचा विस्तार पन्नास चौरस क्षेत्र मैल आहे अमेरिकेतील सुंदर शहरात याचा नंबर पहिल्या पाचात आहे.

पहिल्या एक-दोन महिन्याच्या वास्तव्यातच खूपशा नवीन गोष्टी दिसून आल्यात विज्ञान तेथे हरघडीला दृष्टीला दिसत होते ते कानांनी ऐकू येत होते. ते पाठीशी होते आणि पोटाशीही होते. बँकेत, शाळेत, रेस्टॉरेंटमध्ये विज्ञानाची फळे हरघडीला दिसून येत होती अटलांटाहून दोन हजार मैल लांब असलेल्या कॅलिफोर्नियातील मावस भावाला फोन केला की तो क्षणात लागत होता व दहा वर्षांपूर्वी त्याचा ऐकलेला आवाज फोनवरही स्पष्ट ओळखू येत होता रेस्टॉरेंटमध्ये मिळणारे हॅम्बर्गर सँडविच केव्हाही घ्या त्याची चव तीच खुसखुशीत इतके शास्त्रशुद्ध रीतीने त्याची तयारी केलेली दिसत होती. कोडॅकच्या साध्या कॅमेऱ्याने घेतलेले फोटो अप्रतिम दिसत होते रंगीत टी. व्ही. वर महमदअली व लिआन-स्पिंकची बॉक्सिंग अगदी आपल्यासमोरच चालू आहे इतके त्यांचे हावभाव स्पष्ट दिसत होते शनिवार रविवारी बँकांना सुटी असली तरी कम्प्यु-टरच्या सहाय्याने पैसे मिळण्याची व्यवस्था होती हे सारं पाहून माझी

आकाशवाणीच्या सौजन्याने.

दृष्टी विस्तारली. चमत्कार वाटाव्यात इतक्या अद्भुत गोष्टी तंत्रज्ञानामुळे शक्य झाल्यासारख्या वाटत होत्या अजोड तंत्रज्ञानाचे रुधिराभिसरण या समाजपुरुषात झाल्याचे ठायी ठायी दिसून येत होते. तंत्रज्ञानाने हा सारा समाज भारून गेला आहे, झपाटून गेला आहे हे दिसू लागले व जसजसा वास्तव्याचा काळ वाढू लागला तसे ह्या मताला पुष्टी मिळू लागली. येथील स्त्रीपुरुषांच्या, मुलामुलींच्या वागण्याची, राहण्याची पद्धत पाहिली आणि तंत्रज्ञानाचा यांचे जीवनावर किती विलक्षण परिणाम झाला आहे ते जाणवले

या साऱ्या वातावरणाचा दृश्य परिणाम लौकरच दिसून आला अटलांटा-हून मायामीला मित्राकडे गेलो त्याचेबरोबर डिस्नेवर्ल्ड व केपकेनेडी स्पेस रिसर्च सेंटर पाहिले तेव्हा स्वतःमध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला होता. एखादी गोष्ट अगदी ठरल्याप्रमाणे, कुठलाही गोंधळ न होऊ देता करणे अगदी सोपे आहे हे मनाशी पक्के ठसल्यासारखे झाले त्यामुळे काम अगदी बिनचूक वेळेवर होऊ लागलीत

मायामीला पोपटाच्या जंगलात पोपटांनी केलेली सर्कशीची कामे, तर मायामी सेक्वेरियममध्ये डाल्फीन व शार्क माशांची कामे नुसतीच लक्षवेधी नव्हती तर अजोडसुद्धा होती सायप्रसगार्डनमध्ये वॉटरसर्फ-वर तरुणतरुणींनी वेगाने केलेली कामे नुसतीच मन हेलावून सोडीत नव्हती तर अजोडसुद्धा वाटत होती डिस्नेवर्ल्ड ही तर काल–आज–उद्याची नगरी कालचे जीवन, उद्याच्या जीवनाशी येथे हातात हात घालून उभे आहे. जुन्या ट्रामगाड्या, घोड्याच्या गाड्या, खेळाचे पाळणे, एअर-लिफ्ट या सोबतच स्पेसमाऊंटनसारखे अजस्र खेळ. अंतराळात जाणाऱ्या अंतराळवीरांना गुरुत्वाकर्षणापासून दूर जाताना जे कष्ट साध्य करावे लागतात त्याचे क्षणकाल दर्शन घडविणारी ही ride एका ट्रॉलीत आपण बसायचं. त्यातील आडवा बार बंद करून तुम्हाला अक्षरशः जखडून टाकतात. प्रथम हळूहळू ही ट्रॉली सुरू होते व मग एकदम ती वेग घेते ती कुठे चालली आहे ते समजत नाही कारण आजुबाजूला असतो प्रचंड अंधार ! खूप उंच गेल्यासारखे वाटते, मग एकदम प्रचंड वेगाने आपण

कुठेतरी खोल खोल चाललो आहोत असे वाटते. नंतर ट्रॉली गरकन एक वळण घेते रुळाचा संपूर्ण गोल लूप असतो त्यावर ती ट्रॉली इतक्या वेगाने वर गेली व मग एकदम खाली आली की साऱ्या दोन सेकंदापूर्वीची अवस्था पहिल्या अवस्थेपेक्षा एकदम उलट झाली. या काळात सर्वजण अक्षरशः किंचाळत होते. या मशीनचे नावच आहे screaming machine कॅनडात तर अशा ट्रॉलीत १८० फूट उंच नेतात अगदी उंच ठिकाणी गेल्यावर ती ट्रॉली वेगाने खाली यायला लागते खाली दृष्टी जाताच आपले प्रतिबिंब मानवनिर्मित तळ्यांच्या नितळ पाण्यात दिसू लागते साऱ्या एक दोन सेकंदात ट्रॉली खाली खाली येते व मग एकदम याच वेगाने ती खाली आल्यास पाण्यात जलसमाधी मिळणार अशी भीती, नव्हे भीतीचा गोळा उभा राहतो डोक्याचे केस ताठ होतात, अंगावर शहारे येतात आणि बेंबीच्या देठापासून सारे ओरडू लागतात भीती म्हणजे कशी असावी याचा तेथे जिवंत अनुभव मिळतो सारे किंचाळतात–बुडालो म्हणून आणि ट्रॉली एकदम वळण घेत, पाण्यातून आपण एकदम बाहेर आल्याचे जाणवते

असे कितीतरी खेळ, अशा कितीतरी जीवघेण्या स्पर्धा. मोटार-सायकलच्या रेसेस, त्या खाचखळग्यातून नेताना होणारे अपघात, घोड्याच्या पाठीवर खोगीर न घालता, घोड्याचा थयथयाट चालू असताना त्याच्या पाठीवर उभे राहणारे टेक्सासचे काउबाईज. अटलांटाला तर फ्रीस्टाईल कुस्त्या असतात व या टी व्ही वरदेखील दाखवितात तीन चारशे पौंड वजनाचे गलेलठ्ठ पहिलवान एकमेकाला जीवे मारायचे या ईर्ष्येने विरोधी मल्लाला अगदी अक्षरशः बुकलून काढतात. त्याला खाली पाडून त्याच्या पोटावर, छातीवर थयथया नाचतात. शरीरापासून हात पाय अगदी तोडून टाकायचे या जिद्दीने एका विशिष्ट कोनात वाकवितात खाली पडलेला विव्हळतो आणि त्याच्या अंगावर नाचणारा विजयोन्मादाने खिंकाळत असतो. प्रथम या कुस्त्या मी पाहिल्यात तेव्हा तो जीवघेणा क्रूर प्रकार पाहून मीच घाबरून गेलो पुढेपुढे त्याची सवय झाली. ते पाहताना मग मजा वाटू लागली.

तंत्रज्ञानाची फळे खेळात दिसतात. टी व्ही. वरही दिसतात तसेच ती सिनेमा, कथाकादंबऱ्या यामधूनही आढळून येतात. नुकताच पाहिलेला सुपरमॅन हा सिनेमा या सर्वांचे प्रातिनिधिक उदाहरण क्रिप्टान या ग्रहावरून ही व्यक्ती पृथ्वीवर आली असते अद्‌भुत गुणाचा याला वारसा आहे हा पक्ष्यासारखे उडू शकतो. बंदुकीच्या गोळयाचा याचेवर काहीही परिणाम होत नाही. न्यूयॉर्कच्या मॅनहटनसारख्या गजबजलेल्या प्रदेशात एका सत्तर मजली इमारतीच्या टोकावर एक हेलिकॉप्टर अडकून पडते त्याचा ३/४ भाग इमारतीच्या बाहेर असतो व त्या हेलिकॉप्टरमध्ये एक तरुणी अडकलेली असते सुपरमॅन ते पाहतो जमिनीवरून उडी मारतो व हेलिकॉप्टरला अलगद वर उचलतो. प्रत्यक्षात सुपरमॅनचे काम करणाऱ्या क्रिस्टोफरला कठीण पण नाजूक तारांनी वेढले गेले, व क्रेनच्या सहाय्याने त्याला एकदम वर उचलण्यात आले या शुटींगसाठी मिलीयन्स ऑफ डॉलर्स खर्च झालेत पुढे एकदा धरणीकंप होतो व एक प्रचंड धरण फुटते पृथ्वीभोवती उलट दिशेने तू चक्कर मारल्यास त्यापासून निर्माण होणाऱ्या चुंबकीय क्षेत्राने तू काळाला मागे नेऊ शकशील असे त्याला त्याचे मार्ग-दर्शक सांगतात पृथ्वी ज्या दिशेने फिरते त्याच्या विरुद्ध मार्गाने तो भराभर फेऱ्या मारतो काळ मागे जातो. धरणाची भिंत हळूहळू पुनः पूर्ववत होऊ लागते •

विज्ञानाच्या या फळांमुळे मानवी जीवन सुखकर झाले आहे विज्ञानाचा दृष्टिकोन, अन्वयार्थ खऱ्या अर्थाने मला प्रयोगशाळेत समजला. संशोधकाची दृष्टी कशी असावी ते अनुभवाने उमजले. प्रयोगशाळा सुसज्ज होती. गणकयंत्राने सर्व उदाहरणे सोडविता येत होती प्रयोगशाळा इतकेच काय विज्ञानशाखेची सातमजली संपूर्ण इमारत एअरकंडिशन्ड होती बाराही महिने उष्णतामान सतत २५° श, इतके होते. लायब्ररी अद्यावत होती. कुठल्याही संशोधनपत्रिकेची कॉपी काढण्यासाठी मजल्यामजल्यावर xerox मशीन होत्या हे सर्व होते. या सर्व सोयी होत्या तरी गलथानपणा नव्हता आळस नव्हता, कामाची कुचराई कोणाकडूनही होण्याची शक्यता नव्हती. तुम्ही संशोधन नेटाने केले नाही तर माझे प्रकल्प पूर्ण होणार नाहीत व

तसे झाले तर मला मोठ्याला ग्रँटस् मिळणार नाहीत असं प्रत्येक प्रोफेसर म्हणत होते म्हणूनच दररोजचे काम वाटून दिल्यासारखे असे तितके काम पूर्ण करणे आवश्यक असे, त्यासाठी रात्रीचे दहा वाजलेत तरी काम संपविणे आवश्यक होते एकूण जीवन कमालीचे घाईचे होते. आराम होता तो थोड्या फार अंशाने फक्त शनिवारी व रविवारी. इतर दिवशी नुसत पळणे होते. प्रयोग करायचे होते मिळालेली निरीक्षणे वापरुन गणकयंत्रांच्या सहाय्याने उत्तरे काढायची होती ही उत्तरे पुनः पुनः मिळवायची असतात. निरनिराळ्या प्रयोगामुळे तीच उत्तरे पुनः मिळणे आवश्यक होते यामुळे एकच प्रयोग दहा पंधरा वेळा करावा लागत होता. या प्रयोगासाठी लागणारी काचेची उपकरणे लख्ख करण्याचे एक तत्र होते ते सारे सव्यापसव्य पाळावे लागे रासायनिक पदार्थ अतिशुद्ध अवस्थेत मिळविणे प्रयोगाच्या अचूकतेसाठी फार आवश्यक होते यामुळेच आज प्रयोग चालू असताना उद्याच्या प्रयोगाची तयारी मनातल्या मनात करावी लागे द्रवरूप नैट्रोजन पाण्यासारखा होता बर्फ तर अमाप होता, गणकयंत्राचे टर्मिनल केव्हाही उपलब्ध असे म्हणूनच की काय हे जमले नाही असे सांगण्याची सोय नव्हती जमले नाही याचा अर्थ केला नाही, करू शकलो नाही असाच समजला जात होता

तेथे कोणालाच उसंत नव्हती मोठमोठी उपकरणे महागडी नव्हती, सहज उपलब्ध होती त्यामुळे अचूकपणा होता अचूक उत्तरे मिळविण्याची सतत धडपड होती बायोमायक्रोकॅलारीमीट्री या नवीन उपकरणावर DNA रेणू व औषधीयुक्त सयुक्त कार्बनिक पदार्थ यांच्या प्रक्रियेतून निर्माण होणारी ऊष्माऊर्जा आम्ही मोजत होतो हे उपकरण आल्यावर प्रथम ते 'सेट' करण्यात आले ते व्यवस्थित काम करते किंवा नाही हे पाहण्यासाठी सर्वज्ञात असलेली तीव्र अम्ल + तीव्र अल्कली याच्या उदासीन करण्याची प्रक्रिया करून त्यात निर्माण झालेली उष्माऊर्जा शोधून काढण्यात आली. सर्वमान्य असलेली १३.३० कि कॅ/मोल इतकी किंमत नुसत्या एका प्रयोगाने येऊन समाधान होण्यासारखे नव्हते सतत पाच-सात प्रयोगात हीच किंमत मिळण आवश्यक होते ती मिळेपर्यंत प्रयोग करावे लागले–

कारण ती किंमत अचूक मिळत नव्हता याचा अर्थ प्रयोग करण्याच्या पद्धतीत चूक होती किंवा उपकरण चांगले काम करीत नव्हते. आम्हाला या दोन्ही ठिकाणी चूक नको होती प्रत्येक दिवशी सध्याकाळी या निरीक्षणांची चर्चा व्हायची. नवनवीन सूचना मिळायच्या DNA वरील काम संपत आले काही खास वैशिष्टयपूर्ण म्हणूनच शास्त्रीय दृष्टया महत्त्वाची निरीक्षणे मिळालीत असे प्रोफेसर हॉफकिन्स याना वाटू लागले. या काळात आमच्या विभागात जे जे शास्त्रज्ञ आलेत त्याना आवर्जून प्रोफेसर हॉफकिन्स आमच्या प्रयोगशाळेत आणायचे. सर्व उपकरणे दाखवीत, प्रयोगाची माडणी सांगत, निरीक्षणे दाखवीत व त्यांना त्याचे मत या सर्वांवर विचारीत आपण काहीतरी नवीन केले आहे, म्हणून ते इतरांपासून, ना लपविण्याची धडपड, ना ते गुप्त ठेवण्याची प्रवृत्ती. ही सचोटी प्रोफेसर हॉफकिन्समध्येच नव्हती तर ती संपूर्ण प्रयोगशाळेत होती मला तर वाटते अशीच सचोटी प्रत्येक प्रयोगशाळेत असली पाहिजे. त्याशिवाय अंतराळयानासारखे महान प्रयोग यशस्वी होऊच शकणार नाहीत यानात दहा हजार सूक्ष्म भाग आहेत असं मानलं आणि त्यातील एखादा-देखील कमी प्रतीचा म्हणजे १०० %० टक्क्यापेक्षा कमी प्रतीचा असेल तर यान विवक्षित ठिकाणाच्या ऐवजी पाच-दहा मैल दूर उतरेल. सचोटीनेच राष्ट्र मोठे होते तेथे प्रयोगशाळेत वैज्ञानिकामध्ये ही सचोटी असलीच पाहिजे

कार्बनिक रेणूंच्या विचरणात निर्माण होणाऱ्या उष्णतेचे मोजमाप करायचे होते तेव्हाची गोष्ट. 'डायऑक्सीटेन'सारख्या रेणूपासून प्रचड ऊष्माऊर्जा निर्माण होईल असा अदाज होता उर्जा मिळविण्याचे विविध मार्ग शोधून काढणे सध्या फार महत्त्वाचे आहे. यामुळेच या रेणूचे महत्त्व आम्हाला ७० कि कॅ/मोल इतकी किंमत अभिप्रेत होती मी सतत आठ-दहा दिवस प्रयोग केलेत, पण ही किंमत २५ च्या वर मला कधीही मिळाली नाही अपेक्षित किंमत न मिळाल्याने मी नाराज झालो होतो. प्रोफेसर हॉफकिन्स याना सर्व निरीक्षणे दाखविलीत ते म्हणाले, 'तुमच्या प्रयोगांची details लिहून काढा. तुम्हाला मिळालेली किंमत कमी असेल

पण ती सातत्याने पंधरा-वीस वेळा मिळाली आहे अचूक केलेल्या प्रयोगाचे महत्त्व ध्यानात घ्या '

प्रत्येक प्रयोगातील उणीवा, त्रुटी आपल्या वहीत सूत्रबद्धपणे लिहून काढण्याचा आग्रह असतो एखादा प्रयोग चुकला तर वहीत चूक होण्याची सामान्य कारणे लिहून काढण्याचा तेथे दंडक आहे शास्त्रीय सूत्रबद्ध विचार करण्याची क्षमता यामुळे संशोधकात निर्माण होते असे तिथे मानले जाते. अचूक प्रयोग ' हा तर विज्ञानाच्या प्रगतीचा पायाच त्यासाठी आवश्यक असणारी सचोटी व काम पूर्ण करण्याची जिद्द सर्वांत आढळते कंटाला तडजोड असूच शकत नाही म्हणूनच की काय टेक्सासहून सेमिनार आटोपून अटलांटाला रात्री आठ वाजता आल्यावर, एअरपोर्टवरून प्रोफेसर हॉफकिन्स परस्पर प्रयोगशाळेत येतात, शिकागोच्या आमच्या मित्राचे प्रोफेसर रात्री अकरा वाजता त्याचे घरी फोन करून दुपारी अडून राहिलेले calculations फोनवर समजावून सांगतात तर प्रसिद्ध वैज्ञानिक किंग हे सकाळी सात ते रात्री नऊपर्यंत प्रयोगशाळेत सतत उभे असतात आणि नोबेल पारितोषक विजेते प्रोफेसर वुडवर्ड मध्यरात्रीदेखील आपल्या प्रयोग-शाळेत असतात. कंटाळा तेथे पर्यायच नाही अटलांटाला पोहचण्याच्या दुसऱ्याच दिवशी मला कामाला जुंपावे लागले तर तेथून निघण्याच्या आदल्या दिवशी प्रयोगशाळेतून सर्व आटोपून घरी येण्यास मला संध्या-काळचे आठ वाजले होते. जीवन सुखरूप होते, सर्व सुखसोई होत्या, पैशाची विवंचना नव्हती, वस्तू मुबलक होत्या म्हणूनच की काय कामात कुचराई अपेक्षितच नव्हती.

प्रत्येक प्रयोगाशी एकरूप झाल, आपण करतो ते अद्वितीय नाही पण चांगल आहे. निराळ आहे ही जाणीव मनात असली की प्रयोगशाळेतील प्रत्येक क्षण हा जगण्यासाठी असतो अशावेळेस पुष्कळदा काळाचे भान राहत नाही आणि खऱ्या अर्थाने समाधी लागे अशी समाधी लागावी हेच खर म्हणजे विज्ञानाचे प्रयोजन व संशोधकाचे यशस्वी जीवन !

१९७५ साली औषधीशास्त्राचे नोबेल पारितोषक विजेते डेवीड बाल्टीमोर म्हणाले, " ज्ञानाची कक्षा वाढविण्यासाठीच फक्त माझे जीवन

मी व्यतीत करतो शास्त्रीय संशोधनाची यापेक्षा आणखी काही महतीच असू शकत नाही ”

DNA रेणूवर केलेल्या कामावरील संशोधन एका परिसंवादात मांडल्यावर तेथे जमलेल्या एकाने प्रश्न केला होता, “ या कामाचे महत्त्व काय ? ह्या कामाचे प्रयोजन काय ? ” उत्तर देताना प्रोफेसर हॉफकिन्स म्हणालेत, “ या कामाचे महत्त्व या क्षणी सांगणे म्हणजे आत्मस्तुती होईल. यथावकाश त्याचे महत्त्व समजेलच पण त्या काळात, हे काम चालू असताना आम्ही एका आगळ्याच आनंदात होतो हे काय कमी झाले ?”

मलाही वाटत, त्या आनंदाच्या जलाशयात ऑक्टोबर ७७ ते सप्टेंबर ७९ हा तब्बल दोन वर्षे मी अखंड अवगाहन केले हे काय कमी झाले !

# ४. शाळा आणि विद्यापीठ

वयाच्या सहाव्या वर्षी विद्यार्थ्याला प्राथमिक शाळेत पहिल्या ग्रेडमध्य प्रवेश मिळतो प्रत्येक वस्तीत एक सरकारी शाळा असते, तेथे प्रवेश घेतल्यास कुठल्याही प्रकारची फी नसते माञ खाजगी शाळेत आपल्या मुलांना पाठवायचे असेल तर एक ते दीड हजार डॉलर्स इतकी फी वर्षाला असते. खाजगी शाळांच्या इमारती प्रशस्त, मोठमोठी क्रीडांगणे, लहानसा स्टेडियम, स्वीमिंग पूल या सर्व सोयी असल्यामुळे श्रीमंताघरची मुले या शाळांतून जातात. आमचा मुलगा जवळच्या शाळेत न जाता दूरच्या खाजगी शाळेत जातो असे सांगताना तेथल्या पालकाचा चेहरा आपल्यासारखाच उजळून निघतो. आपल्याकडे लग्नकार्यात पूर्वी आणि आताही नवऱ्याची श्रीमंती ही बायकोच्या दागिन्यावरून जोखली जात असे. आजकाल मुले कुठल्या शाळेत जातात यावरूनही ती ठरते

वर्गात साधारण २५ ते ४० विद्यार्थी असतात शिक्षकाचे भले मोठे टेबल वर्गाच्या मध्यभागी असते व आजुबाजूंनी विद्यार्थी असतात. प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र खुर्ची व त्यावर लिहिण्यासाठी एक टेबल. विद्यार्थ्यांच्या आजुबाजूला चारही अंगांनी साधारण एक फूट इतकी जागा रिकामी असते. त्यामुळे विद्यार्थी एकमेकाजवळ चिकटून बसल्यासारखे नसतात शाळेची पुस्तके फुकट असतात व शाळेने कुठलीही ट्रीप काढली तर त्याचे वेगळे पैसे घेत नाहीत शाळांना फी नसते शिक्षकाच्या टेबलावर त्या वर्गाला आवश्यक असणारी सर्व पुस्तके मांडून ठेवली असतात क्रॅफ्टसाठी लागणारे कागद, रंगीत खडू, कातऱ्या, सुईदोरा, क्रेपकागद ह्या सर्व वस्तू या टेबलावर असतात वर्गाच्या भिंती विद्यार्थ्यांनी केलेल्या कलाकृतींनी रंगविलेल्या असतात. शाळेच्या लायब्ररीतून वाटेल तितकी पुस्तके विद्या-र्थ्याला घरी नेता येतात लायब्ररीचा अलग हॉल असतो, तेथे बहुतांशी

सर्व वर्तमानपत्रे, मासिके ठेवलेली असतात लायब्ररीत बसण्याचा म्हणून एक वेगळा तास टाईमटेबलमध्ये असतो. वर्गात रंगीत टी. व्ही. असतो प्राचार्यांच्या खोलीशी जोडलेला intercom असतो, निरोप सांगण्या-साठी चपराशी नसतो सर्व वर्गांना एकाच वेळेस मधली सुटी देत नाहीत, त्यामुळे शाळेच्या आत कधीही आवाज ऐकू येत नाही, अगदी नीरव शांतता असते.

सकाळी साडेआठला सर्व शाळा सुरू होतात त्याआधी सर्व विद्या-र्थ्यांना breakfast मिळतो या ब्रेकफास्टसाठी निमित्तमात्र फी पाच ते दहा सेंट इतकी असते ब्रेकफास्ट केफटेरीयामध्ये घ्यावा लागतो दररोज दोनशे सीसी थंड दूध, तितकाच संत्र्याचा रस व एक ॲपल पाय किंवा सीरियल मिळतात प्रत्येक गोष्ट कागदी डब्यात असते.

पिरीयड सुरू झाले म्हणजे आपल्याप्रमाणे शिक्षक फळ्यावर सर्व विद्यार्थ्यांसाठी काही प्रश्न लिहून त्यांची उत्तरे लिहून काढण्यास सांगत नाही. वर्गातील सर्व विद्यार्थी थोडेच सारख्या बुद्धिमत्तेचे असतात ? शिवाय प्रत्येक विषयात सर्वांची गती काय सारखीच असते ? हे सर्व विद्यार्थी एकाच वर्गात असले म्हणून काय त्यांना एकाच मापाने जोखायचे ? म्हणूनच गणिताच्या पुस्तकातील पाचव्या धड्यातील उदाहरणे हुषार विद्यार्थी सोडवीत असेल तर साधारण विद्यार्थ्याचा तिसरा किंवा चौथा धडा चालू असेल. त्या त्या तासाला प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षक आपल्याजवळ बोलावतात व त्याच्या कुवतीप्रमाणे त्याला काम देतात. माझा पाचवीच्या वर्गात असणारा मुलगा गणिताचे व सायन्सचे सहावीचे पुस्तक सोडवीत असायचा. पण इंग्रजीसाठी तो पाचवीच्या ग्रेडचेच पुस्तक सोडवीत असे. यामुळे प्रत्येक शिक्षकाला त्या त्या विषयातील हुषार विद्यार्थ्यांची नावे माहिती असतात आपण वर्गात सतत पहिला नंबर मिळविणाऱ्या विद्या-र्थ्याला मानतो व त्याचे नाव सतत शिक्षकाच्या जिभेवर असते पण एखादा सातव्या आठव्या क्रमांकाचा विद्यार्थी मराठी निबंध सर्व वर्गात लिहितो, त्याचे नाव कोणाच्या लक्षात असते ? किंवा बत्तीसाव्या नंबराच्या मुलाचे ड्रॉइंग फार चांगले आहे हे कोणाच्या लक्षात असते ? निरनिराळ्या

विषयात काही नैपुण्य दाखविणारे विद्यार्थी निवडून काढायचे व त्यांना त्यांच्या कार्यास स्फूर्ती देऊन, पुढील आयुष्यात एक विशिष्ट दिशा दाखवायची हेच खरे शिक्षकाचे काम रसायनशास्त्रात नोबेल पारितोषिक मिळालेले प्रोफेसर वुडवर्ड यांना वयाच्या तेराव्या वर्षी graduate student इतकी कार्बनिक रसायनाची माहिती होती, ही गोष्ट त्यांच्या प्रिन्सिपॉलनी कॉलेजच्या लक्षात आणून दिली. कॉलेजमध्ये म्हणूनच त्यांना सर्वसाधारण कोर्सेस न करता थेट Ph D. साठी प्रवेश दिला व वयाच्या सतराव्या वर्षी अगदी प्रथितयश विद्यापीठाचे ते डॉक्टर झाले

शेवटचा तास हमखास खेळण्यासाठी वेगळा काढून ठेवलेला असतो. वर्गातील मुलामुलींना घेऊन शिक्षक मैदानावर येतात व संपूर्ण एक तास खेळ शिकवितात खेळ चालू असताना जातीने उपस्थित असतात किंबहुना सकाळी ८॥ ते दुपारी ३ पर्यंत केव्हाही विद्यार्थ्यांना मोकळे असे सोडलेले नसते. दुपारी जेवणासाठीसुद्धा शिक्षक बरोबर असतो व विद्यार्थ्यांबरोबर त्यांचेच टेबलावर तोही जेवत असतो. दुपारच्या जेवणात सलाड, मॅश्ड पोटॅटो, बीन्स, फ्राइड चिकन, लोफ, स्वीट व ऑरेंज ज्यूस इतक्या गोष्टी असतात. दर शुक्रवारी प्रत्येक विद्यार्थ्याला पुढील आठवड्याच्या जेवणाचा मेनू देतात ह्या जेवणात किती कॅलरी येतात व प्रत्येक वयोगटाच्या मुलांना किती कॅलरीज मिळतात हे तपासण्यासाठी शिक्षण खात्याचे लोक निरनिराळ्या शाळांना भेट देत असतात. साधारण कुठलाही खाद्यपदार्थ आठवड्यात दुसऱ्यांदा परत मिळत नाही पीझा, टोमॅटो सूप, स्पागेटी, फीश, मटन, ओक्रा (भेंडी), स्पीनॉच (पालक) फ्रूट पाय, याशिवाय निरनिराळे ज्यूस असतात. खाण्यासाठी प्लॅस्टीकचे काटे व चमचे देतात. सर्व वस्तू जाड पेपर प्लेटमध्ये मांडून ठेवलेल्या असतात. शाळेतच ओव्हन असतात, गॅस असतो, फ्रीज असतात. त्यामुळे वस्तू आवश्यक तितक्या गरम किंवा थंड असतात बारा वाजता पहिलीचा, सव्वाबाराला दुसरीचा याप्रमाणे त्या त्या वर्गातील मुले-मुली क्यूमध्ये उभे राहून आपली प्लेट घेतात. यामुळेच साधारण एक दीड तासात दोनशे अडीचशे मुलांची जेवणे संपतात. पण कुठेही गोंधळ होत नाही, आवाज होत नाही प्रथम माझ्या

मुलाला तिकडील चव आवडायची नाही म्हणून घरी दुपारी तीन वाजता आल्यावर आईकडून तो शिरा, पोळ्याभाजी करून मागायचा पुढे मात्र त्याला गोडी वाटू लागली व त्याचे घरचे दुपारचे जेवण बंद झाले. त्याचे मित्र डेनीस, डायना, सायरस हे त्याच्यापेक्षा वजनाने दुप्पट ! पाचवीच्या वर्गातील मुल–मुली साधारण ८० ते ९० पौंड वजनाचे असावेत त्यांचा आहारही दांडगा खाणेही खूप व टाकणेही खूप. आवडलेली वस्तू पुनः दुसऱ्यांदा कॅफटेरीयामधून आणायचे व नको असलेली हात न लावता सरळ टाकून द्यायचे.

प्राचार्य वर्गात आले तरी शिक्षकच काय मुलेही उठून उभे राहत नाहीत. शिक्षक प्राचार्याला पहिल्या नावाने हाक मारतो, विद्यार्थ्यांनीही तशी हाक मारली तर प्राचार्याला राग येत नाही एखादे दिवशी कॅफटेरीयातील लंच देणारी मुलगी गैरहजर असली तर स्वतः प्राचार्य ॲप्रन घालून लंचच्या डिशेस वाटत असतात हे माझ्या मुलाने पाहिले त्याच दिवशी मला सांगितले त्याला या गोष्टीचे अप्रूप वाटले. त्याच्या अमेरिकन मित्रांच्या दृष्टीने ती एक क्षुल्लक गोष्ट होती

वर्गात विद्यार्थ्याला छडीने अथवा हाताने किंवा कसल्याही प्रकाराने मारण्याची परवानगी नसल्यामुळे विद्यार्थी उडारलेले असतात बरे वार्षिक परीक्षेचा धाक नाही व कोणालाही शाळेत नापास करीत नाहीत त्यामुळे अभ्यासात मुले खूप सीरीयस नसतात. वस्तूंची मुबलकता असल्यामुळे संगीताच्या पिरीयडला ट्यून्स शिकवितात व पियानोवर आळीपाळीने मुलं–मुली गाणे म्हणतात मुख्य म्हणजे असे २–३ पियानो शाळेत असतात या साऱ्या गोष्टींचे आपल्याला कौतुक पण जन्मापासूनच आजु-बाजूला अशीच मुबलकता पाहिलेल्या विद्यार्थ्यांना याच काय कौतुक असणार ? वर्गात शिक्षक खाऊ नका सांगत असतात तरी पोरं च्युइंग गम चघळत असतात ते खाणे झाल्यावर खुर्चीला किंवा जेवणाच्या डिशला चिकटवितात किंवा शेजारच्या मुलाला फेकून मारतात होमवर्क करीत नाहीत पुस्तके आणीत नाहीत गंमत म्हणजे शाळेतील याचे सारे शिक्षक व प्राचार्य हे एकजात नम्र, हसतमुख असतात. हीच तर खरी या समाजाची

गंमत आहे. एकदा स्वतंत्र म्हणून वेगळा झाला की प्रत्येक पुरुष किंवा स्त्री आपआपली जबाबदारी ओळखते हे खरं! माझे मित्र नैनन एका चांगल्या शाळेत शिक्षक आहेत ते म्हणालेत येथे विद्यार्थ्यांना खूप सोयी आहेत पण त्याचा ते उपयोग करताना दिसत नाहीत वर्गात एखादी टेस्ट दिली तर दोन तीन विद्यार्थी जणू काही झालेच नाही अशा आविर्भावात शिक्षकाच्या पुढे येऊन पेन मागतील. ही सर्व मुलं पुढे इतकी कशी सुधारतात? कॉलेजात ही इतकी शांत का होतात? हे समजावून घेणे म्हणूनच महत्त्वाचे.

मला बरेच वेळा काही प्रश्न सतत टोचत असतात. अमेरिकेतील ही लहान मुले इतकी एककल्ली, उडारलेली, तरुणपणी स्त्री–पुरुषांचे संबंध आपल्या दृष्टीने विचार केल्यास पुष्कळसे स्वैर, घटस्फोटाचे प्रमाण भरीव, प्रेमाचा ओलावा कमी या सर्व वजेच्या बाजू असूनही हे राष्ट्र इतके पुढे का? यांची जमीन सोन्याची, कष्ट करणारे शेतकरी पोलादी शरीराचे, नागरिक राष्ट्रप्रेमाने भारावलेले आणि शास्त्रज्ञ, विचारवंत सदोदित आपल्याच विश्वात दंग ह्या जमेच्या बाजू माणसाच्या गुणाची पारख येथेच, व याच मालमत्तेवर त्याची किंमत ठरेल जगातील निरनिराळ्या देशातील थोर वैज्ञानिक, अर्थशास्त्रज्ञ, संगीतकार, नृत्यकार, खेळाडू या सर्वांनाच अमेरिका आपले घर वाटावे व सर्वांना या देशाने आदराने बोलवावे यातच या देशाचे आगळेपण व त्यान्वये लाभलेले मोठेपण असावे. म्हणूनच की काय सर्व विषयांची नोबेल पारितोषके दरवर्षी याच देशाला जावीत व ऑलेम्पिकमधील सारे 'सुवर्ण' यांनीच न्यावे या मान्यवर व्यक्तींना हा देश विकत घेतो असेही काही लोक म्हणतात म्हणोत बिचारे. प्रश्न आहे या व्यक्तींना या देशात राहणे आवडते का? त्यांच्या योग्यतेचा मान त्यांना मिळतो का? परके म्हणून आजुबाजूच्या व्यक्ती त्यांचा दुस्वास करतात का? अल्बर्ट आइनस्टाइन यांना जर्मनीहून प्रिनस्टन विद्यापीठात आल्यावर सन्माननीय वागणूक देण्यात आली नोबेल पारितोषक विजेते फ्रान्सचे पॉल डिरॅक फ्लोरीडा विद्यापीठात पदार्थविज्ञानाचे प्रोफेसर आहेत, आणि आपले प्रोफेसर खुराना तर सर्वांनाच माहिती आहेत. सध्या तेथील

प्रथितयश विद्यापीठात नोबेलचे मानकरी असलेले पाच सहा प्राध्यापक तरी असतात सगातात म्हणतात की गुरू जितका तैय्यार तितकी शिष्याची कसोटी कठीण मला तर वाटतं हे सर्वच विद्याभ्यासात खरं आहे जगातील कोणत्याही हुषार विद्यार्थ्याला गॅलब्रेथ, वुडवर्ड, खुराना, फॅनो, वॅगनर यांच्याकडे काम करायला मिळालं, तर आनद व अभिमान वाटणारच व त्यासाठी ता सतत प्रयत्न करणार. म्हणजे ही मोठी माणसे आली की ती आपली विद्वान परंपरा स्थापणार आणि पुढील वीस पचवीस वर्षे जगातील साऱ्या हुषार विद्यार्थ्यांना ते अमेरिकेत आपल्या विद्वत्तेने ओढून आणणार. म्हणजेच विद्वत्तेचे माहेरघर येथे सदोदित राहणार या मान्यवरांचे आणखी एक वैशिष्ट्य आहे पारितोषकांचे मानकरी झाल्यावरदेखील याच्या कामात ढिलाई नाही. कुचराई नाही, कंटाळा नाही.

हे राष्ट्र 'उद्याचे' राष्ट्र आहे तुम्ही 'आज' काय करता याला किंमत आहे. मात्र तुम्ही 'काल' काय केले हे येथे कस्पटासमान आहे. मी मॅट्रिकमध्ये पहिल्या दहात होतो पण त्यानतर पुढील पचवीस वर्षे कोणतेही भरीव कार्य केले नसले तरी चाळीसाव्या वर्षी मॅट्रिकचाच मोठेपणा मिरविणाऱ्याना येथे फारशी किंमत नाही याच एकच स्पष्ट कारण मला दिसते. त्यानी परपरा, आईवडिलाचा मोठेपणा हा आपल्या अगाला चिकटूच दिला नाही हे फार कठीण आहे पण या राष्ट्राला ते फारसे कष्ट न करता जमले आहे. आपल्याला दोन हजार वर्षांची परंपरा आहे त्याना फक्त तीनशे वर्षांची ! बरे युरोपातील निरनिराळ्या देशातून आलेली ही मंडळी आई फ्रेंच तर वडील आयरिश असा सर्वदूर प्रकार एखाद्या पारपारिक गोष्टीचा अभिमान बाळगावा असे जीवनात काही फारसे घडलेच नाही. बर परक्या देशात नाव कमवायचे तर कष्ट करणे आवश्यकच असते येथे आल्यावर सर्व लोकांनी खूप कष्ट केलेत त्यांना साथ दिली निसर्गाने, जमिनीने, वेळेवर येणाऱ्या पावसाने, निरनिराळ्या देशातून आलेली ही मडळी मात्र एका समृद्ध जीवनाच्या प्रयत्नात राहिलीत. सचोटी व कष्ट हाच त्यानी खरा धर्म मानला. या राष्ट्राचे मोठेपण यातच आहे.

तुम्ही आज काय करता यावरच माणसे जोखली जातात म्हणून दरवर्षी काहीतरी नवीन करण्याकडे प्रत्येकाचा कल असतो. पुढे जाण्यासाठी धडपड असते. येथे जीवनाची सुरक्षितता आहे स्वतःचा, कुटुंबाचा विमा आहे, अपघात वगैरे झाला तर मेडिकल 'ट्रिटमेंट' अप्रतिम आहे अद्यावत साधनानी शोभित निसर्गरम्य घरे आहेत. घरात airconditioning आहे heating आहे. म्हातारपणी सोशल सिक्युरिटी आहे, खाण्यापिण्यासाठी मुबलक आहे, जगात कुठेही बोलायला टेलिफोन आहे रंगीत टी व्ही आहे. खर म्हणजे या सर्व सुखसोयी असल्यामुळे माणस सुखासीन व्हायला हवीत, ऐषआरामी व्हायला हवीत, आळशी व्हायला हवीत ती तशी झालेली नाहीत यातच या राष्ट्राचे निराळेपण आहे याच कारण म्हणजे इतकी सुबत्ता असूनही येथे एक प्रकारची सतत असुरक्षितता आहे नोकरी मिळणे सोपे आहे पण ती टिकविणे महाकठीण आहे थोडा देखील आळशीपण केला, कामात कुचराई केली की तुम्ही वेटर असा अथवा मोठ्या बँकेचे डायरेक्टर असा, तुम्हाला fire केलेच जाईल. पधरा दिवसाची नोटीस देऊन नोकरीतून काढण्यात येते व माझ्या माहितीप्रमाणे यावर अपील करता येत नाही किंवा कोणी करत नाही. नव्या नोकरीसाठी प्रयत्न करताना जुन्या मालकाचे सर्टिफिकेट नवीन मालक मागतो असे सर्टिफिकेट तुमच्या हातात कोणी देत नाही आपले मत नवीन मालक जुन्याला फोनवर परस्पर सांगतो तुम्हाला हवा असलेला हुषार आहे पण कामचुकार आहे, कष्टाळू आहे पण सागकाम्या आहे अशा प्रकारचे त्याचे स्पष्ट मत तो सागेल व नवीन मालक यावर सपूर्ण विश्वास ठेवेल. यामुळेच कुठल्याही बॉसशी माझे खडाजगी झाले व अशी साल्याची खरडपट्टी काढली असे अभिमानाने तेथे सांगता येत नाही.

प्राध्यापकांना तीन वर्षाच्या नोकरीनतर कायम करण्यात येते. या तीन वर्षात आपल्या विषयाखेरीज कुठल्याही विषयात त्याने लक्ष घालू नये अशी अपेक्षा असते. किंबहुना कायम व्हायचे असेल तर असे करण्याखेरीज त्याला गत्यतर नसते. हॉर्वर्डसारख्या नामवंत विद्यापीठाची गोष्ट तर मनाला चटका लावून जाते. Ph D मिळविण्यासाठी आठवड्याच्या

सहा दिवस दररोज दहा बारा तास काम करायचे, निरनिराळे Courses करायचे, त्यांच्या परीक्षा द्यायच्या. प्रत्येक परीक्षेत ७५% पेक्षा ज्यास्त मार्क मिळाले तरच संशोधनाला प्रत्यक्ष सुरवात करायची अशी सतत चार वर्षे घालवायची त्यानंतर पोस्टडाक्टरल रिसर्च तितक्याच नेटाने एक दोन वर्षं करायचा या सर्वातून जो तावून सुलाखून निघतो आणि जो खरोखर हुषार असतो त्यालाच फॅकल्टीवर घेण्यात येते. बर फॅकल्टीवर आल्यानंतर तरी या रामरगाड्यातून सुटका आहे का ? तीन वर्षे पुनः तसलेच कष्ट केलेत तरच नोकरी 'कायम' या तीन वर्षात काय काम केले. संशोधन कुठल्या दर्जाचे आहेत हे ठरविणार कोण तर वुडवर्ड आणि गॅलब्रेथसारखे विद्वान त्याचे समाधान झाले तरच तुमच्या नोकरीची निश्चिती. हॉर्वर्डमध्ये म्हणूनच गमतीने म्हणतात आयुष्याच्या ऐन उमेदीची नऊ दहा वर्षे सतत दररोज दहा बारा तास संशोधनासाठी तुम्ही व्यतीत केली की संशोधन करणे हा तुमच्या अगदी रक्ताचा गुणच होऊन जातो किंबहुना उरलेल्या आयुष्यात तुम्ही इतर काहीही करण्यास योग्यच राहत नाही.

हॉर्वर्डची परीक्षा पद्धतही एकदम अनोखी. तेथून Ph.D झालेले अर्ल बामस्टार्क सांगत होते तुम्ही अचूक उत्तर दिले तरी तुम्हाला पास होण्याइतकेसुद्धा गुण देणार नाहीत. 'अ' ह्या कार्बनिक पदार्थापासून 'म' हा संयुक्त यौगिक कसा मिळवाल ? अशा प्रश्नाला अगदी झपाझप तुम्ही एका मार्गाने 'अ' पासून म' मिळविण्याची प्रक्रिया दिली तरी पास होणे कठीण आहे 'अ'पासून ज्या कित्येक मार्गांनी 'म' मिळविता येईल प्रत्येक मार्गात ज्या अडचणी, उपमार्ग येतील ते सर्व तुम्ही दाखविलेत व हे करताना तुम्हाला कदाचित म' मिळू शकला नाही तरी तुम्हाला सर्व गुण मिळू शकतील म्हणजेच तुमची दृष्टी चौफेर हवी, निरनिराळ्या मार्गांची तुम्हाला माहिती हवी मुख्य म्हणजे अगदी पाठांतर करून एक-मार्गी जाऊन 'म' ला मिळविणारा मनुष्य थोर शास्त्रज्ञ होऊ शकत नाही ह्याबद्दल तेथे कोणाचेच दुमत नाही

उच्च शिक्षणाची ज्याना आवड आहे तेच कॉलेजमध्ये येतात. मॅट्रीक

झाल्यावर कॉलेजमध्ये येण्यापूर्वी सोळा सतरा वर्षाचा हा विद्यार्थी ग्रोसरी स्टोअर, ड्रग स्टोअर, किंवा गॅस स्टेशनवर नोकरी करून पुढील शिक्षणा-साठी डॉलर्स जमवितो पैसा वडिलांकडून आलेला नसतो, स्वतः कमा-विलेला असतो म्हणून प्रत्येक डॉलरचे महत्त्व असते. शिवाय आजुबाजूच्या मान्यवर व्यक्तींसारखे मोठे व्हायचे असेल, अगदी अमेरिकन सुखात रहावयाचे असेल तर आपल्याला खूप पगार मिळायला हवा ही जाणीव प्रत्येकाला असते. यश हव म्हणून कष्ट हवेच हे सर्वांचे सूत्र आहे यामुळेच शाळेत उडारलेली ही मुल जादूची कांडी फिरल्यासारखी अभ्यासू होतात. वर्गात शांतपणे बसतात प्रत्येक गोष्ट समजावून घेतात प्रत्येक पुस्तकाच्या प्रकरणाच्या शेवटी दिलेले प्रत्येक उदाहरण सोडवायचा प्रयत्न करतात प्रत्येक टेस्टमध्ये जास्तीत जास्त मार्कस् मिळविण्याचा प्रयत्न करतात तो एकाच जिद्दीने–श्रीमंत होण्यासाठी, यशस्वी होण्यासाठी

हे राष्ट्रच businesslike आहे आपण गुरुला जसा मान देतो तसा तिकडे कोणी देताना आढळत नाही. खुर्चीत बसलेला विद्यार्थी प्रोफेसर समोरून आले म्हणून उभा राहणार नाही इतकेच काय तो आपल्या बोटातील पेटलेली सिगारेट सुद्धा फेकणार नाही प्रोफेसर उभे, विद्यार्थी बसलेला पाहिले की मला विचित्र वाटायचे वर्गात सुद्धा विद्यार्थी कोक किंवा कॉफी पीत असतो शिवाय त्याने पाय लांब केलेला असतो असा विद्यार्थी प्रथम आपणाला उद्धट वाटतो पण हाच सर्व वर्गात होतकरू व नम्र असू शकतो प्रोफेसरांना प्रश्न विचारताना कोणीही उभे राहत नाही व पिरीयड झाला की ‘ डेव्हिड आज फार चांगलं शिकविलेस ’ असेही कोणी म्हणतो शिकविणे हा प्रोफेसरांचा धंदा आहे. शिकणे हे आपले काम आहे त्याचे काम त्याने चांगले करावे ही अपेक्षा, आपणही चांगले शिकावे ही इच्छा यात आदराचा, मानाचा प्रश्न येतोच कुठे ? हे तत्त्व ! graduate च्या विद्यार्थ्यांना जवळपास एक महिना मी भौतिक रसायन-शास्त्र शिकविले माझे उच्चार समजणे त्यांना कठीण जात असेल पण एकही आवाज, शिट्या, गडबड माझ्या वर्गात झाली नाही कोणीही उगाच jokes केल्या नाहीत. मला भडावून सोडले नाही. त्यामुळे शिकविण्यात

येथल्याप्रमाणे तेथेही एक आगळाच आनंद मिळाला. या शिकविण्यामुळेच जवळपास तीस चाळीस तरुण मुलांना मी अगदी जवळून पाहू शकलो गप्पा मारू शकलो मला या मुलांनी 'परका' म्हणून कधीही वाईट वागणूक दिली नाही अजाणता अथवा जाणूनबुजून देखील माझी गमत करायचा प्रयत्न केला नाही या सर्व तरुणांचे devotion, seriousness मला दिसून आले व त्याचेबद्दल एकूणच माझ्या मनात आदराची भावना निर्माण झाली

तास सुरू होण्याचे आधी सर्व विद्यार्थी वर्गासमोर बसलेले असतात सर्वांनी एकत्र उभे राहून मोठ्याने हसायचे, मोठ्याने बोलायचे ही पद्धत नाही प्रत्येकजण फक्त आपल्या मैत्रिणीशी गप्पा मारीत असतो, तीही हळू आवाजात बरेचसे विद्यार्थी मांडीचे फतकल मांडून हातात पुस्तक उघडून वाचीत असतात कोणी उदाहरणे सोडवित असतात. हातात सिगारेट असते, बाजूला कॉफीचा कप ठेवलेला असतो, समोर पुस्तक, शेजारी कॅलक्युलेटर असा सारा जामानिमा असतो शिवाय पुस्तकांनी भरलेली एक बॅग असते ती बाजूला ठेवली असते क्वार्टर सुरू होण्याचे आधीच विद्यार्थी सर्व टेक्स्ट पुस्तके विकत घेतात. Syllabus मध्येच प्रत्येक विषयाचे अतिशय चांगल्या प्रकारे लिहिलेले पुस्तक text book म्हणून दाखविले असते. हे पुस्तक विद्यार्थी व शिक्षक वर्गात आणतात प्रोफेसर शिकवीत असताना मुले पान उघडून त्यातील समिकरणे पाहात असतात ते प्रकरण संपले की त्याचे शेवटी असलेली काही उदाहरणे प्रोफेसर वर्गात फळ्यावर सोडवितात. उरलेली खूपशी उदाहरणे मुले घरी सोडवितात एकच चागले पुस्तक वापरायचे मात्र त्यातील प्रत्येक ओळन् ओळ समजली पाहिजे असा प्रयत्न करण्यात येतो सर्व उदाहरणे सोड विणारे हे सर्व विद्यार्थी फार बुद्धिमान असतात असे नाही ते असतात सर्वसामान्य, पण शाळेतूनच त्याना उदाहरणे सोडविण्याचे शिक्षण दिलेले असते या training चा किती परिणाम होतो ते माझ्या Ph D करणाऱ्या मित्राच्या अनुभवावरून मला समजले. ते भारतातून एम. एस्सी झालेत. मॅट्रीक पासून ते एम एस्सी पर्यंत नेहमी पहिल्या तिघात, अगदी संपूर्ण विद्यापीठातून, येत असत. अमेरिकेत गेल्या गेल्या ते पहिल्या

टेस्टला बसले तेव्हा त्याना प्रथम प्रश्नच समजले नाहीत ह्या परीक्षेत त्याना १०० पैकी फक्त एकोणवीस गुण मिळालेत, ते अक्षरशः रडकुंडील आलेत कारण इतर सर्व विद्यार्थ्यांना पन्नासचे पुढे मार्कस् होते. त्यानतरा मात्र अशी गोष्ट घडली की ह्यामुळे आमचे मित्र अक्षरशः गदगदून गेले प्रोफेसरांनी त्याना आपल्या खोलीत बोलाविले व सरळच विचारले, ' तुला माझे शिकविणे समजत नाही का ? तुला हे problems का जमत नाही ' आमचे मित्रांनी मोकळेपणाने आपण अशा प्रकारचे Problems पूर्वी कधीही सोडविलेले नाहीत, त्यामुळे ते चटकन् कसे करावेत ते मला समजत नाही असे सांगितले प्रोफेसर म्हणालेत, ' ठीक, मी तुला पुस्तक देतो. ह्यातील पहिल्या प्रकरणातील पहिले दहा Problems सोडवून आण उद्या दुपारी ११ वाजता मला आणून दाखव ' सारी रात्र जागून आमच्या मित्राने ते काम अर्धवट पूर्ण केले प्रोफेसरानी दुसरे दिवशी सर्व Problems ची उत्तरे पाहिलीत. नवीन दिशा दाखविली व आपल्या विद्यार्थ्यांत आत्मविश्वास निर्माण केला हे असं सतत एक-दीड महिना चालू होते. आमच्या मित्राची प्रगती झाली व त्यांना सत्तर ऐंशी मार्क मिळू लागलेत या यशाचे सारे श्रेय प्रोफेसरांचे येथे हे प्रोफेसर होते नोबेलाचे मानकरी प्रोफेसर वॅगनर

आपल्याकडे शाळेत शिकविताना पतोजी प्रत्येक गोष्ट घोटून घेत असत इतकी उदाहरणे सांगत, इतके वेळा पाढे लिहायला देत की पुनः पुन्हा करून ते सार पाठ होऊन जाई ही पतोजी पद्धत तिकडे Ph D साठी वापरतात, आपला विद्यार्थी त्याच्या विषयात पारंगत झालाच पाहिजे यासाठी कष्ट करतात म्हणूनच की काय लिनीस पॉलींगसारखे नोबेलाचे मानकरी अंडरग्रॅज्युएटचे वर्ग घेतात. अगदी सोप्या रासायनिक प्रक्रिया मन लावून शिकवितात ज्ञानदानाचा हा वसा आहे तो तितक्याच चिवट-पणे चालवायला हवा हे शास्त्रज्ञ, हे प्रोफेसर म्हणजे आपल्याकडील पूर्वीचे ऋषी मुनीच. अतिशय कठोरपणे वैयक्तिक प्रेमाला शिक्षणाच्या कामात कुठलाही थारा न देता ते निष्ठेने करणारी ही सारी सन्माननीय मंडळीच राष्ट्राला पुढे नेत आहेत.

वर्षांचे एकूण चार quarters सप्टेंबर ते डिसेंबर fall, जाने ते मार्च winter, एप्रिल ते जून spring व जून ते सप्टेंबर summer quarter प्रत्येक विद्यार्थी पहिल्या तीन क्वार्टर्समध्ये शिकतात व समर-मध्ये नोकरी करतात किंवा विश्रांती घेतात प्रत्येक विद्यार्थी साधारण प्रत्येक quarter ला दोन किंवा तीन कोर्सेस करतात प्रत्येक कोर्सला विशिष्ट credit hours असतात साधारण दरवर्षी ४५ credit hours केल्यास चार वर्षाची एकूण १८० credit hours होतात व graduation मिळते ५ credit तासासाठी चाळीस तासाचा कोर्स असतो, या प्रत्येकात जे मार्कस् मिळतात ते जमा होत शेवटी degree मध्ये grade मिळते तीन courses घेतलेत तर आठवड्याला नऊ थिअरीचे पिरीयडस् व लॅबवर्क सहा तासांचे असते. विषयांचे combinations मजेशीर असते. English literature, Chemistry and Folklore हे एकाचे विषय तर Physics, Music and History दुसऱ्याचे पहिल्याला शास्त्रज्ञ व्हायचे पण इंग्रजी कथा लिहिण्याची आवड आहे तर दुसऱ्या महाशयांनी संगीताचे विज्ञान समजण्यासाठी पदार्थविज्ञान हा विषय घेतला आहे कोर्सेस खूप प्रकारचे असतात आमचे विद्यापीठात Public speech making, Disco dancing, How to appreciate a movie, Typewriting, Pottery अशा प्रकारचे चौफेर विषय होते.

एकदा कोर्स सुरू झाला की पहिल्याच तासाला प्रोफेसर पूर्ण अभ्यासक्रमाची कल्पना देणार हा अभ्यासक्रम 'त्या' प्रोफेसरानी आखलेला असतो म्हणून त्याचे ते मुखत्यार असतात त्यांचा अभ्यासक्रम जितका चांगला, उपयोगी तितकी त्याच्याकडे विद्यार्थ्यांची गर्दी असणार. पहिल्याच तासाला संपूर्ण परीक्षेबाबतचे एक सायक्लोस्टाइल टाइमटेबल प्रोफेसर प्रत्येक विद्यार्थ्याला देणार पहिल्या पंधरवाड्यातच पहिली टेस्ट असते प्रश्न प्रोफेसरांनीच काढलेले असतात मुले आपल्या वह्यांची पाने फाडतात व पेन्सिलने उत्तरे लिहून काढतात बऱ्याच वेळा प्रोफेसर प्रश्न-पत्रिका वाटून निघून जातात. मुले उत्तरे लिहीत असताना स्वतः तेथे थांबत नाही. आजकाल मात्र थोडा काळ बदलला आहे, पूर्वी म्हणजे आठ-

दहा वर्षांपूर्वी ही मुले एकमेकाची, पुस्तकाची मदत घेणार नाहीत ही खात्री होती आता ती इतक्या प्रमाणात राहिलेली नाही उत्तरपत्रिका तपासून प्रोफेसर विद्यार्थ्यांना त्या परत देतात व स्वतःच्या वहीत विद्यार्थ्यांनी मिळविलेले गुण लिहून ठेवतात याशिवाय या सर्व प्रश्नांची model answers स्वतः लिहून काढतात व आपल्या खोलीसमोर चिकटवून ठेवतात आपल्याला मार्कस् का कमी पडलेत हे कोणताही विद्यार्थी समजू शकतो

या समाजातील एकमेकांचे संबध अगदी औपचारिक म्हणून कोणीही दुसऱ्याचे मार्कस् विचारीत नाहीत दुसऱ्याचा पगार व मार्कस् विचारू नयेत हा येथील सर्वसाधारण संकेत. तो सर्वजण पाळतात. आपल्याकडे याचे फारच कुतूहल अटलांटाचे भार्गवे गतवर्षी आग्रा पाहाण्यासाठी ताज एक्स्प्रेसने जात होते त्याच्या सामानावरून ते 'अमेरिकेचे' वाटत होते 'क्या अमेरिकासे आये हो ?' शेजारच्या प्रवाशाने प्रश्न केला. यांनी मान हलविल्यावर ताबडतोब दुसरा प्रश्न 'वहाँ क्या करते हो ?' मैं इंजिनियर हूँ' हे भार्गवे यांचे उत्तर पूर्ण होण्याच्या आतच पुनः प्रश्न 'तो फिर बहोत बडे आदमी हो कितनी तनखा मिलती है ?'

'खानेपिनेके लिये काफी इतनी'

'नहीं, जी कितने डॉलर्स ?'

'ये डॉलर्स मालूम होनेसे आपको क्या फायदा ?'

'कुछ नहीं जी, यूँही पूछ रहा था' अगदी भाबडेपणे सहप्रवासी उत्तरलेत त्याचे 'सहज' विचारतो, हे उत्तर अगदी बिनचूक खूप गोष्टी आपण सहज करतो पण त्याचा कोणाला त्रास होईल याचा विचार करीत नाही

क्वार्टर संपण्याच्या दोन आठवडे आधी एक टेस्ट देतात तो प्रकार मात्र मला अभिनव वाटला या टेस्टचे नावच आहे Take Home Test. नेहमीप्रमाणेच पाच problem असतात पण प्रत्येक problem सोडविण्यासाठी बरीचशी पुस्तके वाचावी लागतात. निरनिराळे स्थिरांक काढावे लागतात. ह्या प्रश्नपत्रिका म्हणूनच घरी घेऊन जायच्या व चांगल्या

आठ दिवसांनी सर्व उत्तरे लिहून आणायची प्रत्येक उदाहरण कठीण असते. ते सोडविण्यास स्वतंत्र विचाराची आवश्यकता असते गमत म्हणजे प्रत्येक 'विद्यार्थी आपले काम करीत असतो मित्राला उत्तरे विचारीत नाहीत विचारलीच तर कोणी सांगणार नाही हे असे का होते ? ते परीक्षा पद्धतीमुळे कारण या उत्तरपत्रिका तपासण्याची पद्धत एकदम वेगळी आहे सर्व वर्गात एकाच विद्यार्थ्याने पाचही उत्तरे अचूक सोडविली तर फक्त त्याला एकट्याला +A मिळतो समजा कोणीही सर्व उत्तरे मिळवू शकला नाही सर्वांनीच तीन प्रश्न सोडविलेत तर प्रत्येकाला +A मिळणार प्रत्येकाला आपण सर्वांच्या पुढे असावं ही मनोमन इच्छा व म्हणूनच आपली उत्तरे कोणी कोणाला सांगत नाही, आमच्या लॅब-मधील स्टीव्हला त्याचा एक मित्र उत्तरे विचारण्याकरिता आला तेव्हा आपण प्रश्न सोडविलेच नाही असे म्हणून स्टीव्हने त्याला कळविले व मला येऊन सांगतो कसा, Dr Jag, he has no business to ask me ज्या दिवशी उत्तरपत्रिका दाखल करायच्या त्या दिवशी स्टीव्हने प्रोफेसरांच्या खोलीत दरवाजा बंद असताना हळूच ती आत सरकविली

प्रोफेसरांना आठवड्यातील तीन तास तरी विद्यार्थ्यांसाठी बाजूला काढून ठेवावे लागतात त्या वेळात त्यांनी आपल्या खोलीतच असले पाहिजे व विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविले पाहिजेत अशी विद्यापीठाची अपेक्षा असते. विद्यार्थी कुठलेही प्रश्न विचारतो, त्याची उत्तरे शिक्षकाला यायला हवी वर्गात शिकविण्याइतकच या तासाचेही महत्त्व असते. आमच्या लॅबमध्ये काम करणाऱ्या एका विद्यार्थ्याला अती सोपा प्रश्न निर्माण झाला व तोच त्याने प्रोफेसरांना विचारला. प्रोफेसर, हा इतका साधा प्रश्न याने विचारला म्हणून त्याचेकडे पाहून कुत्सितपणे हसले. तेव्हा हा काही बोलला नाही पण तो लॅबमध्ये परत आला तो तावातावातच आणि मला म्हणाला, 'डॉ जॅग, माझा प्रश्न त्याच्या दृष्टीने सोपा असेल पण मला तर तो खरोखर होता म्हणूनच माझ्या प्रश्नाकडे पाहून हसण्याचा त्याला काय अधिकार ? खर म्हणजे आमचे प्रश्न सोडविण्यासाठीच तर याला पगार मिळतो !' मला त्याचा हा स्पष्टपणा आवडला. अगदी B Sc. होई-

पर्यंत प्रोफेसरांच्या कॉमनरूममध्ये साध्य डोकावण्याची आम्हाला लाज वाटायची आणि M Sc. ला असतानाही कोणाशीही विषयाव्यतिरिक्त कुठल्याही विषयावर आम्ही बोललो नसू. आम्हाला अमेरिकन जीवनातला स्पष्टपणा अगोचरपणासुद्धा वाटेल पण माझा मित्र जे म्हणाला अगदी तीच वाक्ये विद्यापीठाच्या Signal नावाच्या साप्ताहिकात एका विद्यार्थ्याने लिहिलीत प्रोफेसर मंडळी संशोधनात मग्न राहातात लायब्ररीत असतात, असू द्यात. पण त्यांनी आठवड्याच्या त्या तीन तासात आपल्या खोलीतच का राहू नये कारण शेवटी आम्ही आहोत म्हणूनच ते येथे आहेत

संपूर्ण विभाग म्हणजे एक क्लब आहे या दृष्टीने त्याकडे पाहण्यात येते हा क्लब कुठल्या दर्जाचा आहे हे तेथील प्राध्यापकांच्या गुणवत्तेवरून, त्यांच्या शिकविण्याच्या पद्धतीवरून, संशोधनाच्या प्रसिद्धीवरून ठरविले जाते त्यामुळेच कुठलाही नवीन सभासद या क्लबमध्ये घेण्यासाठी आधीच्या या सर्व मेंबरलोकांची संमती घेणे आवश्यक असते. आमच्या विद्यापीठात जीवरसायनशास्त्राच्या असोशिएट प्रोफेसरची जागा भरावयाची होती तेव्हाची गोष्ट. पाच उमेदवारांना वेगवेगळ्या वेळेस बोलाविले गेले. प्रत्येकाने आपल्या संशोधन कार्यावर आधारीत एक सेमिनार दिला सर्व प्राध्यापक व विद्यार्थी या वेळेस उपस्थित होते सेमिनार संपल्यावर श्रोत्यांनी खूपसे प्रश्न विचारलेत या पाचही सेमिनारांना मी उपस्थित होतो कॅलिफोर्नियाहून आलेले डॉ जॅक डेव्हीस यांचा सेमिनार मला आवडला. मुख्यतः हे चांगले शिक्षक होऊ शकतील असं त्यांच्या बोलण्याच्या धाटणीवरून मला वाटले.

फॅकल्टी क्लबची मिटींग, हे सर्व सेमिनार आटोपल्यावर झाली सर्वानुमते जॅकला घ्यावे असे ठरले. त्यांना appointment letter पाठविल्याचे मला समजले तेव्हा विद्यापीठातील सर्व प्राध्यापकांच्या सचोटीबाबत माझा आदर दुणावला आपल्या विभागाचे मोठेपण टिकविण्यासाठी ही माणसे किती जातीने लक्ष देतात हे पाहून अक्षरशः मी हेलावून गेलो.

# ५. तंत्रज्ञानाची झेप आणि कम्प्युटरच्या लीला

औषधीशास्त्र, प्रायोगिक संशोधन, अंतराळसंशोधन व त्याच्याचबरोबर प्रगत झालेले कम्प्युटर विज्ञान या सर्वांमधून तंत्रज्ञानाची उच्चतम प्रगती झालेली दिसून येते औषधिशास्त्राचेच उदाहरण घेऊ

न्यूयॉर्कच्या सबवेमध्ये हाणामारी गुन्हेगारी खूपच असते असे ऐकले होते पण परवा ती साही घटना पाहिली आणि त्या सागण्यावर तर विश्वास बसला पण अमेरिकेत विज्ञानाची जी 'अस्ट्रोनट झेप' घेतली तिचे साथं दर्शनही झाले सकाळी ९-२० च्या ट्रेनसाठी, प्लाटफार्मवर एक मुलगी उभी होती. गाडी येता क्षणीच तिला कोणीतरी मागून अक्षरश: ढकलून दिले ती खाली पडली आणि तिचा हात अगदी धडावेगळा दूर झाला ९-२४ मिनिटाला पोलीस आलेत. त्यानी तिला तपासले, मुलगी बेशुद्ध होती तिचा तो तुटलेला हात उचलून त्यांनी बर्फाच्या पिशवीत ठेवला. ९-३० ॲम्बुलन्समध्ये ती व तिचा तुटलेला हात घेऊन ते स्टेशनवरून निघालेत व बरोबर ९-४४ ला मोठ्या हॉस्पिटलमध्ये आलेत त्यानंतर सारी तपासणी-मुलगी शुद्धीवर आली तिचा हात जोडण्यासाठी डॉक्टरांनी ऑपरेशन करायचे ठरविले. ऑपरेशन दुपारी अकराच्या सुमारास सुरू झाले व दुपारी ३-३० वाजता त्या मुलीचा तो हात 'मायक्रोसर्जरी'ने पुन: धडाशी जोडला गेला व तो हात खऱ्या अर्थाने जीवत झाला

ज्या व्यक्तीने तिला ढकलण्याचे अघोरी कृत्य केले तिची निंदा कठोर शब्दातच करायला हवी. मात्र त्याच दमात व तितक्याच आवेशात अमेरिकन डॉक्टरांचे व तेथील मेडीकल सायन्सने जी अविश्वसनीय प्रगती केली आहे त्याची स्तुती करायला हवी. किंबहुना अमेरिकन समाजात क्राइम आणि तन्त्रज्ञानांची प्रगती याचे एक विलक्षण द्वैत आढळते नुसत्या

---

'मराठवाडा' औरंगाबाद याच्या सौजन्याने

गुन्हेगारीच्या घटनाच उगाळीत राहिलोत तर तेथील जीवन अंधःकारमय दिसते मात्र विज्ञानाच्या प्रगतीचे व त्यान्वये निर्माण झालेल्या मोठमोठ्या किंवा लहानथोर उपकरणांची गती पाहिल्यास या समाजाची बौद्धिक प्रगती समजते

व्यवस्थित निरीक्षण आणि त्यानतरचे तर्कसंगत अनुमान ही वैज्ञानिक प्रयोगाची महत्त्वाची बाब, निरीक्षणे घेताना सर्व प्रकारच्या, वेगवेगळ्या परिस्थितीत ती असावी व या सगळ्या मूल्याचा parameters व शेवटी मिळत असलेल्या उत्तरांवर काय परिणाम होतो याचा सर्वांगीण व सर्वंकष अभ्यास हा तर अत्यत आवश्यकच यामुळेच हॉस्पिटलमध्ये रोग्याच्या रक्तपासणीसाठी रक्ताची दोन सॅम्पल्स घेतात, तर लघ्वीची तीन सॅम्पल्स तीन अलग प्रयोगशाळेत पाठवितात प्रयोगशाळाहून सर्व निष्कर्ष कम्प्युटरच्या सहाय्याने ओ पी डी. मध्ये डॉक्टराच्या खोलीत येत असतात तीनही प्रयोगशाळामधून लघ्वीचे जे मोजमाप केले असते त्यातील प्रत्येक कार्बनिक संयुक्त पदार्थाची किमत भारात्मक तसेच गुणात्मक, या तीनही प्रयोगशाळांतून सारखीच यायला हवी ज्युनिअर डॉक्टरांनी तपासल्यानतर, तो आपले सारी निरीक्षणे कागदावर लिहून काढतो किंबहुना टेस्ट पॉझिटीव्ह किंवा निगेटीव्ह मिळो, ती लिहून काढण्याचा कल येथे स्पष्ट दिसतो. त्यात प्रत्येक निरीक्षणांची नोद घेतलेली असते यानतर रोग्याला सिनियर डॉक्टर तपासतात त्याची संपूर्ण पाहणी झाली की मग ते ज्युनियरशी चर्चा करतात व त्यांचाही जो वेगळा निष्कर्ष असेल तो अलग कागदावर लिहून काढतात सिनियर डॉक्टर निघून जातात व मग ज्युनियर डॉक्टर शांतपणे तुमची केस तुम्हाला समजावून सांगतात तुम्हाला काय झाल असाव ? सर्व परीक्षानतर डॉक्टर कुठल्या निष्कर्षाप्रत आले ? तुम्हाला काय treatment देणार ? यामुळे साधारण तब्येत केव्हा चागली होईल या सर्व गोष्टी अगदी शांतपणे सागत असतात इतकच काय चांगले तीन-चार तास उभे राहून ऑपरेशन केल्यावर डॉक्टर बाहेर वाट पाहत असलेल्या पेशंटच्या जवळच्या नातेवाईकाला संपूर्ण ऑपरेशन कसे झाले म्हणजे कसे केले ते सागतात. या क्षणी पेशंटची स्थिती कशी आहे ते

सांगतात शरीर ज्या माणसाचं आहे त्याला आपल्या शरीरातील रोगाची माहिती डॉक्टर सांगतात डॉक्टरांना हे सांगणं तिकडे भागच असत. कारण सर्व रोगी शिकलेले असतात डॉक्टरांनी काही चूक केली तर ते डॉक्टरावर खटला भरतात व लाखो डॉलर्सच्या नुकसान भरपाईची मागणी करतात. म्हणून डॉक्टर सर्व आवश्यक परीक्षा करतात, अतिशय अद्ययावत उपकरणांची मदत घेऊनच रोगाचं निदान करतात त्यांचे निदान हे उपकरणांच्या माहितीवरच आधारीत असते स्वत:च्या intitution चा त्यात भाग नसतो. गमतीने डॉ पेंडसे मला म्हणाले होते, 'अमेरिकेतला कुठलाही प्रथितयश डॉक्टर आपल्याकडे यशस्वी प्रॅक्टीस करू शकणार नाही' कारण उपकरणांच्या मदतीशिवाय तो काहीच सांगू शकत नाही येथे तर आपल्याला सर्व प्राथमिक रोगांचं निदान, साध्या स्टेथॅस्कोपने कराव लागत आपण या डॉक्टरांचा हात चांगला अस म्हणतो, म्हणजेच त्याना रोगपरीक्षा अचूक आहे अस मानतो याचाच अर्थ त्यांची intitution अचूक असते हाच होतो.

मिसेस फडक्याना labourpains येताना खूप त्रास होत होता तिकडे पत्नीच्या अशा अवस्थेत तिच्या शेजारी पतीला दवाखान्यात बसण्याची परवानगी आहे किंबहुना त्याची ती नैतिक जबाबदारी आहे असं मानतात. मिस्टर फडक्यांना आपल्या पत्नीचे हाल पहावेनात, त्यानी तस डॉक्टराना सांगितल तस डॉक्टर म्हणालेत, लेबरपेनशिवाय डिलीव्हरी केली तर तुम्हाला चालेल काय ? दोघा नवराबायकोंची समती घेतल्यावर मिसेस फडक्याना एक इंजेक्शन दिल व कुठलाही त्रास न होता जयत फडके एका मुलाचे बाप झाले. सुनीता वहिनींना तो अनुभवच काहीतरी सांगून गेला सुहासिनीला त्या सांगत होत्या, खर म्हणजे सर्व स्त्रियांची अशीच सोपी delivery व्हावी इतका तो अनुभवच त्यांच्या मनावर बिंबला होता.

हॉस्पिटलमध्ये असलेल्या या अद्ययावत व्यवस्थेमुळे तेथे खर्चही फार दांडगा येतो ही सर्वसामान्य माणसांची तक्रार आहे मॅसॅच्युसेटस्च्या जनरल हॉस्पिटलमध्ये एका साधारण खाजगी खोलीसाठी १९० डॉ ची फी घेतात, तर ब्रुकलिनला ४०० डॉ , कारनेल मेडिकल सेंटरला कुठलेही

गुतागुतीचे नसलेल्या बाळतपणाला २८०० डॉ लागतात मेडिकलचा सध्याचा दरडोई खर्च ९२० डॉ इतका येतो हेही खर की सर्व बीलस् इशुरन्स कपन्याकडून दिली जातात पण याचा एकूण राष्ट्रावर फार भार होतो. सपूर्ण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ९ १% उत्पन्न नुसत्या या ' हेल्थकेअर '-साठी खर्च होतो मेडिकल कॉस्ट ही इतकी वाढण्याची प्रमुख कारणे दोन (१) रोग्याला डॉक्टर जी सागतात किंबहुना हुकूम देतात ती औषधे आणावी लागतात, (२) महागडी औषधे चटकन वापरून रोगी बरा व्हावा ही डॉक्टराची इच्छा असते

आपल्याच हॉस्पिटलमध्ये जास्त रोगी admit करता यावेत म्हणून प्रत्येक हॉस्पिटलमधील बेडस्ची सख्या जास्त तयार करतात संपूर्ण अमेरिकेत १ लाख बेड असे मानले तर त्याच्या २५% बेडस् कुठल्याही दिवशी वापरात नसतात म्हणूनच या रिकाम्या असलेल्या बेडसाठी जो खर्च होतो व पूर्वी झाला तो उरलेल्या ७५% रोग्याकडून ही हॉस्पिटले वसूल करतात

कुठल्याही हॉस्पिटलचा मोठेपणा तेथील अद्ययावत उपकरणे आणि यशस्वी नावलौकिकपात्र डॉक्टर्स यावरच अवलबून असणार प्रत्येक प्रकारच्या रोग्याला बचावण्यासाठी सर्व तऱ्हेची उपकरणे आणायची म्हणजे महागाचे काम समजा तुम्ही CAT नावाच सुपर क्ष किरण यत्र घेतलं, तर ते वापरण्यासाठी इतर आवश्यक साधनसामुग्री, जरूरीचे तज्ञ व त्यासाठी आवश्यक त्या सोई तुम्हाला करणच आवश्यक आहे पण अमेरिकेत एकूण मानवी जीवनाची किंमतच फार आहे आर्थिक सपन्नता असल्यामुळे अगदी कम्प्युटरायज्ड उपकरणेदेखील त्यांच्या मानाने फार महाग नसतात तेथे मशीन, उपकरणे महत्त्वाची नसतात असतो मानवाचा जीव ! म्हणून ५ मिलीयन डॉलर (जवळपास ४ कोटी रु )च मशीनच्या उपयोगाने सबध वर्षातून फक्त एक माणसाचा जीव वाचला असेल, म्हणजेच हे मशीन नसते तर हा पेशट प्राणास मुकला असता तरी अशा एका माणसासाठी हॉस्पिटलमध्ये हे अलौकिक मशीन असायलाच हव अस तेथे सर्वजण आग्रहाने प्रतिपादन करताना दिसतात. व्हिएतनाम

युद्धाच्या वेळेस काही विमाने किंवा जहाजे कायमचे जायबंदी झाल्यास फारसं कोणाला दुःख होत नसे मात्र अमेरिकन सैनिक मेल्याची बातमी आली तर सारी मंडळी दुःखाने चूर होऊन जायची. हार्वर्ड विद्यापीठातील वैद्यकीय अर्थशास्त्रज्ञ राशी फैन यांच्यामते वैद्यकीय उपचार हे शिक्षणासारख आहे खर्च होतो म्हणून त्यात काटकसर करा हे म्हणणे अयोग्य आहे, ते सुशिक्षित समाजाचे व्यवच्छेदक लक्षण राहणार आहे.

श्रीमंताजवळ कॅडिलाक असली किंवा समुद्रावर त्याच्या मालकीची ' यॉच ' नांगरून पडलेली असली आणि गरिबाजवळ साधी कार असली तरी हरकत नाही मात्र वैद्यकीय सोयी व मदत दोघांनाही एकाच प्रकारची मिळायला हवी

मानवी जीवनाची तेथे खरोखरच फार किंमत असावी म्हणूनच की काय ११० फूट उंचीवर एक कामगार अडकला–त्याच्या पायावर मोठा लोखंडी गर्डर पडल्यानंतर–त्याच ऑपरेशन करून त्याचा अडकलेला पाय शरीरापासून वेगळा करण्यासाठी डॉक्टराची एक टीम ट्रॉलीने तितक्या उंच गेली व तेथे त्यांनी ऑपरेशन केल. हे सर्व T. V. वर दाखविल अद्ययावत उपकरणांची सोय, डॉक्टराची जिद्द व अती सामान्य जीवाची समाजाला वाटणारी किंमत यामुळेच हे सारं झाल असाव, अस म्हटल्याशिवाय राहवत नाही

मायक्रोबॉयॉलाजी, जेनेटिक्स, बायोकेमेस्ट्री या शास्त्रातील नवनवीन संशोधनामुळे मानवी शरीरातील खूपच मोठी रहस्ये उलगडण्यात आली आहेत. डी. एन ए चे नियंत्रण करून संपूर्ण नवीन प्रकारचा मानवी समाज आपण निर्माण करू शकतो या डी एन ए ची एका विशिष्ठ प्रकारे बांधणी केल्यास, बास्केटबॉल खेळाडूंसाठी आवश्यक असलेली उंची व चपळाई असलेले खेळाडू तयार करता येतील तर दुसऱ्या एखाद्या रचनेमुळे अतिशय बुद्धिवान मानवांची जात निर्माण करता येईल. आवश्यक असलेले मानव, स्त्री किंवा पुरुष शिंप्याकडे माप देऊन आपण ज्या प्रकारे कपडे शिवून आणतो तसे माणसाची माप दिल्यास आवश्यकतेनुसार माणसे तयार करता येतील.

तुम्हाला हवे असलेले अपत्य तुम्हाला मिळू शकेल मुलगा हवा की मुलगी ? मुलगी असल्यास नाकीडोळी नीटस, खूपशी गोरी अगदी ग्रीक सौंदर्यवतीसारखीही तुम्हाला मिळू शकेल. तिला ॲलर्जी, ॲरथ्रॉइटीस पेनचा त्रास झाल्यास क्षणकाळात तो दूर करता येईल डायबेटीस, कॅन्सर तिच्यापासून कायमचे दूर राहतील. तिच्या शरीरात 'बायोनिक' ताकद निर्माण करता येईल, शरीरातील नादुरुस्त भाग केव्हाही दुरुस्त करून त्याला पूर्ववत करता येईल थोडक्यात म्हणजे अनंतकाल तारुण्याचा वरदहस्त तुमच्या या लाडक्या लेकीला मिळेल विज्ञानाची याच वेगाने प्रगती झाली तर इ स च्या २००० नंतर माणसाला मृत्यूची भीतीच राहणार नाही 'No more dying Now' असे शीर्षक असलेले एक पुस्तक माझ्या वाचण्यात आले तेही हेच सांगून गेले

अर्थात अमरपट्टा घेऊन आलेली ही मंडळी सुखी होतील का ? तो समाज सुखी, आनंदी असेल का ? तीच तीच माणसे सतत डोळ्यापुढे राहिल्यास इतरांना ते कंटाळवाणे होणार नाही का ? आणि अगदी एकदा मॅरेथॉन रेसचा जागतिक रेकॉर्ड अगदी साफ मोडणारी प्रजा निर्माण झाल्यावर, त्याच्या रेकॉर्डवर माणस सुखी राहतील का पुनः रेकॉर्ड मोडण्याचा प्रयत्न करतील ? हे सारे नंतरच सध्या फक्त विज्ञानाची प्रगतीच आपण पाहतो आहोत लहानसहान उपकरणे gadgets' आल्यामुळे खूपच सुविधा झाली 'स्लॉट मशिन्स' जागोजागी बसल्या त्यात २५ सेंट टाकले की कॉफी, कुकी, वेफर्स मिळण्याची सोय झाली एक डॉलरची नोट आत टाकली की चिल्लर देणाऱ्या यंत्रामुळे चिल्लरचा वांधा संपला. अमाप लाकूडफाटा, अमाप कागद त्यामुळे अति smooth tissuepaper, त्याबरोबरच लहान पोरांना सतत लागणारे डायपर आलेत. पेपरनॅपकीन्स, अल्युमिनियम फाईल, सेटेड पेपर, प्रयोगशाळेत कुठलीही वस्तू उचलण्यासाठी वापरणारे kimwipes चे पातळ कागद यामुळे सर्व-दूर स्वच्छता दिसू लागली. रेस्टॉरंटमध्ये हाताने कोणीही कुठलीही गोष्ट उचलत नव्हता. डोनट, केक उचलताना रेस्टॉरंटमधली मुलगी बटरपेपर वापरत होती सर्वदूर चकचकीतपणा आला रस्ते काळेशार झालेत. धूळ

संपलीच व्हॅक्युमक्लीनरमुळे घरातही धूळ राहिली नाही. Aircondition मुळे घरातली उपकरणे स्वच्छ राहू लागली स्थिर व्होल्टेज असलेल्या विद्युतचा अखंडप्रवाह असल्यामुळे उपकरणे चक्क झाली. विज्ञानातील 'gadgets'चा हा परिणाम झाला सुख, सुख म्हणतात ते हेच असे वाटू लागले.

अंतराळ यात्रेच्या प्रवासामुळे खर म्हणजे सारा वैज्ञानिक समाजच ढवळून निघाला अतिशय शुद्ध अवस्थेत धातू, alloys मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू झाले कम्प्युटरने यानाचे मार्ग मिळविणे सोपे होते म्हणून कम्प्युटरशास्त्राची प्रगती झाली इंजिनिअरिंग क्षेत्रात, इलेक्ट्रॉनिक क्षेत्रात, रॉकेट सोडण्याच्या पद्धतीत नवनवीन शोध लागू लागले. अंतराळात असतानाच यानाचे Docking म्हणजे एकमेकांना जोडणे सहजसाध्य झाले. यात अगदी नगण्य मापाची चूक होऊ न देण्याइतके अचूक तंत्रज्ञान राष्ट्राला मिळाले. अर्थात यासाठी खूप कष्ट, परिश्रम शास्त्रज्ञांनी केलेत, अंतराळवीरांना करावे लागलेत. चंद्रावर उतरताना, नवीन वातावरणात शिरताना पाहून तू भांबावला नाहीस का ? असे नील आर्मस्ट्रॉंगला विचारल्यावर तो उत्तरला होता

'बिलकुल नाही आम्ही पृथ्वीवर इकडे कृत्रिम चंद्र तयार केला होता. ज्या ठिकाणी आम्हाला उतरायचं होतं, त्याची हुबेहूब प्रतिकृती केली होती व या चंद्राच्या जागेवर दीडशे वेळा उतरण्याची प्रॅक्टीस मी केली होती. म्हणूनच खऱ्या चंद्रावर उतरताना तेथील प्रत्येक दगड खाच-खळगे माझ्या परिचयाचे होते.' आर्मस्ट्रॉंगचा आत्मविश्वास दांडगा होता.

आता तर 'स्पेसशटल' सुरू होणार, १९८० च्या ऑक्टोबरमध्ये ही उड्डाण करणार जेटविमानाच्या डोक्यावर ही शटल ठेवलेली असणार व काही उंचीवर (१८५ किलोमिटर) विमान गेल्यावर ही शटल जेट-पासून अलग होणार. जेटच्या वेगाचा तिला असा फायदा मिळणार हे सार अगदी अद्‌भुत वाटाव इतक आहे

तंत्रज्ञानाच साध प्रात्यक्षिक तेथील टेलीफोन व्यवस्थेत दिसून येते अटलांटा शहरात दहा लाख टेलिफोन्स आहेत फोनची सारी व्यवस्था

कम्प्युटर पाहतो त्यामुळे आपण नुसता नंबर फिरविला की तो आपोआप लागतो. फोनवर माणसे दिसत नाही एवढीच उणीव, बाकी आवाज अगदी स्वच्छ ऐकू येतो या फोनच्या सोयीमुळे अमेरिकेत कोणीही वडिलांना 'मी सुखरूप येऊन पोहचलो' असे पत्र टाकीत नाहीत. म्हणूनच नोकरी-निमित्त माणसं तीसचाळीस मैल दूर जातात पण मला वाटते ते सदैव घरीच असतात ते बायकोशी चटकन बोलू शकतात. शाळेत मुलाशी बोलू शकतात अमेरिकन जीवनाला जी एक विलक्षण गती आली आहे ती या सर्व तंत्रज्ञानाने मिळालेल्या सोयींचा दृश्य परिणाम अर्थात आपल्या सचोटीने नागरिकांनी या कार्याला हातभार लावला आहे ते विसरून चालता येणार नाही.

ही सारी गती समजण्यासाठी पाहू त्या कम्प्युटरच्या लीला व पाहू त्याचा आवाका

एअर इंडियाचे बुकिंग ऑफिस न्यूयॉर्कला आहे. इकडे साधे बसचे तिकिट आरक्षित करायचे असेल तर एक-दोन तास वेगळे काढावे लागतात तिकडे अटलांटाला सरळ घरातला फोन उचलावा व न्यूयॉर्कच्या बुकिंग ऑफिसचा सरळ नंबर फिरवावा या मोठ्या कंपन्यांचे टेलिफोन नंबर हे 'कॉल फ्री' असतात. म्हणजे कॉलचा खर्च कंपनी करते फोनची डायल बरोबर फिरवली की एका क्षणात न्यूयॉर्कहून आवाज येणार 'Good Morning Air India' आपणही Good Morning करून विचारायचे '२५ सप्टेंबरला येथून निघणाऱ्या विमानात जागा आहे का?' असा प्रतिप्रश्न केला की, काही तरी टाईप केल्याचा आवाज टेलिफोन-वरही स्पष्ट ऐकू येतो. न्यूयॉर्क ऑफिसच्या त्या रिसेप्शनिस्टजवळ कम्प्युटरला जोडलेले एक मशिन असते व त्या मशिनवर T V. च्या Screen सारखा साधारण एक फूट लांबीचा पडदा असतो. या मशिन-वरून ५ सप्टेंबरच्या फ्लाईटमध्ये किती जागा रिकाम्या आहेत हे ती कम्प्युटरला विचारते. आवाज एकदम थांबल्यासारखा. 'आहे, जागा रिकामी आहे.' 'उत्तम, पण आणखी असे पहा, दोन दिवस लंडनला थांबायचे आहे व ता ८ ची लंडनहून निघणाऱ्या फ्लाइटमध्ये जागा आहे का, ते सांगता का?'

पुनः टाईपचा आवाज...

'२८ ला नाही, सर्व फुल, पण २९ ला चालेल तर पाहा.'

'हो चालेल'

'तुमचा पत्ता सांगा, टेलिफोन नंबर सांगा.'

तुमचे आरक्षण निश्चित झाले. अगदी न्यूयॉर्कचेही व पाच हजार मैल असलेल्या लंडनचेही ! ही झाली जुलै महिन्यातली घटना तुमचा सर्व प्रवास कम्प्युटरच्या 'कायम स्मरणशक्ती'मध्ये साठविला गेला आहे. अतिशय हुशार, 'कामसू' विद्यार्थ्याप्रमाणे त्याने तो जपून ठेवला आहे तुम्ही मागाल तेव्हा तो तुम्हाला मिळेल.

सप्टेंबर उजाडला तिकिट आता घ्यायलाच हवे आरक्षण करताना नुसते सांगायचे तिकिटाचे डॉलर्स द्यायचे नाहीत, कोणीही मागत नाही सप्टेंबरमध्ये पुनः फोन करून आरक्षण चेक करायचे व ट्रायव्हल एजंटकडून तिकिट घ्यायचे. त्याने तिकिट दिले की न्यूयॉर्कला कळविणार व कम्प्युटर त्यांची नोंद ठेवणार, तिकिट हे प्रवासाच्या तारखेच्या आधी आठ दिवस घ्यायलाच हवे. हा विमानकंपन्यांचा नियम आहे १८ सप्टेंबरलाही तुम्ही पैसे भरले नाहीत तर २५ सप्टेंबरच्या यादीतून तुमचे नाव आपोआप पुसले जाईल, अशा प्रकारचे शिक्षण कम्प्युटरला दिलेले असते ही आहे कम्प्युटरची किमया ! दररोज ५०० प्रवासी मुंबईला जंबोने येतात. प्रवास करण्यापूर्वी तिकिट काउंटरवर दिले व काउंटरवरच्या माणसाने तुमचे आडनाव त्याच्या मशिनवर टाईप केले की तुम्ही जुलै महिन्यात दिलेल्या सर्व सूचना जशाच्या तशा दिसू लागतात. म्हणूनच कोणाशी बोलण्याचे काम नाही इकडूनतिकडे उगाच भटकणे नाही सरळ तिकीट दाखवा व विमानात चढा, इतके सोपे आणि सरळ.

प्रचंड स्मरणशक्ती असलेला कम्प्युटर हा जादूगार आहे याच्या वेगाचा आवाका समजण्यासाठी एक साधे उदाहरण घेऊ, महाराष्ट्राची लोकसंख्या अंदमासे चार कोटी समजा १८ वर्षे वयावरील नागरिकांची यादी आपण कम्प्युटरला दिली त्यात पुढील मजकूर आहे

(१) पूर्ण नाव (२) जन्म तारीख

(३) जन्माचे गाव (४) कायम पत्ता

जवळपास दोन ते अडीच कोटी लोकांची ही जंत्री आपण कम्प्युटरच्या डोक्यात साठवून ठेवली याबाबत एकच काळजी घेणे आवश्यक आहे व ती म्हणजे प्रत्येक नागरिकांची माहिती ज्या कार्डवर आपण 'पच करू ती अचूक असावी, व अचूक टाईप केलेली असावी, ही सर्व नावे एका लहानशा टेपवर कम्प्युटरच्या कायम स्मरणात आपण ठेवून दिली व या पूण रेकॉर्डला नाव दिले 'नागरिक' यापुढे केव्हाही तुम्ही नुसते 'नागरिक' असे टाईप केले की कॉम्प्युटरच्या 'कायम स्मरणातून' क्षणकालासाठी ते 'तात्पुरत्या स्मरणात' येईल व तुम्ही सांगाल ते काम कम्प्युटर करून दाखवील

वर्षाचे ३६० दिवस, म्हणजे महाराष्ट्रात दररोज साधारण सहा ते सात हजार लोकांचा वाढदिवस असणारच आजची तारीख २६ जानेवारी तर कम्प्युटरला विचारा 'या तारखेला जन्म झालेल्या महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीचे नाव सांग व ते टाईप कर ही पाहणी कशी करायची हे कम्प्युटरला आधी सांगितले असते, यालाच प्रोग्राम लिहिणे म्हणतात. हा प्रोग्राम तयार आहे का व हे काम कसे करायचे याचे मार्गदर्शन कम्प्युटरला दिलेले आहे आता अतिशय वेगाने तो आपल्या चाणाक्ष नजरेने, प्रत्येक नागरिकाबाबत लिहिलेल्या कॉलम दोनवर आपले लक्ष केंद्रित करेल व ज्या ठिकाणी २६ जानेवारी हा मजकूर आढळेल त्या व्यक्तीचे नाव भराभर कागदावर टाईप करीत जाईल सहा–सात हजार नावे पाच–सात मिनिटात सांगेल कम्प्युटरचा वेग थक्क करणारा आहे. बरे त्याला कटाळा नाही, थकवा नाही, आळस नाही मुख्य म्हणजे तो चुका करीत नाही, अगदी एकदेखील !

अशा या कम्प्युटरचा सर्रास उपयोग केल्यामुळे अमेरिकन समाज ढवळून निघाला आहे. शाळेत विद्यार्थ्यांकडून उदाहरणे सोडविण्यासाठी याचा उपयोग करतात लहान मुलांची खेळणी, घड्याळं सर्व कम्प्युटरयुक्त असतात लिटिल प्रोफेसर म्हणून एक साधे खेळणे मिळते ते ३ ते ६ वर्षाच्या मुलाला बेरीज वजाबाकी शिकविते. बटन दाबले की स्क्रीनवर

प्रश्न येतो ३ + ६ = ? उत्तर ७ म्हणून दाबल्यास चूक असा निरोप येतो एकूण तीन चान्सेस देण्यात येतात, तीनही उत्तरे चूक आली तर कम्प्युटर उत्तर सांगतो व दुसरा प्रश्न विचारतो असे हजारो प्रश्न त्याच्या स्मरणात असतात व अनुक्रमाने ते तो विचारीत जातो अशा प्रकारे सामान्य ज्ञानाचे प्रश्न असलेले खेळ सध्या तिकडे फार लोकप्रिय आहेत मोठमोठ्या शॉपिंग सेंटरमध्ये सुशोभित वस्तू काचेच्या कपाटात ठेवलेल्या असतात व त्यावर एक छापील नंबर असतो. हाच छापील नंबर कॅटलॉग बुकमध्येही असतो, तो नंबर व पैसे काऊंटरवर दिले की काऊंटरवरील मुलगी तो निरोप टाईप करून एक दोन फर्लांग लांब असलेल्या स्टोअरला कम्प्युटरद्वारे कळविते व जास्तीत जास्त पाच मिनिटात त्या वस्तूचे सीलबंद खोके व छापील पावती कन्व्हेअर बेल्टवरून तुमच्या समोर येते बऱ्याच वेळा वस्तूचे भाव कमी असतात त्याला Sale म्हणतात Sale च्या जाहिराती पाहणे हा तेथील खास छंद ! वर्तमानपत्र नुसती खचाखच यांनीच भरलेली असतात म्हणूनच की दीडशे पानाचे 'अटलांटा कन्स्टिट्यूशन' फक्त पधरा सेंटला मिळते (पधरा सेंटस् म्हणजे १५ पैसे हेच समजा) वस्तू-वर त्याची किंमत व एक नंबर छापलेला असतो ही किंमत जुनी किंमत असते. कालची असते, आज ती कमी केली आहे कारण वस्तू 'Sale'वर आहे. काऊंटरवर ही वस्तू दिली, तिचा नंबर टाईप झाला की तिची मूळ किंमत येते व क्षणार्धात ती नाहीशी होते व नवीन किंमत येते म्हणून १० ते १५ हजार वस्तू दुकानात असतात पण काऊंटरवर ना आवाज, ना बोलाचाली, ना शाब्दिक देवाणघेवाण. एकमेकाशी फारसे न बोलणाऱ्या अमेरिकन माणसाच्या तब्येतीला अगदी मानवणारे ! कम्प्युटरच्या या वेगाने पुस्तक छापणे देखील सुलभ झाले आहे. ५०० पानाचे पुस्तक दहा मिनिटात आपण छापू शकलो तर तो चमत्कार नाही तर काय ? विज्ञानाच्या संशोधनात इतकेच काय इंग्रजी वाङ्मयातदेखील कम्प्युटर आहे इलियड आणि ओडीसी ही दोन्ही अमरकाव्य होमर यानेच लिहिलीत हे एका वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांने सिद्ध केले ते कम्प्युटरचा आश्रय घेऊन ! बुद्धिबळाच्या हजारो चाली, ब्रीजच्या खेळी तो दाखवू शकतो, म्हणूनच त्याचे एवढे कौतुक, एवढा उदोउदो !

कम्प्युटरच्या किमयापेक्षा खरे म्हणजे मानवी बुद्धीची महानता आपण जाणली पाहिजे कॉम्प्युटर म्हणजे एक आज्ञाधारक यंत्र. त्याला ना स्वतःचे मन, ना भावना, ना स्वतंत्र विचार करण्याची बुद्धी तो तर एक सांगकाम्या पूर्वेकडे जा सांगितले तर सरळ जाईल खाचखळगे असेल तर अडखळेल. तुम्ही थांबा सांगाल तेव्हाच थांबेल म्हणूनच वाटेवरले हे खाचखळगे तुमच्या तीक्ष्ण दृष्टीला समजायला हवेत. तुमच्या बुद्धीची झेप तितकी असायला हवी या साऱ्या गोष्टी एरवी महत्त्वाच्या पण चांद्रयान किंवा सॅटलाईट प्रवासात तर अगदी महत्त्वपूर्ण एक नगण्य चूक चांद्रयानाला हजारो मैल पुढे घेऊन जाईल कम्प्युटर चूक करीत नाही, कारण शास्त्रज्ञाने त्याला अगदी अचूक सूचना दिलेल्या असतात ह्या सूचना देणे म्हणजे प्रगतीचा कार्यक्रम सांगणे यालाच यंत्राच्या भाषेत प्रोग्राम लिहिणे म्हणतात हे सर्वात कठीण व नाजुक आहे चांगला, अचूक अगदी शास्त्रशुद्ध प्रोग्राम लिहिणे भल्याभल्याना कठीण जाते प्रोग्राम लिहिणे म्हणूनच कला आहे It is an art in science असे तिचे वर्णन आहे. ज्याला तर्कशुद्ध विचार करता येतो, त्याला प्रोग्राम लिहिता येतो साधे उदाहरण पाहा, समजा गॅस पेटविण्यासाठी खालील सूचना कम्प्युटरला दिल्यात

१ प्रथम गॅस सिलेन्डरची क्लिप किंवा व्हाल्व्ह उघडा

२ गॅस शेगडीच्या खालील नॉब वर न्या

३ गॅस पेटवा

या सर्व क्रिया आपणा सर्वांना माहिती आहेत म्हणून आपल्या दृष्टीने त्या अगदी योग्य आहेत. प्रश्न आहे त्या अचूक आहेत का ? कम्प्युटरला त्या समजतील का ? गमत पाहा– पेटवा म्हटलं की काडी ओढायची हे मला माहीत आहे पण ते कम्प्युटरला कसे समजणार ? तो दुसरे काम करील व अडून बसेल. कारण पेटवा म्हणजे काय ? कशाने पेटवा हे त्याला सांगितलेले नाही म्हणून तिसरी सूचना पुन्हा लिहावी लागेल.

३. आगपेटी घ्या व त्यातील एक काडी पेटवून ती शेगडीवर धरा

या ठिकाणी एक का दोन गोष्टी पुन्हा स्पष्ट हव्यात.

(अ) काडी पेटली नाही, मध्येच तुटली तर काय करायच ?

(ब) शेगडीवर नेण्यापूर्वी काडी विझली तर काय करायच व मुख्य म्हणजे दुसरी क्रिया केल्यावर तिसरी क्रिया तावडतोब करायला हवी हे सुद्धा सांगायला हवे कम्प्युटरला म्हणूनच सांगावे

३. तावडतोब आगपेटीची काडी पेटवून शेगडीवर धरा, ती काडी विझली तर दुसरी काडी घ्या आगपेटीतील काड्या संपलेल्या असतील तर दुसरी आगपेटी घ्या गॅस पेटला म्हणजे त्यातून ज्वलत ज्योत दिसायला हवी हा साधा तीन ओळीचा कार्यक्रम तर त्यात सतराशे साठ probabilities, सशोधनात तर एक ते पाच हजार ओळीचे कार्यक्रम असतात म्हणूनच एक programme अचूक करण्यासाठी महिनोगणती वेळ लागतो शत्रूच्या हालचाली आधी समजून उत्तराची तयारी करणारा General जसा मानाचा तसाच हा programme लिहिणारा बुद्धिवत देखील मानाचा एकदा मात्र हा प्रोग्राम तयार झाला की, वर्षानुवर्षे तो तयार ठेवणार हीच त्याची खरी कमाई ! तेथे गेल्या गेल्या माझ्या एका भारतीय मित्राला मी प्रश्न केला होता, 'अमेरिकेत एकूण मोटारगाड्या किती असाव्यात ?' क्षणभरही न थांबता माझी गमत करावी म्हणून तो म्हणाला, तुम्हाला अमेरिकेची लोकसख्या माहीत आहे का ? मला थोडासा राग देखील आला. नकळत शाळेत गणिताच्या काळकर मास्तरानी आम्हाला विचारलेला '१ रुपयाला दोन आबे तर माझे वय काय ?' हा तिरकस प्रश्न आठवला व तसा मी तो मित्राला सांगितला देखील ! तेव्हा आमचा हा भाबडा मित्र उद्गारला, 'मी सीरियसली विचारतो, अमेरिकेची लोकसंख्या १८ कोटी मानली तर कमीत कमी ९ कोटी मोटारगाड्या आहेत समजा या शिवाय बसेस, ट्रक्स, ट्रेलर वेगळयाच ! तर त्या गाड्या सतत धावत असतात तिकडे पायी कोणीही चालताना मला आढळला नाही. माणसे एकतर कारमध्ये असतात किंवा जमिनीला त्यांचे पाय टेकलेले असतात तेव्हा ते पळत असतात सहज जरा पाय मोकळे करायला जवळच्या ठेल्यावर जाऊन पान खाऊ ही चैन तिकडे नाही या सर्व गाड्या रजिस्टर केल्यावर त्याची नोंद Patrol police च्या

कॅलिफोर्नियामधील कॉम्प्युटरवर केली जाते. कॅलिफोर्निया हे अगदी पश्चिमेकडे अटलांटापासून दोन हजार मैल लांब ! अटलांटाच्या आजु-बाजूने जाणाऱ्या हायवेवरून सतत या गाड्या धावत असतात एकाच दिशेने धावणाऱ्या तीन-तीन गाड्या तीन निरनिराळ्या लेनमध्ये असतात. न्युयॉर्कला तर सहा लेनचा रस्ता म्हणजे सहा जाणाऱ्या व सहा थोड्या दूरवर असलेल्या रस्त्यावरून येणाऱ्या ! अशा या मैलोगणती नुसत्या ताशी ५५ मैलाच्या वेगाने धावणाऱ्या मोटरगाड्या ! माणसे म्हटली की ती सारखी नसणारच. कोणी वेगमर्यादा ओलांडणारे, तर कोणी वृत्तीचा समतोल ढळल्यामुळे असंबद्ध चालविणारे, तर काही उगाच समोरच्या कारला Over take करण्यासाठी तऱ्हेवाईकपणे Lanes बदलणारे काहींना कार नवी म्हणून जोरात चालवायची तर काहींना Girlfriend ची Appointment चुकवू नये म्हणून घाई, त्यातच एखादी कार चोरलेली देखील !

हे सर्व कायद्याच्या कक्षात ठेवण्यासाठी एक मोठी संघटना Patrol Police उंच टेकड्यावर किंवा रस्त्याच्या डाव्या बाजूकडील इमर्जन्सी लेनमध्ये आपल्या कारमध्ये हे Patrol कार्यमग्न, प्रत्येक कारकडे घारी-सारखे लक्ष !

एखाद्या ड्रायव्हरचा संशय असला की वॉकी टाकीने हा मेसेज पुढच्या पेट्रोल ऑफिसरला देण्यात येतो ही कार त्याच्या समोरून निघाल्याबरोबर ऑफिसर आपली कार तिच्या मागे सुरू करतो ड्रायव्हरला ऑफिसरची कार, आपल्या कारच्या आरशातून दिसते. साधारण पाच दहा मिनिट ऑफिसर वाट पाहून पुनः चुक झाली तर एकदम त्याच्या कारच्या टपावरील लाल लाईट ऑन करतो ! हा फिरता लाईट सुरू झाला की सायरनसारखा आवाज येतो. R T O च्या नियमाप्रमाणे अशी कार तुमच्या मागे आली की तुम्ही थांबायलाच हवं ! इमर्जन्सी लेन-मध्ये दोन्ही कार उभ्या राहताच ऑफिसर बाहेर येऊन अदबीने विचारील ' तुमचे driving license व कारचे रजिस्ट्रेशन दाखवा ' तुमचे कार्ड हातात घेऊन हे सर्व तो अटलांटाच्या ऑफिसला ट्रान्समीट करतो व आणखी

काही मेसेज पाठवितो. ही कार चोरलेली आहे का ? तेही पाहण्यास सांगतो अटलांटाहून हा मेसेज कॅलिफोर्नियाच्या कॉम्प्युटरकडे पाठविण्यात येतो कॅलिफोर्नियाचा कॉम्प्युटर तावडतोब १२–१४ कोटी वाहनातून हा नंबर शोधून काढतो व आपले उत्तर अटलांटाला व तेथून तो ऑफिसरला हायवेवर पाठवितो हे सर्व होण्यास एक ते दीड मिनिटे इतका वेळ लागतो या काळात ऑफिसर काही बोलत नाही. मेसेज आला की तो एक तर 'माझ्याबरोबर ऑफिसमध्ये चला असे म्हणेल किंवा OK जरा कार हळू चालवा' असे सस्मित चेहऱ्याने सांगून have a nice day असे म्हणून तुमचा निरोप घेईल. ही कॉम्प्युटरची किमया हा आहे त्याचा राक्षसी वेग व यामुळे अमेरिकन जीवनात आलेला हा वेग नुसताच झपाटा नाही तर त्यात एक सूत्रबद्ध सचलन आहे कायद्याचा आदर आहे व नागरिकाबाबत काळजी आहे. अमेरिकन जीवनाची ही गती समजावून घ्यायची असेल तर विज्ञानाचा सदोदित आदर मनात असायलाच हवा. याशिवाय खरी अमेरिका समजूच शकत नाही. हे सारं वगळून अमेरिकेकडे पाहिले की मग दिसतात तेथे रात्रभर चालू असलेले पब्स व नाईट क्लब्स, स्वैराचार वाटण्यासारखे स्त्री–पुरुषांचे संबध व पाण्यासारखी व तितकीच स्वस्त असलेली सतत वाहणारी बिअर व वाईन दुर्दैवाने हीच अमेरिका नाही याचे वर्णन दुसऱ्याना सांगताना जरा टाळया मिळतील पण त्यामुळे अमेरिकेचे अर्धवट दर्शन घडविल्याची खतही मनात येईल अतिशय कष्टाने, सचोटीने राष्ट्र निर्माण केलेल्या शास्त्रज्ञांची, बुद्धिवंतांची तपश्चर्या समोर ठेवायला हवीच ती विसरून चालणार नाही त्या तपश्चर्येतच खर रूप साठविले आहे. कॉम्प्युटरच्या रूपात आणि विश्वात !

तेथे पैशाचे व्यवहार सगळेच चेकने किंवा 'अमेरिकन एक्सप्रेस कार्ड' दाखवून ! प्रत्येक व्यक्ती दरमहिन्याला तीस ते चाळीस चेक्स सहज देत असेल. चेकवर स्वतःचे नाव छापलेले असते व खाली बँकेच्या ओळखीसाठी मॅग्नेटिक शाईने टाकलेला एक नंबर असतो तो तुमचा खाते नंबर महिन्यात असे चेक शॉपिंग सेंटर, ग्रोसरी स्टोअर्स, रेस्टॉरन्ट बँकेत इत्यादी विविध ठिकाणी दिलेले असतात चेक वटवून ते तुमच्या

बँकेकडे परत आले की, दर महिन्याच्या शेवटी तुमच्या खात्यावरील पैशाचा तुम्हाला हिशोब पाठवितात महत्त्वाचे म्हणजे तुम्ही दिलेले सर्वच्या सर्व चेक परत तुम्हाला मिळतात ! बँकेच्या कॉम्प्युटरला एक Optical device असतो त्याने तुमच्या चेकवरील नबर तो पाहतो व बाजूला करत जातो बँकेत साधारण ५ हजार खातेदार आहेत असे मानले तर जवळपास २ ते २।। लाख चेकचे सॉर्टिंग करण्यात इतका अचूकपणा असतो की, कुठलाही चेक माझा किंवा माझ्या मित्राचा हरवला आहे असे अख्ख्या दोन वर्षांत मला आढळलेले नाही

पैसे काढताना किंवा देताना आपण कॅशियरसमोर उभे राहिलो व आपला चेक किंवा Withdrawal slip दिली की त्याच्यासमोरील मशीनवर तो तुमचा चेकचा खाते नबर टाईप करतो व त्याच्या पडद्यावर तुमची शिल्लक किती आहे हे स्पष्ट दिसून येते. कॅशियरने तुम्हाला पैसे दिलेत किंवा घेतलेत तर त्याची नोंद बँकेचा मास्टर कॉम्प्युटर करतो यामुळेच पावत्या देण्याचे काम नाही व एखादी पावती सापडत नाही म्हणून चिंताही नाही शनिवार, रविवारी बँका बद असतात तेव्हाही कॉम्प्युटरच्या साहाय्याने पैसे मिळण्याची सोय असते. त्याला फोनचे बिल म्हणजे कॉम्प्युटरला देण्यासाठी पच केलेले एक कार्ड वैशिष्ट्य म्हणजे हे कार्ड व पैशाचा चेक नुसत्या पाकिटात घालून पाठवायचा ना कुठे रजिस्टर लेटर, ना Ack /due ची पावती मी या दिवशी चेक मेल केला असे फोनवर टेलीफोन कपनीला सांगितले तर त्यावर कोणीही अविश्वास ठेवणार नाही. वर्तमानपत्रे किंवा मासिके आपल्या वर्गणीदाराची यादी कॉम्प्युटरनेच ठेवतात. यामुळेच कोणाचीही वर्गणी सपण्याच्या एक महिना आधी अगदी नियमाने पत्र येईल एकमेकावर प्रचड विश्वास. त्यामुळेच I trust you हे वाक्य सतत कानावर पडत असते मेडिकल कॉलेज इंटरव्ह्यूला माझा मित्र विमानाने गेला. तेव्हा आपले लगेज त्या flight ने न आल्याचे समजताच त्याने duty officer ची भेट घेतली व माझा सूट पेटीत आहे असे सांगितले. तेव्हा अत्यत ओशाळा चेहरा करीत, पाच–दहा वेळा माफी मागत त्या ऑफिसरने एकरकम शभर डॉलर आमच्या मित्राला दिलेत व म्हणाला

' तुम्ही सूट विकत घ्या, best of luck ' (विमानाचे जाण्या-येण्याचे भाडे फक्त ७८ डॉलर्स होते !) अशी तत्परता, अदब ही कॉम्प्युटर विश्वाची देणगी आहे साधा विद्यार्थी असणाऱ्या माझ्या अमेरिकन मित्राने सूट घेऊन उरलेले १७ डॉलर कंपनीला परत केलेत ही आहे एकमेकांच्या विश्वासाची चटका लावून जाणारी कहाणी !

न्यूयॉर्कला उतरल्यावर अटलांटला फोन एअर पोर्टवरूनच करायचा असेल तर collect call ची सोय असते. Operator ला सांगायचे, मला अटलांटाला या व्यक्तीशी बोलायचे आहे ती अटलांटा ऑफिसला कॉन्टॅक्ट करते अटलांटाच्या १० लाख टेलिफोनमधून नेमका तुमच्या मित्राचा नंबर कॉम्प्युटर शोधून काढतो व सरळ अशी व्यक्ती न्यूयॉर्कहून बोलू इच्छिते तुम्हाला बोलायचे आहे का, कारण हा collect call असे विचारते. तुम्ही हो म्हटले (कारण या कॉलचा खर्च Receive करणाऱ्या व्यक्तीला द्यावा लागतो) की बोला फोनवर हे सारे अवघ्या एक मिनिटात होते.

कॉम्प्युटरच्या या समाजात काही घटना इतक्या मजेशीर घडतात की त्याचा अनुभव घेतला की, मन थक्क होऊन जाते व मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी विज्ञानाने नेमके काय करते हे समजते. एकदा माझा चेक हरवला. चूक म्हणजे १०० डॉलर्सचा हा चेक मी ऑफिसात लिहिला व त्यावर सही देखील करून बसलो होतो. बँकेत जाण्यापूर्वी एका drugstore व नंतर एका बेकरीत मी गेलो होतो त्यावेळेस मला अमेरिकेत येऊन फक्त चार-पाच महिनेच झाले होते म्हणजे थोडसे माहिती होते. पुष्कळसे अज्ञानातच होते गोंधळलेल्या अवस्थेत मी उभा. समोरून आलेल्या मित्राला थोडक्यात हे सांगितले तेव्हा तो म्हणाला त्या तिथल्या ऑफिसरला भेट.

' yes, May I help you ? ' ही अमेरिकेतील नेहमीची सलामी मी सर्व सांगितले तेव्हा हसून तो खास अमेरिकन स्टाईलमध्ये म्हणाला, ' No problem एकदम उठला व बाजूच्या मशिनसमोर उभा. माझा चेक कुठे वटला का ते प्रथम कॉम्प्युटरला विचारले. त्याने नाही म्हटल्यावर

याचे शब्द ‘ good, good. No problem ’ आता त्याने कॉम्प्युटरला सूचना दिली त्याने ती मानली तेव्हा ऑफिसर मला म्हणाला, ‘ चल तुला गंमत दाखवितो ’ एका काऊन्टरवर मला त्याने आत घेतले व माझा कार्ड नंबर टाईप केला. तेव्हा स्क्रीन चकाकू लागलं ‘ Cheque No. 192T 100 do not cash, warning ! ’ या मेसेजने मी हसू लागलो आणि ऑफिसर म्हणाला, संपूर्ण अटलांटा गावात आता हा चेक वटणार नाही. तू निर्धास्त राहा. तुझे पैसे हरवलेले नाहीत.

बँकेत येण्यापूर्वी आपण ज्या ज्या ठिकाणी गेलो होतो. तेथे सहज चक्कर टाकावी म्हणून प्रथम बेकरीत गेलो. बेकरीत काम करणारी साधारण शिकलेली एक वृद्धा मला म्हणाली, तू काही तरी विसरला आहेस मी हो म्हटल्यावर अॅप्रनमधून तिने न उलगडलेला चेक माझी कुठलीही विचारपूस न करता मला दिला. मी तिचे आभार मानले. कॉम्प्युटरला अचूक प्रोग्राम देणारे विचारवंत व सचोटीने चेक परत करणारी ती वृद्धा उरलेले १७ डॉलर विमान कंपनीला परत करणारा माझा अमेरिकन मित्र. हे विसरणे शक्य तरी आहे का ? अमेरिकेतील horror व crimes ची भयावह परिस्थिती माननही तेथे राहावेसे वाटते कारण ज्यांच्यावर राष्ट्राचा कणा आहे ते कष्टाळू व सेवाभावी नागरिक आजुबाजूला असतात म्हणून !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २४२९७
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# ६. टी. व्ही. आणि रेडियो

अमेरिकेचा धर्म विज्ञान आहे, तर संस्कृती T V आहे. तिकडे ह्या T V ला 'ट्यूब' म्हणूनही संबोधतात तर ही ट्यूब सतत पेटलेली असते दिवस आणि रात्रीच्या २४ तासापैकी २२ तास T V वर कार्यक्रम असतात रंगीत T V च्या मोठ्या पडद्यावर हे कार्यक्रम अगदी स्पष्ट दिसतात. महत्त्वाचे तीन राष्ट्रीय नेटवर्कस् आहेत. शिवाय प्रत्येक प्रांताचे अलग आणखी तीन चार म्हणजे एकाच वेळेस सात आठ कार्यक्रम पाहता येऊ शकतात यापैकी एकाचीच निवड करावयाची T.V पासून दहा फूट आरामखुर्चीत बसलेल्या वयस्कर मंडळींना प्रत्येक वेळेला chanel बदलायची असल्यास, हातातच एक remote control असतो पण T V ची ही chanel घरातील मुलेच control करतात असं समाजशास्त्रज्ञांच म्हणणं आहे, व ही गोष्ट नेटवर्कच्या महाभागांना चांगलीच माहिती आहे म्हणूनच का काय शाळेत जाणाऱ्या दहा ते पंधरा वर्षे वयांच्या मुलामुलींना रुचेल आणि आवडेल असे कार्यक्रम आपल्या chanel वर असावे म्हणून ABC, CBS आणि NBC ह्या कंपन्यांची इर्षा व स्पर्धा. T.V. च्या कार्यक्रमाची आणखी एक गमत असते दर दहा मिनिटांनी साधारण २–३ मिनिटे जाहिराती दाखवितात T V वर त्या काळात चालू असलेला कार्यक्रम जितका महत्त्वाचा म्हणजे ते पाहाणारे प्रेक्षक एकूण संपूर्ण अमेरिकेत जितके जास्त तितकी ही जाहिरात घरोघरी पोहचणार म्हणूनच फूटबॉलचा शेवटचा खेळ Superbowl चालू असताना त्याचेमधे दाखविणाऱ्या एक मिनिटाच्या जाहिरातीचे १०० हजार डॉलर्स घेतात म्हणे ऑलिंपिकचे तर त्याच्या दसपट प्रथम मला अशी जाहिरात आली की कंटाळा यायचा पण मग मला त्या काळचा सदुपयोग कसा करावा ते समजले. याच काळात फ्रीज उघडून कोकचा

ग्लास भरून आणावयाचा असतो तर पटकन oven चालू करून सँडवीच तयार करावयाचे असते किंवा टॉयलेटला जायचे असते Roots सारखे सिनेमे दाखवीत असताना या अशा मधल्या काळात अमेरिकेतल्या बहुतांशी Rest Rooms आतून बंद असतात असा शोधही कोणी आकडेशास्त्रज्ञाने लावला आहे. सिनेमाचा जसा जाणता अथवा अजाणता आपल्या जीवनावर परिणाम होतो तसाच तेथे T.V चा झाला आहे. जिस देश मे गंगा बहती है ' ची लोकप्रियता चालू असताना कित्येकांनी आपल्या मुलाचे नाव राजू ठेवले तर ' संगम 'च्या काळात अगदी चांगल्या शिकलेल्या सौभाग्यवती राधा हे नाव भूषणाने मिरवू लागल्या. ABC च्या ' मार्क ॲन्ड मिंडी ' या कार्यक्रमाने तरुणावर अशीच मोहिनी टाकली आहे. कुठल्यातरी गृहावरून आलेला साधाभोळा मार्क पृथ्वीवर उतरल्यावर त्याच्या विविक्षित आवाजात म्हणतो ' न्यानू न्यानू ' हा गृहस्थ आपल बनियनपुढील भाग पाठीशी घालतो त्यामुळे त्याचा अवतार पाहण्या-सारखा असतो. अशा प्रकारचा शर्ट घालण्याची फॅशन पुढील ५-१० वर्षांत आपल्याकडे आली तर मला फारसं नवल वाटणार नाही.

माणसात अशा प्रकारची काही तरी वैचित्र्यता असल्याशिवाय खर म्हणजे तो नाटकाचा किंवा सिनेमाचा विषय असूच शकत नाही. सामान्य माणसाच्या अंतरमनात दडपून ठेवलेला राग, वासना, अपमान काहीतरी अद्भुत करून दाखविण्याची इच्छा हे सर्व सिनेमात जो कोणी करून दाखवितो त्या व्यक्तिमत्त्वात खर म्हणज आपण आपल रूप पाहत असतो. आपणाला तसंच वागायच असत वागावं अस वाटत असतं पण ते जमत नसतं म्हणूनच कोणीतरी पडद्यावर का होईना असं वागताना दिसला की आपणाला ते आवडत. जुन्याकाळाचे अद्भुत चमत्कार हे खरोखर चमत्काराच्या सदरात होते. म्हणूनच श्रीकृष्णाने गोवर्धन करंगळीवर उचलला, हनुमान जन्मल्याबरोबर सूर्याचा घास घेण्यासाठी धावला. किंवा सिंधबाद प्रचंड प्राण्याच्या विळख्यात सापडला, एकटा अलिबाबा चाळीस चोरांशी कौशल्याने लढून जिंकला. या साऱ्या घटना आपल्याला हव्याशा वाटतात हे सारे चमत्कार निराळया स्वरूपात विज्ञानाच्या मदतीन

दाखविणे आता शक्य झालं आहे. नमका त्याच गोष्टीचा उपयोग कित्येक T. V. च्या Serials मध्ये केला जातो

लिंडाकार्टर ही खर म्हणजे अमेरिकेतील सौंदर्यवती, देखण व्यक्तिमत्त्व, बोलका चेहरा आणि मुख्य म्हणजे विलक्षण निळे डोळे, हे या बाईंचे वैशिष्टय. 'वंडरवुमन'मध्ये संकटकालात धावून जाणारे हे एक व्यक्तिमत्त्व. डायनाप्रिन्स ही स्त्री तिला वाटेल तेव्हा ती आडोशाला जाते व स्वतःभोवती फिरते एकदम नेहमीच गाण सुरू होते वंडरवुमन....ऽऽ....च पालुपंद सूरू होते. आणि स्कर्ट ब्लाऊज घातलेली डायनाप्रिन्स एकदम डोक्यावर मुगुट, लहानस जीन व स्पोर्टस् पँट घातलेली लिंडा कार्टर लांबचलांब पावल टाकीत पुढे येते या रूपात ती मग हेलीकॉप्टर थोपवू शकते, चार पाच माणसाना लोलया लोळवू शकते, तर भर वेगाने धावणाऱ्या कारचा पाठलाग पळत जावून करते उंच इमारतीवरून ती सहज उडी मारू शकते तर बंदूकीच्या गोळयाचा तिच्यावर परिणाम होत नाही. हे सारं ती दुष्टांचा नाश करण्यासाठी करीत असते वंडरवुमन सारखीच बायोनिक वुमन जेमी सागरस ही तर अद्भुत वैज्ञानिक सामर्थ्याची शक्तीच. करोडो डॉलर्स खर्च करून हिचं व्यक्तिमत्त्व शास्त्रज्ञांनी तयार केले आहे शरीराच्या एखाद्या भागात प्रचड ताकद निर्माण करता येते. या शास्त्राला बायोनिक म्हणतात

बायोनिक वुमनच्या संपूर्ण शरीरातच ही शक्ती आहे. आपल्या दोन बोटांच्या साध्या स्पर्शाने ती अठरा टन वजनाच्या ट्रॅक्टरला दूर लोटू शकते शिवाय दूरवरचे आवाज तिच्या कानात घुमू लागतात. त्यामुळे मैलोगणती दूर असलेल्या वाहनांचा आवाज ती सरळ ओळखू शकते बायोनिक वुमन पाहताना मला गोवर्धन उचलणाऱ्या श्रीकृष्णाची आठवण यायची त्याच्याही करंगळीत अशीच बायोनिक शक्ती असावी त्याशिवाय या घटनेचा वैज्ञानिक अर्थ लावणे अशक्य आहे बायोनिक वुमनसारखाच मिलियन डॉलर मॅन व तसलाच स्पायडर मॅन या स्पायडरमॅनचे डोळे म्हणजे अदृश्य कॅमेराच व मुख्य म्हणजे कोळयासारखा हा भिंतीवर रांगत जाऊ शकतो. तीस चाळीस मजले उंच असलेल्या इमारतीवर तो झपाझप

चढून जातो. हेच याचे वैशिष्टय डेविड बॅनर हा एक साधा डॉक्टर, पण रेडियेशनचा डोस जास्त प्रमाणात घेतल्यामुळे याच्या शरीरात विलक्षण बदल होतो. याला राग आला की एकदम शारीरिक बदल याच्यामध्ये होतो. एकदम याची छाती रुंद होते, खांदे बलदंड होतात शर्ट टराटरा फाटत जातो, उंची वाढते, डोळे मोठाले व बटबटीत होतात आणि साधाभोळा डेव्हीड होतो. इन्क्रेडिबल हल्क (Incredible Hulk). प्रत्यक्षात हल्कचा काम करणारा नट जो फेरास हा मिस्टर अमेरिका म्हणून एकदा निवडलेला बलदंड शरीरयष्टीचा ४०० पौंडाचा युवक आहे आपल्या लाभलेल्या या शक्तीचा उपयोग डेव्हीड जनकल्याणासाठीच करतो दुष्टांचे निर्मुलन करण्यासाठी अवतार घेतलेल्या परमेश्वराची लहानशी आकृतीच मला डेव्हीडमध्ये आढळली या डेव्हीडचे एका डॉक्टरीण बाईवर प्रेम जमते या बाईला अतिशय सीरियस रोग होतो व काही महिन्याचीच ती सोबतीण असते हल्कच्या प्रचंड शक्तीची डेव्हीडला कल्पना असते म्हणून तो आपल्या प्रेयसीपुढे कल्पना मांडतो मी हल्क झालो की तू माझ्याजवळ ये आपण घट्ट आलिंगनात बद्ध होऊ म्हणजे माझ्या शरीरातील संपूर्ण शक्ती तुझा दुर्धर रोग बरा करील.

विज्ञानाच्या ह्या कक्षा अतिशय रमणीय असतात. Fantasy म्हणून याचे सार्थ वर्णन करता येईल. हे Serials मुलांना प्रिय संध्याकाळी आठ वाजता हे सुरू होतात व एकदा एखादा channel मुलांनी लावला की नंतर रात्री ११ वाजेपर्यंत घरातील वडिलधारी मंडळी हा channel बदलत नाहीत. हा T.V. चा सिद्धांत आहे म्हणूनच आठ वाजताचा हा शो जास्तीत जास्त चांगला करण्याची तिन्ही नेटवर्कचा प्रयत्न असतो ह्या साऱ्या कार्यक्रमाची पाहणी करून त्यांना Rating देणाऱ्या संस्था आहेत. Computer च्या साह्याने संपूर्ण देशातील नागरिकांच्या प्रतिक्रिया या कार्यक्रमावरील मिळविण्यात येतात मार्क आणि मिंडी या कार्यक्रमाचा बरेच महिने पहिला नंबर होता. हा पहिला नंबर आपल्या नेटवर्कचा असावा म्हणून ABC, CBS व NBC ह्या संस्थांची सतत धडपड असते. यासाठी कोटयावधी डॉलर्स ह्या कंपन्या खर्च करतात. ११ फेब्रुवारी

१९७९ ह्या दिवशी दोन तासासाठी ह्या तीनही कंपन्यांनी एकूण १३ मिलियन डॉलर्स म्हणजे जवळ जवळ १० कोटी रुपये खर्च केले CBC ने गॉन उइथ द विंड दाखविला तर NBC वर द कुकुज नेस्ट तर ABC ने सरळ सरळ Elvis वरच सिनेमा तयार केला. Elvis च वेड साऱ्या तरुणाना, त्यामानाने गॉन उइथ द विंड हा जुना सिनेमा त्यामुळे ABC ने पुन्हा नंबर मारला ह्यामुळेच १९७८ साली ABC, CBS व NBC याना निव्वळ नफाच अनुक्रमे १५० कोटी रुपये, १२३ व ०५० कोटी रुपये इतका अमाप होता, प्रचंड होता ॲलेक्स हेलीच्या Roots या कादबरी-वरून त्याच नावाने काढलेला ABC चा पिक्चर म्हणूनच बाजी मारून गेला आफ्रिकेतून निग्रोंना ज्या पद्धतीने पकडत होते, हातपाय बांधून जहाजातून आणीत असत, त्यांना क्रौर्याने, सुडाच्या भावनेने, शुद्ध पशुतुल्य वर्तणुक या काळातल्या गोऱ्या समाजाने दिली याचे अतिशय विदारक चित्रण या १४ तास लागणाऱ्या सिनेमात होते दररोज २ तास असे सतत सात दिवस दाखविला गेला आणि काळ्या एवढ्याच गोऱ्या समाजातदेखील तो लोकप्रिय ठरला. त्या सात दिवसात रात्री ८ ते १० हा movie चालू असताना High way वरील धावणाऱ्या कारची सख्या देखील कमी झाली होती माणस घरात होती ग्रोसरी स्टोअर, शॉपींग सेटरवर देखील सख्या कमी होती हेही निरीक्षण या movie ची लोक-प्रियता दाखवितात नाझी क्रौर्याचा जिवंत दर्शन देणारा ' होलकास्ट ' हा सिनेमा विलक्षण सत्य होता. कॉन्सेनस्ट्रेशन कॅम्पमध्ये ठेवलेल्या कैद्यांना स्नान करण्यासाठी उघड करण्यात येत व अक्षरशः विषारी धूर त्याच्या अगावर सोडून त्यांना जीवे मारण्यात येत. व ही मृत शरीरे एका भट्टीत टाकून त्याच्यापासून डाबरासारखा पदार्थ तयार करून रस्ता बांधण्यासाठी हे डाबर ओततात तेव्हा अक्षरशः शहारे आलेत, डोळ्याना पाणी आले पुढील भाग मी पाहू शकलो नाही इतके ते क्रौर्य सत्य होते

या प्रसगानंतर मी T. V तावडतोब बद केला व क्षणभर सुन्न होऊन बसलो. रात्रीचे साडेनऊ वाजले असतील, आजुबाजूला नीरव शातता होती सार वातावरण रिकेटी झाले होते व T. V बंद करून

कोचावर मी डोक्यावर हात ठेवून बसलो होतो अशा वेळेस स्वतःचं व्यक्तिमत्त्व जीवतच राहत नाही त्या कॉनसनट्रेशन कॅम्पचाच आपण एक भाग होवून जातो. न राहवून माझे मित्र डॉवोसला फोन केला त्यानाही तेच सांगितल तेही हेच पाहत होते व त्यांनीही T V बंद केला होता ! क्रौर्य हे चटका लावून जात ते अशाप्रकारे. तेथील सर्व Movie मध्ये एक गोष्ट प्रकर्षाने मला जाणवली क्रौर्य असो, थाती असो ती निखळ असायची अगदी शुद्ध साजुक तुपासारखी. त्यात विनोदाची झालर नसायची उगाच त्यागाच्या गप्पा नसायच्या. मध्येच प्रेमाची गाणी नसायची यामुळेच त्याचा दृश्यपरिणाम पक्का असायचा

तेथील भीतिदायक सिनिमे म्हणूनच अक्षरशः हृदयाचा थरकाप करून सोडतात. तर विनोदी निवळ हास्यप्रधान चित्रे सतत हासवितात 'थ्री इज कंपनी', रोपर्स जेफरसन ही अशाच प्रकारची सिरीयल जेफरसन हा त्यातला वरच्या दर्जाचा ही काळ्या कुटुंबाची विनोदी कथा असते

सासुबाईंचा जावायाला जितका धसका आपल्याकडे तितकाच तिथेही ! रोपरची सासूबाई काही दिवस रासला येणार हे समजल्यावरोबर तो परक्या गावी जाण्यास निघतो. तसच सासूसुनांचा एकमेकींबद्दल अविश्वासही मला वाटते पृथ्वीच्या पाठीवर सर्व दूर असावा जेफरसनची बायको एकदा 'हरवते.' तिला शोधून काढणाऱ्यास 'वीस हजार डॉलर्स'चे बक्षिस तो लावतो तेव्हा त्याची म्हातारी आई जेफरसनला समजावते जाऊ दे रे, तिच्या जाण्याचे एवढे दुःख का करतोस. दुसरी केव्हाही मिळेल.' व आपला मुलगा दाद देताना दिसत नाही तेव्हा त्रागाने म्हातारी चिडते, 'त्या क्षुल्लक बाईसाठी वीस हजार डॉलर्स कशाला देतोस ?' अस ती त्राग्याने म्हणते तेव्हा जेफरसन म्हणतो, 'आई ! तिची किंमत शभर हजार डॉलर्सदेखील मोजता येणार नाही.' कौटुंबिक सिनेमात जेफरसनचा नंबर वरचा आहे

अमेरिकेची लोकसंख्या यापुढे वाढणार नाही स्थिर राहील किंवा कदाचित थोडी कमी होत जाईल. 'हम दो हमारे दो' तेथे कुठल्याही

बोर्डावर लिहलेले नाही, तरीपण सर्वसाधारण कुटुंबात दोनच मुले असतात, गमत म्हणजे खूप श्रीमत माणसाना तेथे दोनपेक्षा जास्त मुलं असू शकतात. नव्हे असतात कारण जास्त सख्येनी असलेली मुले पोसण्याची त्यांची ऐपत असते म्हणून ! अर्थात ही कल्पनाही मागील २-३ दशकांतील. त्यापूर्वीच्या कुटुंबात म्हणूनच दोनपेक्षा जास्त मुले होती. माझ्या लॅब-मधील गॅयमॅकमॅस्टरला सहा भाऊ व दोन बहिणी होत्या, तर मायकेल जोन्सला तीन बहिणी व दोन भाऊ होते आम्हा सर्व भावांचं एकमेकावर प्रेम आहे व आमच्या आईने काटकसरीने पण तितक्याच कठोरपणे आमचं पालनपोषण केल हे सागताना गायची छाती फुगायची एकूण मोठया कुटुबाची आवड तिकडेही असावी अशाच एका मोठया कुटुबाची कथा ही एक अतिशय लोकप्रिय movie ची कथा आहे बुधवारी सध्याकाळी ८ वाजता ABC वर लागणारा Eight is enough हा कार्यक्रम माझ्या वास्तव्यात मी अगदी नेमाने पाहिला. आपल्याकडे याच दिवशी व याच वेळेस बीनाका गीतमाला जितका लोकप्रिय तितकाच Eight is enough तिकडे. टॉमब्रडफर्ड हा वृत्तपत्राचा स्तभलेखक, पन्नाशीला आलेल्या ह्या पापभीरू सात्विक माणसाला असतात पाच मुली व तीन मुले. शिवाय ह्या महाराजांनी या सर्व मुलामुलींच्या आईच्या मृत्यूनतर दुसर लग्न केल असत. असे एकून दहा माणसांच हे कुटुब अगदी आपल्या शेजारच्या घरात राहणारे इतके आपल्या जवळचे वाटावेत तसेच लोभस ! मुला-मुलींची भाडण, रुसवे फुगवे टॉमचा अमेरिकन बापाला न शोभणारा कडकपणा व मुलांना तो लावतो ती शिस्त. थोरल्या मुलाचं लग्न ठरते तेव्हा टॉमला त्याचा एकच उपदेश ! सफल जीवन कसं असतं याचा मी अनुभव घेतो आहे. त्यामुळे पुस्तकी वाक्य मी तुला सांगत नाही मात्र माझ्या वडीलांनी केलेला उपदेश तुला पुनः सागतो लक्षात ठेव, Never go to bed Angry ! इतका खेळकरपणा हे तर अमेरिकन समाजाची माझ्यामते जमेची बाजू.

या घराची हिंमतही तितकीच भरभक्कम आहे. टॉमच्या बायकोला ॲबीला शाळा मास्तरची नोकरी मिळते व त्याच शाळेत टॉमचा जॉन

बाबाचा नंबर चारचा मुलगा शिकत असतो. काही बलदंड निढावलेले विद्यार्थी मास्तरीणबाई फार कडक आहेत, पेपर कठीण काढतात, अशी तक्रार करतात त्यामुळे ह्या बाई अशा विद्यार्थ्यांत अप्रिय ! म्हणूनच की काय एका परीक्षेची प्रश्नपत्रिका जॉनकडून मिळविण्यासाठी ही सारी गुड-मडळी धमकावणी देतात ॲञ्जेला हे कळत व टॉमलाही कळाल असतं तो मुलाला एकच उपदेश करतो ' अन्यायापुढे मान तुकवू नकोस, प्रसंगी तुला ते विद्यार्थी ठोकून काढतील तू विरोध कर पण शेळपट होऊ नकोस कारण आपण शेळपट आहोत ही बोचणी आयुष्यभर तुला टोचत राहील.' जॉनला प्रश्नपत्रिका मिळते गुंड विद्यार्थ्यांच्या खोलीत पाच-सहा विद्यार्थी हिन्दी सिनेमातले प्रेम चोप्रा किंवा प्राणचे भाडोत्री गुड ज्या पद्धतीने उभे असतात, तसे उभे राहतात.

' पेपर आणला का ? '

' आणला आहे '

' मूर्खा काढ की मग लवकर '

' तो पेपर मी तुम्हाला कधी देणार नाही हे पहा.' अस म्हणून जॉन आईने दिलेला पेपर पुस्तकामधून काढतो व डोळ्याचे पाते लवते न लवते तोच त्यांचे तुकडे तुकडे करून टाकतो—

अन्यायापुढे मी मान तुकविली नाही ह्या जॉनची भावना आणि जिद्दच आयुष्यात त्याला मोठी करणार असते

नाताळाच्या सणात आपण सर्वजण महागडी प्रेझेंटस मित्रांना देतो, पण खरं प्रेम, प्रेमाचा ओलावा का पैशात मोजता येतो ! म्हणूनच प्रेम द्याव फुलाच्या रूपात उगाच पैशाचं दर्शन कशाला ? असा एक स्तभ टॉम आपल्या पेपरात लिहतो त्याला अद्दल घडविण्यासाठी एक श्रीमंत म्हातारोबा नाताळाच्या आदल्यारात्री टॉमच्या घरात शिरतात व ख्रीसमस-ट्रीच्या अवतीभवती ठेवलेली सर्व प्रेझेंटस् आपल्या पोतडीत भरतात. त्याच वेळेस नेमकी टॉमच्या सर्वात लहान मुलाला-निकोलस वय ८-१० वर्षं-जाग येते. तो या म्हातारबाला हटकतो. तेव्हा आजोबा सांगतात,

मी सांताक्लास आहे निकोलसचा विश्वास बसतो व त्याच्या उपस्थितीत आजोबा हे सर्व घेऊन जातात

अशा या कुटुंबात धमाल उडते जेव्हा नव्या पाहुण्याच आगमन या घरात होणार असत. त्या सध्याकाळच्या movie च नाव होत Nine is enough ? चाळीशीला आलेली ॲब्री संकोचाने, एका रेस्टॉरंट-मध्ये टॉमला ही घटना सागते टॉम नाराज होईल अस तिला वाटत असत. क्षणकाल टॉम तिच्याकडे पाहतो आणि उद्‌गारतो, " ज्या स्त्रीवर मी मनापासून प्रेम करतो ती आई होताना पाहून मला आनदच होईल " अस हे सर्वसामान्य जोडप व हेच ह्याच जीवन ! अमेरिकन समाज एक उच्छृखल स्त्री–पुरुषाचा आहे तेथील प्रत्येक स्त्री–पुरुष घटस्फोटीतच असेल अशा प्रकारची विचित्र मत आपल्याकडील साहित्यामुळे सर्वसाधारण व्यक्तीची झालेली असतात तिकडेही आपल्यासारखी कुटुबवत्सल माणसे आहेत मुलांमुलींवर त्यांचे प्रेम आहे आणि आयुष्यभर एका स्त्रीबरोबर ते ससार करतात घटस्फोटाचं एवढं भरीव प्रमाण असूनही त्याची तरफदारी करताना मलातरी कोणीही आढळला नाही आपल्या समाजाच्या गृहच्छिद्रांची सर्वांना एक प्रकारची लाज वाटत असावी अस वाटत सदोदित घटस्फोट घेणारे Weird असतात असा आमचा मित्र टॉम सागायचा आम्ही सर्व आईवडील मुल–मुली एकत्र राहतात अस मी त्याला एकदा म्हणालो तेव्हा तो उत्तरला, " Yours is natural ours unnatural."

एक गोष्ट मात्र प्रकर्षाने जाणवते. कौटुंबिक घटनावर आधारित व सांगितलेले काही सीरीयल आहेत पण यापेक्षा कितीतरी जास्त सख्येने क्राइम आणि हॉरर् यांचे सिनेमा T V वर दाखवितात. स्ट्रीटस् ऑफ सॅनफ्रान्सिस्को, किंवा हवाई फाइव्ह ओ ही निव्वळ गुन्हेगारीच दर्शन घडविणारी चित्रे वाटतात दी मॅरथान मॅन, टू मिनीटस् वॉरनींग, ब्लाईंड मर्डर या सारख्या सिनेमात गुन्हेगारीच विदारक चित्रण दिसल. टेक्सास विद्यापीठातील फुटबॉलच्या अतिम खेळाच्या वेळेस, १८० फूट उच टॉवर वर बसून एक गुन्हेगार शुटींग करतो व त्यामुळे तेथे जमलेले नव्वद हजार

लोक सैरावैरा पळतात, कोणी चेंगरले जातात, लहान मुलाची वडीलापासून ताटातूट होते हे सर्व पाहताना पोलीस, टॉवरवर उंच चढून त्या गुन्हेगाराला जायबंदी करतात, व त्यात तो मरतो अतिशय संतापलेला पोलीस ऑफीसर (चार्लस हेस्टन) त्या गुन्हेगाराचे केस हातात घेऊन किंचाळतोच, 'बोल तुझे नाव सांग ! कशाला तू हा उपद्व्याप केलास. कोण तुझ्या पाठीशी होतं' आणि क्षणभर थांबून तो आपल्या साथीदारांना म्हणतो, 'उद्यापासून या गुन्हेगाराच्या वैयक्तिक अपयशी जीवनाचा शोध वर्तमानपत्राचे वार्ताहर घेतील, आणि त्यावर आईवडीलांनी अन्याय केला, समाजाने दुर्लक्ष केल त्यामुळेच तो असा उनाड झाला अशा प्रकारच्या गोंडस आवरणाचा लेप त्याच्या या कृष्णकृत्यावर टाकतील आणि थोड्याच वेळात तो फार मोठा पुरुष म्हणून T V वर त्यांचा उदोउदो देखील होईल'

अमेरिकेतील वैयक्तिक स्वातंत्र्य हे अशाप्रकारे एका विचित्र टोकाला पोहचल्यासारखे वाटते तुरुंगात जाताना अपराधी अगदी ताठ मानेने, संपूर्ण सूट घालून जातो व सतत आपली बाजू T V च्या वार्ताहराना सांगत असतो व ते सर्व T. V वर दाखवितात तिकडे तुरुंग air conditioned असतात व प्रत्येक खोलीत T V असतो म्हणे ! ही सर्व तुरुंगात जाणारी मंडळी आपण एकजात निष्पाप, पाप ते सतत घटस्फोट घेणाऱ्या आपल्या वडीलाच्या वर्गात आपल्या मूर्खपणाला टाचणी देणाऱ्या शिक्षकाच. आपल्या दोषाच खापर समाजावर फोडून तो मोकळा होता. T V. ची वृत्ती हीच आणि वर्तमानपत्राची हीच ! अश्लील वाङ्मय निर्माण केलेला माईक थेल्वीस हा अटलांटाचा दादा ! पण त्याच्या खाजगी रंगेल जीवनाच, त्याच्या मैत्रीणीच्या फोटोसकट माहिती अगदी पहिल्या पानावर असते व प्रेसिडेंट कार्टरच स्टेटमेंट त्याच्या खाली कोपऱ्यात असत. आणि हेही अगदी नेमस्त असलेल्या आमच्या येथून निघणाऱ्या अटलांटा Journal या वर्तमानपत्रात मागे एकदा कोणीतरी म्हणाले नेत्याला जितकी प्रसिद्धी तितकीच खुन्यालाही मिळते. जॉन केनेडी इतकच T V वर्तमानपत्र यांनी ली ओसवाल्डबाबत लिहल

अमेरिकेतील या गुन्हेगारीला प्रसिद्धीच्या या माध्यमामुळे एकप्रकारे उत्तेजनच मिळते आहे या सान्या वृत्तामुळे आपण वर्तमानपत्र वाचत नाही व T V पाहत नाही, असं वैतागाने म्हणणारे एक दोघे आढळलेत. दिवाणखान्यात T. V सुरू झाला की एकमेकाचं बोलण थांबत. आई-वडील, मुलमुली नुसतं T. V पाहण्यात मग्न असतात. त्यामुळे कुटुंबातील सर्वांनी एकत्र बसून सुख–दुःखाच्या गोष्टी होत नाहीत म्हणून मी होता-होईल तो T. V लावतच नाही, असं प्रो हाफकिन्स मला एकदा म्हणाले होते डॅडी सध्याकाळी चाळीस पन्नास मैल हायवेवर प्रवास करून आलेले असतात. ते आल्यावर आपली ब्रीफकेस जागेवर ठेवून लागलीच CBS च्या सध्याकाळच्या वाल्टर क्रानकाइटच्या बातम्या पहायला कोचवर बसलेत तर मग त्याना बोलण्यासाठी वेळ कुठला ? पण मला वाटत आपल्या-सारख्या एक दुसऱ्याच्या दुखदुःखाच्या गोष्टी T V नसतानादेखील अमेरिकन माणसं बोलत नसावी. आई आणि वडीलदेखील जिथे पाहुणे म्हणून आधी फोन करून येतात आणि इकडे आपल्या मावसभावाचा मित्र रात्री बारा वाजता आमचे घरी अगदी प्रेमाने Call Bell वाजवितो व नतर रात्री एक वाजता पिठल भात खातो इतका फरक दोन सामाजिक परिस्थितीत आहे. अशा या परिस्थितीची तुलना करायचीच कशाला ? त्याच वेगळेपण निराळ आपल निराळ.

अलास्कामध्ये सपूर्ण जुलै महिना T. V बंद असतो. जुलै महिना म्हणजे उन्हाळयाची सुरवात. थंडीने कटाळलेल्या लाबचलाब पसरलेला पांढराशुभ्र बर्फ पाहून पाहून थकलेल्या नागरिकांना एकजात पिकनीकला जाण्याचा हा महिना या काळातच तर घराबाहेर जायचं, हुंदडायच, बागडायच. T V चा नसता त्रास कशाला ? पण T V. चा तो बॉक्स एकातप्रिय अमेरिकन माणसाला आवडत असावा कारण तो सतत बोलत असतो पण त्याच बोलण केव्हाही बद करता येत T. V. च्या आक्र-मणाचा रेडिओवर मात्र काही परिणाम झालेला नाही T V आल्यावर रेडिओचे काय ? हा एक कूट प्रश्न झाल्यासारखे आम्ही मात्र इकडे चिंताग्रस्त आणि आमच्या अटलाटाला तर सात T. V. च्या channels

आणि सत्तावीस रेडिओस्टेशन्स एका स्टेशनवर अखड डिस्को म्युझीक तर एकावर सतत जाहिराती. तर एकावर अखड नुसत क्लासीकल म्युझीक ! प्रत्येक घरात एक T V असेल, मात्र प्रत्येक खोलीत एक रेडिओ आहेच शिवाय प्रत्येक कारमध्ये रेडिओ वेगळा कारमधला रेडिओ अगदी आवश्यक. अर्धा पाऊणतास कार सतत चालवावयाची म्हणजे करमणूक हवीच. शिवाय हा रेडिओ सतत वेळ सांगणार, हवामानातील बदल सांगणार आणखी एखाद्या हायवेवर अक्सिडेंट झाला असल्यास ट्रॅफिक जॅम झाला आहे याचीही वर्दी देणार म्हणून आमचे मित्र सगदेव Ignition Key सुरू करण्याआधी रेडिओ सुरू करीत असत. ऑफिस-मध्येही रेडिओ चालू असतो आणि लॅबमध्ये काम करताना मायकेल किर्णानला रेडिओशिवाय चैन पडत नसे म्हणूनच अमेरिकेत कमीतकमी ८० कोटी रेडिओसेट असावेत अस मला वाटत हा रेडिओसेट साधारण १० ते २५ डॉलर इतक्या किंमतीचे असतात व Black & white T V ची किमत ८० डॉलर्स असून Coloured ची ५०० डॉलर्स इतकी असते ह्या T V. स्क्रीनचा उपयोग कॉम्प्युटर आऊट पुट मिळवण्या-साठीही आजकाल केला जातो. शिवाय Videocasettes ह्या नवीन कॅसेट रेकॉर्ड्स प्रसिद्ध सिनेमे, मोठमोठे स्पोर्टस् कॅसेट्सवर ठेवलेली असतात. व ह्या घटना आपण हव्या त्यावेळेस लावू शकतो तांत्रिक प्रगतीची कमाल झाल्यामुळे रगीत T V पाहणही डोळ्याना सुख देणारी घटना आहे कधीही अस्पष्ट चित्र येत नाही मध्येच केव्हाही कार्यक्रम बद होत नाही इराणची बातमी हेडलाईन म्हणून वॉल्टर क्रान काईट सांगतो त्यावेळेस एका कोपऱ्यात इराणचा नकाशा असतो व त्यावर ते ठिकाण मोठे दिसते व एकदम इराणच्या, त्या जागेच चित्र दिसते. तिथे असलेला वार्ताहार हाय वॉल्टर असं म्हणतो आणि मग तो अगदी प्रत्यक्षांत पाहिलेली घटना सजय उवाच या न्यायाने सांगतो व धडाधड या साऱ्या घटना T. V: वर दिसतात त्याच्या त्या Syncehronisation मध्ये इतकी अचूकता असते व्हॉलीबॉल खेळातील खेळाडुच्या चेहऱ्यावरची प्रत्येक रेष स्पष्ट दिसते. इतकच काय एखादा शॉट चुकल्यावर त्याला जो राग येतो किंवा

रागाने तो ओठ चावतो तेही T V वर अगदी स्पष्ट दिसते T V ची लोकप्रियता ही मला वाटते या परफेक्शनचा दूरगामी परिणाम आहे स्कायलॅब पडण्यापूर्वी तिचा मार्ग दर पधरा मिनिटानी T V स्क्रीनवर स्पष्ट दिसत असायचा म्हणूनच ती आपल्या घरावर पडणार नाही याची खात्री प्रत्येकाला असते वैज्ञानिक दृष्टीही अशा रीतीने तयार होते. समाजाचा विज्ञान हा धर्म होतो तो यामुळेच विज्ञानाच्या फार मोठ्या तात्विक शोधाची अनिश्चितता सोडली तरी एक प्रकारचा निश्चितपणा विज्ञानाने या सामाजिक जीवनात निर्माण केला आहे विज्ञानाने सांगितलेले ते खरेच आहे, इतपत श्रद्धा विज्ञानावर अगदी सामान्य माणसाची निर्माण झाली की आपोआपच अधश्रद्धा नाहीशा होतात सूर्य ग्रहणाच्या वेळेस प्रत्येक स्पर्शकला स्पष्टपणे तुम्हाला दिसत असल्यातर मग आपल्या समाजात निर्माण झालेल्या अधश्रद्धा राहतीलच कशाला ? या सान्या वैज्ञानिक गोष्टींचा सर्वांनी पाठपुरावा करायचा व अधश्रद्धा, धार्मिक विचित्र रूढी यांचा फोलपणा दाखवायचा त्या दोन्ही कामाची सांगड घातल्याशिवाय आपल्याकडे खरी वैज्ञानिक दृष्टी येईल असं मला वाटतच नाही

अगदी मागील २५ वर्षांपूर्वी आपण विज्ञानाशी जवळ जवळ सबधितच नव्हतो आपलं विज्ञान होतं प्रयोगशाळेत आणि पुस्तकात. विज्ञानाबरोबर आपण जगत नव्हतो त्यामुळेच तो आपला सांगाती नव्हता. कुठल्यातरी परक्या ग्रहावर असलेल्या विचित्र पाहुण्यासारख त्याच्या सहारक शक्तीची चर्चा करण्यातच आपण रमलो होतो पुस्तकांचा अभाव, रेडिओ दुर्लभ आणि म्हणूनच नवीन विचाराचा अभाव ! Let noble thoughts come to us from all directions अनोभद्रः अन्तु विश्वतः असं ऋग्वेदात म्हटल असल तर noble thoughts सर्व दिशानी येण्यासाठी नुसत्याच विचारवंतांची आवश्यकता नव्हती तर त्यांचे मौलिक विचार जतन करून ते पिढ्या न पिढ्या नेणाऱ्या छपाईची माहिती नसल्यामुळे असे नूतन विचार फार आले नाही त्यामुळेच आपल्या जीवनातील कर्मकांड, अधश्रद्धा अगदी या शतकाच्या पहिल्या दोन तीन दशकापर्यंत तशाच जिवत राहिल्या. दोन हजार वर्षांपासूनची ही कर्मकांड, पोथ्यापुराण,

कालानुरूप आपण तपासूनच पाहिली नाहीत कारण तशा प्रकारचा विचारच कोणत्याही समाजात निर्माण झाला नाही त्यामुळेच एकमेकांशी दळणवळणाचा अभाव असल्यामुळे रोटीबेटीचे व्यवहार पंचक्रोशीतच होत राहिले पणजोबा जसे जगले तसंच पणतूही जगू लागला. कारण दोघांचही आर्थिक, सामाजिक जीवन अगदी एकसारखं होत—

पिढी बदलली, तरुण मंडळी बिघडली असं आता आता आपण म्हणू लागलो वडिलांपेक्षा आमची पिढी ज्या वेगाने बदलली त्याच्या कितीपट वेगाने आमची मुलं बदलत आहेत, कारण ज्या सामाजिक आणि आर्थिक चौकटीत ते वावरत आहेत, त्या चौकटी धडाधड वेगाने कोसळत आहेत वैज्ञानिक प्रगल्भ विचार व त्यापासून झालेली तांत्रिक प्रगती यामुळेच जुन्या जोखडाचे खंडन होणार आहे.

समाजाची सांस्कृतिक म्हणा किंवा वैज्ञानिक प्रगती होण्यासाठी त्याला दशकानुदशके मानसिक स्थैर्य हवे. परकीय आक्रमणापासून तो समाज दूर असावा, अंतरस्थ कलहापासून वेगळा असावा, अशा या समाजातच नवीन विचार फोफावतात. कारण ज्या थोर व्यक्ती हा विचार देतात, त्या बरोबरच सामान्य नागरिक तो विचार आत्मसात करू शकतो. समुद्रगुप्तानंतर असं 'सुवर्णयुग' आपल्याकडे येऊ शकलं नाही त्याचही हेच कारण असावं.

अमेरिकेने महायुद्धात सक्रीय मदत दिली पण युद्ध त्यांच्यापासून दूर होते. त्याचा जोवघेणा परिणाम त्यांच्या सामाजिक जीवनावर होण्याचं कारण नव्हतं ही प्रचंड महायादवी संपूर्ण जीवन उध्वस्त करतात जुनी नीतिमूल्यं ढासळून पाडतात, प्रचंड आर्थिक उलथापालथ करतात. त्यामुळेच समाजात स्थैर्य नसत शांती नसते. अशी शांती, सामंजस्य परस्परांत असल्याशिवाय काही प्रगती होण्याची शक्यता नाही.

T V च्या कार्यक्रमाची आगाऊ प्रसिद्धी करणारं T V guide फक्त ३५ सेंटला मिळत तर creative loufing सारखं आठ पानाचं वर्तमान-पत्र फुकट ! इतर सर्व कार्यक्रमापेक्षा सरस असे कार्यक्रम म्हणजे स्पोर्टस्, T. V , याच coverage फार जबरदस्त आहे. फुटबॉल, व्हॉलीबॉल व

बेसबॉलच्या मॅचेस राष्ट्रीय आणि विद्यापीठीय हे दोन्ही cover करतातच पण त्याहीपेक्षा अतरराष्ट्रीय महत्त्वाच्या सर्वप्रकारचे अमेरिकेत किंवा बाहेर होणारे सामने प्रक्षेपित करतात विंबलडन टेनीस, ऑस्ट्रेलियात झालेली Miss Universe contest, जर्मनीतील फुटबॉल मॅचेस, जपानचे कराटे व बॉक्सींग अगदी जसेच्यातसे दिसतात. हे पाहताना नितांत सुख मिळते आनद मिळतो एवढे खरे! म्हणूनच की काय शुक्रवारी रात्री चांगले T V वरील सिनेमा पाहता पाहता सकाळचे ३ वाजतात व मग शनिवारी सकाळी कोणीही दहा वाजण्याच्या आधी उठत नाही सकाळी पेपरवाला, दूधवाला, मोलकरीण आणि इकडून चाललो होतो तर म्हटल तुमच्याकडे डोकाऊन जावं म्हणून सकाळी ७ वाजता सहज डोकाविणारे महाभाग तिकडे नसतात म्हणून झोप निवांत लागते

शनिवारी सकाळी मुल आपल्या खोलीतून उठून सरळ T V समोर येऊन T V. सुरू करतात फ्रीजमधील दूध पिऊन मुल मग सकाळी अकरा वाजेपर्यंत T V पाहतात कारण यावेळेस फक्त लहान मुलांसाठीच कार्यक्रम असतात

मुलं–मुली टी. व्ही. समोर असतात आणि त्यांचे आई–वडिल अगदी घोरत असतात. असं हे जीवन आणि असा हा T V चा सामाजिक जीवनावर झालेला परिणाम

# ७. कष्टाळू आणि निःसंकोची समाज

अमेरिकेहून परत येताना इकडचे एक मोठे इंजिनियर भेटलेत. फक्त दीड महिन्याकरिता ते व त्यांच्या सौभाग्यवती अमेरिकेची वारी करून परत येत होत्या सहज त्यांना मी विचारले, ' आवडली का, अमेरिका तुम्हाला ? कशी वाटली ?' ' बाकी सर्व ठीक आहे पण माझ्या बायकोला फार काम पडले ' तिची बहीण सेंट लुईला डॉक्टरीण आहे बहिणीच्या घरी आराम करण्यासाठी गेलो आणि फारच कष्ट उपसावे लागले ' त्यांच्या स्वरात नाराजी होती.

' बरोबर आहे, अमेरिकेत आमच्या भारताइतकच स्त्रीयांना घरात फार काम करावे लागते मी सहज म्हणालो ' नाहीतर काय !' फणकाऱ्याने बाई उत्तरल्यात ' मी एवढ्या मोठ्या साहेबाची बायको, आमचे घरी किती गडी आणि किती मोलकरणी अहो, मागील पधरा वर्षात मी चहासुद्धा केलेला नाही,' बाईंचं मोठेपण मला त्यांच्या प्रत्येक शब्दागणिक जाणवू लागले पत्नीचीच बाजू पुढे मांडत साहेब म्हणाले, ' खरं सांगतो ही इतकी सुखात आहे, अहो चहाच काय मला तर वाटते मागील दहा वर्षात हिने स्वयंपाकघरातदेखील पाऊल टाकले नसेल अगदी आरामाची सवय आहे हिला ', पत्नीला आपण किती सुखात ठेवतो याचा साहेबांना अहंकार होता तर आपण खरोखर सुखात आहोत म्हणून बाईसाहेब जीवनावर निहायत खुष होत्या.

अशा प्रकारच्या ' सुखात ' राहण्यापेक्षा ' कष्टात राहणे केव्हाही चांगले पण बाईंचे एक म्हणणे खरे होते. अमेरिकेत स्त्री-पुरुषाना खरोखरंच चांगलेच कष्ट करावे लागतात. मोलकरीण ही संस्थाच तिकडे नाही ! स्वयंपाकाला बाई ठेवणे फक्त गव्हर्नर किंवा सिनेटर यानाच परवडू शकते. घरे मोठी असतात. ४-५ प्रशस्त खोल्या प्रत्येकाकडे असतात.

या सर्व खोल्या साफ करायच्या, शनिवार रविवारी व्हॅक्युम क्लीनरने त्यावरील जाजमाची धूळ निपटून घ्यायची, नवनवीन cleaning agents वापरून काचा स्वच्छ करायच्या, टब घासायचा, टॉयलेटचा कमोड अगदी लख्ख करून ठेवायचा ह्या सर्व गोष्टी, ही सर्व कामे स्त्री, पुरुषांना करावी लागतात. या शिवाय सप्टेंबरपासून fall ऋतू सुरू झाला की झाडांच्या पानाची पडझड सुरू होते. ती पान घरासमोरील, बाजूच्या, मागच्या बागेत, गवतावर पडलेली असतात ती सर्व जमा करायची, प्लॅस्टिकच्या पिशव्यात भरून ठेवायची, यासाठी सारा शनिवार खर्च होतो घराच्या भिंतींना रंग द्यायचा, wallpaper चिकटवायचा, आवश्यक सुतारकाम, लोहारकाम, विद्युतकाम हे सर्व स्वतः करावे लागते. ग्रोसरी आणायला स्वतः जायला हव, वॉशींग मशीनमध्ये कपडे धुवून, वाळवून त्याला इस्त्री स्वतःलाच करावी लागते प्रत्येकाजवळ मोटार असतेच पण तिची निगराणी ठेवावीच लागते मोटारीचे मागचे पुढचे दिवे, सर्व इंडिकेटर्स काम करायलाच हवीत, यासाठी तिची सेवा करणं आवश्यकच असत बरं रस्त्याने म्हणा किंवा हमरस्त्यावर मोटार नादुरुस्त होऊ न देण्यातच शहाणपणा असतो म्हणून मोटार ही सतत चांगल्या स्थितीतच ठेवायला हवी Fall मध्ये पान गोळा करण्याच काम तर हिवाळ्यात बर्फ पडायला लागला की आपल्या घरासमोरील बर्फ दूर केला तरच मोटार बाहेर काढता येते, याशिवाय घरासमोरील फूटपाथसुद्धा स्वच्छ करावा लागतो. तो स्वच्छ असला, त्यावर बर्फ नसला तरच पोस्टमन किंवा पेपर टाकणारा पोऱ्या पेपर बॉक्सपाशी जाईल ! म्हणून हिवाळ्याच्या कडक थंडीत उष्णतामान शून्याखाली १५–२० अंश असताना, सर्व साधनसामुग्री घेऊन बर्फ साफ करण्याचे उद्योग करावे लागतात. घरासमोरील फुटपाथ थोडा ओलसर असला व एखादा पोस्टमन त्यावर घसरला तर तो घरमालकाला कोर्टात खेचल्याशिवाय राहणार नाही !

हिवाळ्याचा घरात त्रास नसतो उष्णतामान सदोदित २५ डिग्री इतक ठेवलेल असत. हे heaters कधी बद होत नाहीत, वीज सतत चालू असते ! गरम पाणी आलच नाही असाही प्रकार नाही. ग्रोसरी स्टोअर्स-

मध्ये सर्व वस्तू मुबलक मिळतात, कुठल्याही वस्तूची टंचाई नसते, त्यासाठी रांगा लावाव्या लागत नाहीत त्यामुळे उद्या ही गोष्ट कशी मिळणार अशी रुखरुख व त्यामुळे ढळणारी मनःशांती यापासून तिकडच्या व्यक्ती मोकळ्या आहेत, पण त्याना काम नाही असं म्हणाव कसं ?

मागील दोन वर्षांच्या काळात मी अमेरिकन विद्यार्थी पाहिला, रेस्टा-रेंटमध्ये काम करणारा शेजारी पाहिला, ग्रोसरी स्टोअर, बॅकेमध्ये काम करणाऱ्या सामान्य व्यक्तीशी बोलली. अमेरिकन राहणीमानाने ही मध्यम परिस्थितीची माणस ! यांच्याशी बोलताना मला जाणवल याना आपल्या-सारखीच प्रत्येक डॉलरची किंमत वाटते, एखादा डॉलर उगाच खर्च झाला तर हळहळ देखील वाटते ! मी २२ वर्षांचा झालो तरी आई-वडिलांच्या घरीच राहतो हे सांगणारा टीम पुढे सांगतो की मी राहतो कारण अस राहण वेगळं राहण्यापेक्षा कमी खर्चाच आहे आपण रवि-वारच्या दुपारी एक वाजता दाखविल्या जाणाऱ्या सुपरमॅन या सिनेमाच्या मॅटिनीलाच जाऊ कारण इतर वेळेपेक्षा दुपारी प्रत्येकाला एक डॉलर कमी पडतो असं सागणारी आमची शेजारीण बार्बरा, ही कोथिंबिरीची प्रत्येक काडी मोजून घेणाऱ्या आमच्या बनुताईपेक्षा मला कधीच निराळी अशी वाटली नाही. या दुपारच्या शोचे तिकीट मिळाल नाही तर पुढच्याच म्हणजे दुपारी ३॥ वाजताच्या शोच प्रत्येकी दोन डॉलरचे सर्व कुटुबाच तिकीट काढण्यापेक्षा, सरळ पुढच्या रविवारीच जाऊ अस म्हणून आपल्या मुलाबाळांसहित परत जाणारे आईवडील मी अगदी डोळ्यानी पाहिले, तेव्हा ' अनारकली ' सिनेमा न पाहताच आम्ही सर्व परत आलो होतो याची आठवण का होऊ नये ? शेवटी खरं काय, माणस इथून तिथून सारखेच, त्यांच्या भावना सारख्याच, त्यातील तीव्रता थोडी कमी अधिक इतकच !

मी प्रथम आमच्या apartment मध्ये राहण्यास आलो त्यानतरच्या रविवारची गोष्ट माझे प्रोफेसर हॉफकिन्स व यांच्या पत्नी त्याच्या कार-मध्ये बसून मी खरेदीसाठी जात होतो. समोरच्या चौकात Movie ची जाहिरात पाहिली आणि एकदम मी म्हणालो, ' बर झाल, सिनेमा थिए-

टर जवळच आहे. मला मधून मधून जाता येईल ' तेव्हा तावडतोब मिसेस हॉफकिन्स मला म्हणाल्यात, ' तू येथे जाऊ नकोस–सज्जन माणसानी हे जाण्यासारख नाही ! ' मी त्यावेळेस चमकलो, नतर तपास केला तेव्हा कळलं की हे X rated Movie theatre होते येथे अशा Movie च कुतुहल तर तेथे मी तो पाहू नये अस सांगणारी आमची गुरुपत्नी. म्हणूनच आपण वाचतो त्याच कल्पना खऱ्या मानायच्या का ? की आपण अनुभविल्या त्या खऱ्या मानायच्या ? अस वाटल्यावाचून मला राहवत नाही. बर या हाफकिन्स महाशयांचे वय ३८ व त्यांच्या पत्नी अदमासे इतक्याच वयाच्या. म्हणजे त्याच हे अधिकृत मत वार्धक्यामुळे आल्हेल नाही, सुजाण, जाणत मन होत त्याचा हा आविष्कार होता

पधरावीस वर्षांपूर्वीची एक घटना अमेरिकेत नकळत जिवंत झाली. माझ्या बहिणीच्या सासऱ्यांना आम्ही दिवाळीत जेवायला बोलाविले होते सासरे त्या काळातील जुन्या पिढीतले विदर्भातले घरदाज शेतकरी. जेवायला या अस निमत्रण दिल्याबरोबर ते उद्‌गारले, ' येतो, पण बासुदी करणार असलात तरच होय अस समजा.' वडिलानी तावडतोब होय म्हटल व घरी येऊन सर्वांना ही हकीकत सांगितली, त्यावेळेस जमलेल्या काही तरुण बडखोरांना बहिणीच्या सासऱ्याची ती मागणी फार अगाऊपणाची वाटली जेवायलाही येतात व हेच करा अस सांगतात हा काय न्याय झाला ? असे म्हणून थोड्या वेळ घरात धुसफूस झाली त्यावेळेस मी फारतर १०–१२ वर्षांचा असेन पण ती घटना माझ्या मेंदूत जी जाऊन बसली ती ३० वर्षांनी पुनः अमेरिकेतच जिवत झाली नाताळच्या सुटीत सणात आमचे मित्र जॉन व सँडी यांनी जेवायला बोलविल. सँडी ही विद्यापीठात सेक्रेटरी व जॉन एका छापखान्यात अमेरिकेच्या त्या अथाग श्रीमतीत त्यामानाने हे कुटुब साधारणच ! पण त्यांनी मला प्रश्न केला ' तुम्हाला काय आवडत ? भेंडीची भाजी चालेल की कोबीच हवी ? मुलांना चिकन करी हवी की फ्राइड चिकन चालेल ? आइस्क्रीम चॉकेलेटच हव की व्हॅनिला चालेल ?' प्रश्नाची ही सरबती ऐकून मी व माझी पत्नी भाबावून गेलो हे काहीतरी निराळेच होते, असं यापूर्वी

कुठंही घडल्याचं ऐकिवात नव्हतं, प्रत्यक्ष अनुभविलं नव्हतं मी उत्तरे देण्यापूर्वी पुनः एकदा संकोचानं म्हणालो, 'तुम्हाला जे शक्य असेल ते करा, आम्हाला सर्व काही आवडेल. तेव्हा जॉन थोडासा जास्त जवळीकीने म्हणाला, 'नाही, तुम्हाला जे पदार्थ आवडतात तेच आम्ही करणार. आम्ही काहीही तयार करू शकतो, तुम्हाला काय आवडते तेच सांगा, हीच आमची पद्धत आहे, माझे आईवडिलांना मी बोलावितो तेव्हा चीज टाकलेला पीझा व स्पॅगेटी एवढाच मेन्यू असतो कारण आईला पीझा फार आवडतो व वडील स्पॅगेटीवर नुसता ताव मारतात.'

निमंत्रण देऊन जॉन व सँडी निघून गेलेत जाताना पुनः सांगून गलेत, 'रविवारी दुपारी ६ वाजता जॉन तुम्हाला घ्यायला येईल व रात्री ९–१० च्या दरम्यान तुम्ही सांगाल तेव्हा परत आणेल. तुम्ही काळजी करू नका.' हे सारं मी चकीत होऊन ऐकत होतो आणि नकळत ती ३० वर्षांपूर्वीची घटना अजाणता जागी झाली घरात काहीही करता येणे शक्य आहे म्हणूनच जॉन व सँडीचा आम्हाला आग्रह होता का ? आमच्या घरातील सर्व माणसे अगदी प्रेमळ, अगत्यशील, पाहुण्याची उठबस करणारी असूनदेखील सासऱ्यांची ती मागणी आम्हाला अवास्तव का वाटावी ? विचाराचा सतत गुंता होत होता आम्ही श्रीखंड करणार होतो, त्यांनी बासुंदी मागितली तर ते आम्हाला इतकं का लागावं ? सर्वांची त्या काळातली वक्तव्ये आठवू लागलो, त्यातले एक स्पष्ट आठवले, 'नाही-तरी म्हातारा खादाडच, आठ दिवसांनी एकदा तरी बासुंदी खाल्ल्याशिवाय म्हाताऱ्याला चैन पडत नाही' म्हणजे राग खरा होता तो या खादाडपणा-वर, बासुंदीची जबरदस्ती केल्याबद्दल नाही.

तसं पाहिलं तर आपलं खाणं 'खादाडपणाच्या' शब्दात मोडतच नाही. अमेरिकन मनुष्य हा सतत खात असतो. सकाळी ब्रेकफास्ट करून ऑफिसात आला, की जवळच्याच slotmachine मधून तो २–३ वेळेस कॉफी घेईल, मध्येच पीनट्स्, वेफर्स तोंडात टाकेल. चॉकलेट खाईल शिवाय स्वतःबरोबर आणलेले एखादे ॲपल कराकरा खात खात कॅरीडार-मधून हिंडेल लंचनंतर आईस्क्रीम खाण्याचा तर परिपाठच ! दुपारी पुनः

एखादे सँडविच, कॉफी व रात्री सपर सात वाजता व झोपण्यापूर्वी पुनः एखादे सँडविच, ही व्यक्ती दिवसभर काही ना काही तोंडात टाकत असते आपल्याकडे म्हणजे फक्त दोनदा पोटभर जेवण, मध्ये एकदा चहा तब्येतीमुळे म्हणा किंवा शारीरिक कष्ट फारसे न करण्यामुळे म्हणा प्रत्येकाचे जेवण फक्त एकदोन पोळ्या त्यातही एकच पोळी मला लागते हे सांगताना आपली श्रीमंती दुसऱ्यांना दाखवायचा अहंकार. पंगतीला एखाद्याची मजल ५-६ पोळ्यांपर्यंत गेली की सर्वांनी त्याकडे डोळे विस्फारून पाहावे व मग ६ व्या पोळीपासून एकावेळेस चतकोर पोळीच पानात वाढायची व पुढील महिन्याभर त्या खाण्याची चर्चा करायची ! अमेरिकेत असं काहीच होत नाही आमच्या डिपार्टमेंटला एखादा seminar असला की notice मध्ये स्पष्ट लिहिलं असायचे Coffee will be served at 2 45 p m. आणि २-४५ ला सर्व हजर ! अगदी Prof. आणि Head of the Dept. सुद्धा ! प्रथम कुकीज, कोका घेणार, डोनट तोंडात टाकणार व कॉफीचा कप भरून व्याख्यान चालू असताना आपल्या खुर्चीवर ठेवणार, पुनः Seminar आटोपला की कॉफी भरून आपल्या lab मध्ये परत ! हे प्रत्येकजण करत असतो पण कोणी कोणाकडे लक्ष देत नाही हसण्याची गोष्ट तर सोडाच !

आबा भट कुठल्याही प्रसंगाला आमचेकडे जेवायला येत ते जेवायला बसले की परातभर भात आई त्याच्या पानात टाकायची, तेव्हा सारे घर प्रेक्षक म्हणून भटाच्या खाण्याकडे जातीने लक्ष ठेवायचे. लहान मुलाना मजा वाटायची तर सारी वडिलधारी माणसे 'काय अचाट खाणे ' म्हणून कुत्सितपणे हसायची. आज या घटनांकडे पाहिले की वाटते हे खरे का ते खरे !

मला वाटते हे सर्व आमच्या एकूण गरिबीतूनच आले असावे दहा माणसाचा भात एकटा भटच खाऊन जातो हे मनात कुठेतरी टोचलेलं शल्य वडिलधाऱ्या मंडळींना सतत बोचत असावं ! या सर्वांमुळेच आमच्यामध्ये अंधश्रद्धा किती आल्यात जेवताना बोलू नये, कोणासमोर खाऊ नये, अगदी भुकेल्या लहान मुलाला दूध पाजताना आडोशाला नेऊन पाजावं, कारण कोणाची ' नजर ' लागते ही आपली कर्मठ मते व तसे आपले

आचरण ! लहान मुलं दूध पीत असताना आजुबाजूची इतर मुलाची त्यावर नजर लागेल कारण दुधावरची त्यांची वासना अजून पूर्ण झालेली नाही, हे आपण गृहीत धरले आहे याचा सोईस्कर विसर आपल्याला का पडावा ? जिकडेतिकडे सुबत्ता असली, सर्वांना अगदी पोटभर मिळून सर्व जण समाधानी असल्यास एकाची नजर दुसऱ्याला लागेल ह्या गोष्टीवर कोणी विश्वासच ठेवणार नाही ? आपल्या या परंपरेमुळेच सतत आपला समाज हा विषम असावा, श्रीमंत व गरीब हा भेद या समाजात पूर्वीपासून असावा असा साधा निष्कर्ष काढल्याशिवाय गत्यंतर नाही

आमचे मित्र डॉ फरूक बोस त्यांच्या मुलाचा वाढदिवस म्हणजे इंटरनॅशनल गॅदरिंगच ! जपानचे कोहोटो, डेनमार्क न्युझिलडचे, इजिप्त व पाकिस्तानचे Postdocks त्यातच त्याच्या पूर्वीच्या मालकीणबाई व त्याचे यजमान. दोघेही मेडिकल डॉक्टर व त्यामुळे अमेरिकन समाजात देखील 'श्रीमंत' म्हणून गणली जाणारी. बाईचा ड्रेस म्हणजे फुल जीन व अंगावर एक लांब नेहरू शर्ट आल्या आल्या त्यानी खास अमेरिकन पद्धतीने सगळ्यांना हाय केलं, बऱ्याच जणाना अगदी हात लांब करून साता जन्माची ओळख आहे या भावनेने दृढ अलिंगन दिलं– पण तेही एका गमतीचाच भाग असं वाटते. जेवण बफे होत. पहिल्या course ला बाई सर्वांत पुढं, प्लेटमध्ये घेतलेली प्रत्येक वस्तू बोटान चाखून पाहिली. हाय, हाय करीत तिच्यावर ताव मारीत बाई थोड्या बाजला बसल्यात भराभर खाऊन बाई लगेच दुसऱ्या प्लेटसाठी तैयार ! अशा या गॅदरिंगमध्ये आपला संकोची स्वभाव आणखीनच संकोची होतो व त्यामुळे पोट उगाच आकुंचन पावते कोणी आपल्याला खादाड म्हणू नये म्हणून आपण अक्षरश भूक मारत असतो ही बाई मात्र सर्वांच्यामध्ये उभे राहून चिकन, भाज्या, पुऱ्या, सॅलड यानी भरलेली प्लेट एका हातात, सांभाळण्याची कसरत करण्यातही आनंद मानत होती दुसऱ्या course नतर आमच्यापैकी कोणीच उठायला तयार नव्हते बाई सरळ उठून पुनः टेबलापुढे ! ना कुठला संकोच, ना कुठला लाजाळूपणा तीनही प्लेट खाल्ल्यावरदेखील सुस्तपणा नावाला नाही. तशाच गप्पा Desert म्हणून

मिसेस बोसने बगाली मिठाई केली होती. बोस वाढायल्या आल्यावर भारतीय स्त्रियांनी तर जणू काही आपण मिसेस बोसवर अगदी कृपाच करणार आहोत असा आविर्भाव करीत दहा वेळा खूप झालं हं, करीत एक रसगुल्ला, चमचाभर खीर व तितकाच कलाकद घेतला या बाईंना रसगुल्ले फार आवडले म्हणून एक तोंडात टाकल्याबरोबर what a fantastic ? अस म्हणत बाई एकदम बोस पुढे हजर, त्याच्या जवळच्या Bowl मधील ५–७ रसगुल्ले आपल्या प्लेटमध्ये टाकून बाई आम्हा सर्वांच्यामध्ये फतकल माडून बसल्या आपण आजुबाजूच्या लोकांचा फार विचार करतो, हा काय म्हणेल तो काय म्हणेल म्हणून इच्छा असली तरी भूक मारून बसतो, येथेही बाई अगदी सर्वांसमोर निःसंकोचपणे रसगुल्ले चापत होती सिगा-रेट ओढण्यापूर्वी तितक्याच मोठ्या आवाजात ती मिसेस बोसला म्हणाली, ‘ खूप चांगले झालेत ग तुझे ते रसगुल्ले. आणखी ५–६ मला डब्यात घालून दे. उद्या सकाळी break fast ला खाईन म्हणते ’—

जाताना आठवण ठेवून रसगुल्ल्याचा डबा सर्वांना दाखवीत बाई परत गेल्या त्यांच खाण आम्हा कोणालाच ‘ अचाट ’ वाटल नाही कारण ‘ ती अमेरिकन बाई म्हणून ’च. तिच्या खाण्याची कोणी चर्चा केली नाही कारण तिच्या ५ खोल्यांचं मोठ घर सर्वांनी पाहिल होत शिवाय निःसकोची स्वभाव आम्हाला माहित झाला होता. हा निःसकोची स्वभाव अमेरिकन स्त्रीपुरुषात सदैव दिसून येतो कॅथीच्या लग्नात म्हणूनच तिची पन्नाशीला आलेली आई मुलीइतकाच उघड्या गळ्याचा झगा घालून मिरवित होती तर पोलीसचे ज्येष्ठ अधिकारी असलेले तिचे वडील शॅम्पेनच्या कारंज्यासमोर उभे राहून प्रत्येक पाहुण्याचा प्याला स्वतःच्या हाताने भरून देत होते आमच्या समोर राहणारी सीला हातात बियरचा ग्लास व सिगारेट घेऊन वडिलांना दरवाजा उघडून ‘ come on in daddy ’ अस म्हणत होती मॅजिक मार्केट, रेस्टारेंटमध्ये न घाबरता रात्रपाळीची नोकरी कित्येक मुली करीत होत्या विद्यापीठाच्या स्वीमिंग पूलवर बिकीनी घालून तरुण मुली पडलेल्या दिसायच्या तर तिकडे आपल्या बायकोला, स्वतःचे लग्न आटोपल्यावर अवघ्या दहा मिनिटाच्या अतराने,

सिगारेट पेटविण्यास आमचा गाय मदत करीत होता. केमेस्ट्री विभागाच्या कॉरीडॉरमध्ये गळ्यात गळा घालून गोष्टी करणाऱ्या प्रेमवीरांना आजु-बाजूची जाणीव नसायची लॅबमध्ये येताना प्रोफेसर हॉपकिन्स हॅमबर्गरचा तुकडा तोडत यायचे तर साठीच्या आसपास आलेले प्रोफेसर विल्सन कुठल्याही मुलीला भेटलेत की तिला आलिंगनात बद्ध करीत होते

प्रोफेसर आलेत म्हणून बार्बराने कधी सिगारेट विझविली नाही तर आमच्या स्टीव्हची प्रेयसी लॅबमध्ये प्रातःकाळी आली की सकाळचे पहिले अलिंगन त्याला सर्वांसमोर देत होती.

तेथे गेल्याच्या पहिल्या आठवड्यात मला हे फार विचित्र वाटायचे. माझ्यातला वयस्कर पुरुष आपोआपच आपण काही पाहिलेच नाही अशा भावनेने खाली मान घालून पुस्तक वाचायचा. पुढेपुढे मला हे सारं पाहताना ना संकोच वाटू लागला, ना मी मान खाली घालू लागलो हा साऱ्या तेथील वातावरणाचा परिणाम होता. अमेरिकन जीवन जवळून पाहिल्यामुळे या माणसांचे इतरही स्वभाववैचित्र्य ध्यानात येऊ लागले त्यांची राहण्याची पद्धत समजू लागली पाहता पाहता सँड्रा आमच्या घरात रुळली माझ्या मुलाबरोबरच शाळेतून ती यायची, अपार्टमेंटसमोरील कारपेटखाली आईने ठेवलेली किल्ली उचलायची, घर उघडायची व एवढ्यामोठ्या घरात एकटीच बसून राहायची सकाळी बस स्टॅन्डवर मुलाला मी पोहचवायचं तेव्हा तिची आई तिला अगदी ओंजारात गोंजारात आणायची आईचं अशा प्रकारच दर्शनी प्रेम सहसा आपण इकडे पहात नाही आई सध्याकाळी ७-८ वाजता नोकरी करून यायची तोपर्यंत ही आपली घरात एकटी ! म्हणून एकदा ती मुलाशी खेळायला माझ्या घरी आली व मग सतत येतच राहिली तिच्याकडे पाहिलं की मला कीव यायची आठ वर्षे वयाची ही मुलगी अगाने धिप्पाड होती वजन जवळ जवळ सत्तर पौंड असाव इतकी ! शनि, रविवारी ती डॅडीला भेटायला जायची निरनिराळ्या बॉय फ्रेंडसला घेऊन तिची आई कारमधून येताना दिसायची. तीन-चार महिनेच ती आमच्या शेजारी होती तिच्या आईला नवा मित्र मिळाला आणि त्यानी आमचं apartment सोडले.

सॅड्रा सारखाच ट्रमारो वयाने तिच्यापेक्षा मोठा सॅड्राला शनि, रवि, जायला डॅडी तरी होते. ट्रमारो नुसता इकडे तिकडे भटकत राहायचा आपली पत्र ट्रमारोने उसकटली अशी तक्रार एका भाडेकऱ्याने मालकाकडे केली दिसायला अगदी गोरागोमटा, वेळ जाईना, मग खालील दगड मार, गारबेज ठेवलेल्या लोखडाच्या मोठ्या बॉक्सवर जाऊन बस असे याचे उद्योग सुरू झाले. ग्रोसरी स्टोअर मधून येत होतो दहाबारा वर्षांचा एक मुलगा धावत समोर आला आणि म्हणतो कसा ! जरा २५ सेंटस देता कां ? आईवडिलांपासून वेगळी असलेली ही मुले पाहिली की अमेरिकन समाजाची एक विस्कळीत, वैफल्यग्रस्त बाजू दिसायला लागते ? एवढी वैज्ञानिक प्रगती गाठलेल्या या राष्ट्राला झालय् काय ? असं वाटल्याशिवाय राहत नाही या मुलांना प्रेम मिळाल नाही मुख्य म्हणजे याचा शाप आहे एकातवास, करण्यासारखं खूप आहे पण काय करावं तेच त्याना कळत नाही अमेरिकेतील वाढत्या घटस्फोटाचे हे एक विदारक सत्य आहे दिवसेंदिवस घटस्फोटाचे प्रमाण वाढत आहे असे म्हणतात ह्या घटस्फोटाची कोणी तरफदारी करत नाहीत चागली सत्त्वशील माणसही या समाजात असतील पण त्याची सख्या दिवसेंदिवस कमी झाली तर या समाजाचे भवितव्य कठीण आहे ही मुले अभ्यास करीत नाहीत उनाडक्या करतात किंबहुना अमेरिकेत जन्माला आलो हीच केवढी भाग्याची गोष्ट आहे, ही साधी गोष्टही ते विसरत आहेत एरवी कैक सामान्य बुद्धिमत्ता असलेले लाखो अमेरिकन इतर कोठेही जन्माला आले असते तर त्याचे जीवन चाकोरीतून गेले असते आपल्याला काय सोयी आहेत, किंवा सुविधा आहेत याचाही कधी विचार करीत नाहीत. परीक्षेच्या पद्धती एकूण सोप्या असल्यामुळे मॅट्रीकपर्यंत जाणे तेथे अगदी सोपे आहे हे सर्व असून अतर्मनातून ही माणसे दुःखी आहेत जॉर्ज लिराय (Leroy)ची माझी ओळख वेदांत सोसायटीत झाली. तीस बत्तीस वर्षांचा जॉर्ज अतिशय सात्विक, मनमिळावू वाटला. भारतीय सस्कृतीबद्दल त्याला अभिमान होता. ती जाणून घ्यायची इच्छा होती पण तो अभ्यासात, साधारण होता. ग्रॅजुएट होऊ शकत नव्हता. नोकरी

साधारण होती थोडक्यात म्हणजे जीवन यशस्वी नव्हते म्हणून त्याच्याच शब्दात सांगायचे म्हणजे 'मला dates मिळत नाहीत.' यास एकदा date मिळाली. त्याने आदल्या दिवशी मला फोनवर विचारलं की माझ्या मैत्रीणीला मी तुझ्याकडे घेऊन येतो भारतीय कुटुंब पाहून तिला आनंद होईल मी संमती दिल्यावर तो आला. अमेरिकन समाज त्या मुलीला एकदम कुरूपच म्हणायला हवी इतकी ती सामान्य होती. आणि जॉर्जपेक्षा एक फुटाने ठेंगणी. शेवटी काय गरीब व्यक्तीवर प्रेम करणारी शेवटची स्त्री म्हणजे लैला! त्यानंतर साऱ्या मुली एकजात हिशोबी दिसतात. तेथे तर date, मुलीला विनंती करून मागावी लागते नाही म्हणण्याचा अधिकार मुलीचा! असं आपल्याकडेही असते तर कोणालाही हुंडा मिळाला नसता व बऱ्याचशा लोकांची लग्ने झाली नसती!

शहराच्या मध्यवस्तीत घेटो (ghetto) मध्ये राहणारी मुलं तर अक्षरशः बडखोर असतात त्यांच्या गँगस असतात व एकमेकांशी ते सतत हाणामारी करत असतात न्यूयॉर्क, शिकागो सारख्या मोठ्या शहरांत तर शंभर दोनशे गँगस् आहेत व त्यांच्या हाणामारीत ते शस्त्र वापरतात व रक्तपात होतो. आपण काहीतरी पुरुषी करत आहोत, शौर्य दाखवीत आहोत असं त्यांना वाटते हे गुन्हेगारीचे प्रमाण अमेरिकेत भरीव आहे मुख्य म्हणजे काहीही कारण नसताना कुठलाही उद्देश नसताना समोरच्या माणसावर जाता जाता गोळी चालवायची हे या बडखोरांच काम अटलांटा हे गाव Conferences साठी प्रसिद्ध आहे डॉक्टरांच्या कॉन्फरन्ससाठी सेंटलुईहून एक अमेरिकन डॉक्टर आले होते. रात्रीचे जेवण आटोपून ते फक्त एक फर्लांग दूर असलेल्या आपल्या होटेल मध्ये जाण्यास निघाले रस्ता निर्मनुष्य होता. ते निघालेत. लोकांनी गोळ्यांचा आवाज ऐकला व नंतर डॉक्टरांचा मृतदेह दिसला डॉक्टर अॅटलांटाला त्या दिवशी सकाळी आलेले होते त्यांचे कोणाशीही भांडण नव्हते तर अटलांटात ते पाहुणे होते आयुष्यात प्रथम आले होते.

अमेरिकेत रात्री पायी फिरणे म्हणूनच भीतीदायक आहे. तुमच्या समोर चटकन कोणी येऊन उभा राहील व पाहता पाहता तुम्हाला एक

दोन डॉलर्स मागेल तुम्ही दिले तर ठीक, नाही तर सरळ बंदूक किंवा पिस्तुल तुमच्या समोर धरील आणि तुम्ही काही बोलायच्या आत बंदुकीच चाप ओढेल आपल्याकडे भीक मागणारे तुमच्या अवतीभवती उभे राहतील, तुमच्या पायाला स्पर्श करतील पण पैसे मागणे आपला अधिकार आहे असा आवेश त्यांच्यामध्ये कधीही नसतो

एक दोन डॉलर्स करता भिक्षादेही करणारी बलदंड शरीराची माणसे आपल्या अर्थाने भुकेली नसतात त्यानी चांगली हॅमबर्गर्स चापली असतात, फ्राइडचिकन सपविलेलं असत बीयरच्या बाटल्या ढोसल्या असतात. पोट पूर्ण भरले असते पण दारूची नशा असते कुठल्यातरी विवचनेत हे असतात आणि मग ते आपल्या भक्ष्याच्या शोधात निघतात. या सर्वांच्या जीवनाचे मग मानसशास्त्रीय विवेचन होते ती माणसे संतापलेली आहेत, रागावलेली आहेत त्याच कारण–सामाजिक व्यवस्थेवर, घटस्फोटाच्या भरीव प्रमाणावर टाकून ही मोकळी होतात पण जगातल्या बहुतांशी लोकांना पोटभर जेवण मिळत नाही ते आपणाला मिळत आहे म्हणून समाधानी राहण्याची त्यांना समज नाही

मला वाटते या सर्व व्यक्तींच्या मनाचे संतुलन ढळत असते. आपण या क्षणी काय करतो आहोत ह्याचे त्यांना भान राहत नसावे आपला क्रोध, संताप, अपमान, क्रौर्य हे मनातल्या मनात जिरवू शकत नसावेत. ' राग आला तर दहा म्हण ' हा साधा उपदेश त्यांच्याकडे कोणी दिलेला नसावा किंबहुना जीवनात आपल्या मनाविरुद्ध खूप गोष्टी घडतात म्हणून प्रत्येक वेळी रागवायच कशाला हेही याना कोणी सांगितले नाही. याला यांची सामाजिक परिस्थिती जबाबदार आहे एका अर्थाने विज्ञानाच्या प्रचंड वेगाच्या झपाट्यात सापडलेली ही माणसे आहेत. त्यांची जुनी नीतिमूल्ये त्यांना दिसत नाहीत किंबहुना अतिशय वेगाने होणारी ही तांत्रिक प्रगती व त्यान्वये होणारे दूरगामी सामाजिक परिणाम त्याना पचविता येत नाहीत. पेलता येत नाही हेच खरे !

पृथ्वीवरील मानवी वस्तीला कमीत कमी पन्नास हजार वर्षे झालीत आणि प्रत्येक व्यक्तीची सर्वसाधारण आयुर्मर्यादा साठ वर्षे धरली तर

मानवाची ८०० वी पिढी सध्या पृथ्वीवर नांदते आहे. पहिल्या ६५० पिढ्यांचे वास्तव्य गुहेत होते छापील अक्षरे फक्त मागील ६ पिढ्यांनी अनुभविली, व मागील फक्त २ पिढ्यांना मोटारकार दिसली त्यानंतरचा Electronics, Space, Communication, संहारक शस्त्रे त्यांची प्रचंड शक्ती पाहत आहे फक्त आपली पिढी हे सर्व शोध व त्यांची मिळणारी फळे युरोप, जपान, अमेरिका या राष्ट्रांत दिसून आली. मागील पंचवीस तीस वर्षांत या राष्ट्रांची इतकी दैदिप्यमान प्रगती झाली त्याचा सहाजिकच परिणाम त्यांच्या सामाजिक जीवनावर होणे अपरिहार्य होता

अगदी या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत अमेरिकेत एकत्र कुटुंबसंस्था होती. आतेभाऊ-चुलतभाऊ-बहिणी यांना घेऊन चालणारे मोठे कुटुंब त्या काळात होते याचे चित्रण Gone with the wind या चित्रपटामध्ये दिसते एलीझबेथीयन काळाप्रमाणे स्त्रिया अगदी अंगभर कपडे घालायच्या जीवन तसं शांत होत. माणसं शेती करायचे, साधीसुधी नोकरी असली तरी ती गावातल्या गावात करावयाचे परक्या गावात गेल्यास आपले कुटुंब कोण पाहणार म्हणून फारसा बदल करावयास नाखूष असायचे याचाच परिणाम असा झाला आजोबा पणजोबापासूनच्या घरात माणसे अभिमानाने राहू लागली आजी आजोबा एका कोपऱ्यात, आईवडील मध्ये व बाजूला एक लहान मुलगी किंवा मुलगा एकत्र दिवाणखान्यात बसून गप्पा मारीत होती. हे सारे चित्रण डिस्नेवर्ल्डला पुतळ्यांच्या सहाय्याने जीवंत केले आहे T. V. नव्हता, झगमगणारे निऑन दिवे नव्हते, रात्रीचे नाईटक्लब्स नव्हते, त्यामुळे माणसे घरी राहत सर्वांचे प्रश्न जवळपास सारखेच असायचे, सर्वांसाठी एकच वर्तमानपत्र असे. आपणास आवडलेले पुस्तक आई-वडिलांना आवर्जून वाचावयास देत मुख्य म्हणजे सगळ्यांचे आचरण सारखे होते. विचार सारखे होते, फरक होता तो फक्त वयात आणि तो अपरिहार्य होता!

आजोबा नातवाशी चांगल्या गप्पा मारीत असत कारण generation गॅपचा प्रकार नव्हता. आजोबांना त्यांच्या वडिलांनी दिलेले सागवानी

कपाट मोठ्या दिमाखाने दिवाणखान्यात असे त्याचे आईवडिलांचे फोटोही दिवाणखान्यात असत प्रत्येक वस्तू जुनी होती तिला इतिहास होता सजीव असो अथवा निर्जीव असो, ती जवळची वाटत होती आजुबाजूला राहणारी माणसे ओळखीची होती पिढीजाद ओळख असायची त्यामुळेच एकमेकाबद्दल आदर होता समाजाने निर्माण केलेल्या नैतिक मूल्यांच्या चौकटीत राहण सारेच पसत करीत, पण हे सारं बदलल प्रथम हळूहळ, मग वेगाने त्यांचे आचार बदलले, विचार बदलले विज्ञानाचा हा परिणाम होता आणि तो अपरिहार्य होता आणि मग पाहता पाहता जीवन बदलले. विज्ञानाची झपाट्याने प्रगती झाली रेडिओ, टेलीफोन, रेफ्रिजरेटर, ओव्हन या गोष्टींचे प्रचड प्रमाणात उत्पादन सुरू झाले बरोबरी या गोष्टी दिसू लागल्या

नुसतेच औद्योगिकरण झाले नाही तर सुपर औद्योगिकरणाची प्रक्रिया सुरू झाली शेतकऱ्याजवळ ट्रॅक्टर्स आले त्यातील आत बसण्याचे केबिन airconditioned झाली अतरिक्ष संशोधनाच्या निमित्ताने खूप वेगाने प्रयोगशाळा निघाल्यात माणसांना, स्त्रियांना नोकरी मिळणे सोपे झाले. किंबहुना दोघांनीही नोकरी करणे ही आवश्यक बाब निघाली. कॅलक्युलेटर्स आलीत, कंप्युटर्स आलेत, अद्ययावत टेलीफोन्स आलेत. टी.व्ही आला आणि थोड्या काळात तोही रंगीत आला जीवनाची विविध दालने उघडी झाल्यासारखी झाली. विजेचा झगमगाट अगदी खेडोपाडी झाला. मोठ्या शहरात मग रात्र दिवस ह्यांत फारसा फरक राहिलाच.नाही आणि यामुळे रात्रीचे अलग जीवन सुरू झाले. याबरोबरच राष्ट्राची सपन्नता वाढत होती. नैसर्गिक साधन सामुग्री अतिशय विपुल होती. डॉलरचा भाव वधारत होता व्हॅक्युमट्यूब्स, ट्रॅनझिस्टर, इंटिग्रेटेड सरकीटपर्यंतच्या प्रवासाला फार कालावधी लागलाच नाही अमाप जागा, अमाप लाकुडफाटा, कमी लोकसख्या यामुळे या शास्त्रीय शोधाच्या काळातदेखील हरघडी लागणाऱ्या वस्तू मुबलक मिळत होत्या. घरबाधणी सोपी होती. अगदी Well furnished घर किंवा apartment उपलब्ध होती प्रत्येकाला कार होती, घर मिळत होते, नोकरी होती. जीवन अगदी सुखाचे

होते उर्जेचा सढळ हाताने वापर करता येत होता कुठल्याही गोष्टीची विवंचना नव्हती. ग्रोसरी स्टोअर, शॉपिंग सेंटर मालाने बदाबद भरलेली होती जगातील कुठलीही गोष्ट तेथे मिळवण सोपे झाले होते त्यामुळेच 'थांबणे' माहीत नव्हते एखाद्या गोष्टीसाठी काही काळ वाट पाहणं' ही कल्पनासुद्धा येणं कठीण होतं. यामुळे एखादी साधी घटना मनाविरुद्ध झाली तर मग राग येणे अगदी सार्थ होते. या मुबलकतेचा परिणाम-सुद्धा कळत न कळत समाजात होऊ लागला आणि पाहता पाहता माणसाच्या जीवनाचे चक्र बदलले. ग्रोसरी स्टोअरमध्ये सॉस, दूध, भाज्या, मीट, पीझा सर्व टिनाच्या डब्यांत मिळू लागले. डब्याचे झाकण उघडायचे व पदार्थ संपला की तो डबा फेकून द्यायचा इतकी सुविधा आली. डब्यासारखेच घराचेही झाले नोकरीनिमित्त घरे वारंवार बदलावी लागत. कारण प्रत्येक वेळेस नवीन गावात नोकरी लागली की फक्त एक सुटकेस घेऊन त्या गावात जाता येऊ लागले. तेथे जाण्यापूर्वीच फोनवरून एखादे मोठे अपार्टमेंट कायम करणे शक्य झाले या apartment मध्ये १-२ आठवडे मुक्काम करून पुन्हा नवीन अगदी Well furnished घर विकत घेणेदेखील सहज सुलभ होते. या घरात सर्व अगदी जमिनीवरील कारपेटदेखील स्वच्छ आणि लखलखीत असत. घरात सर्व काही असत पण त्याच्याशी पुरता संबंध येण्यापूर्वीच पुन्हा नवीन घरात राहावे लागे. अमेरिकन माणसे साधारण दर २-३ वर्षांनी नोकरी बदलतात. आमच्या dept. ची क्लार्क मेरी ही युनिव्हर्सिटीची नोकरी सोडून पोलीस ऑफिसर झाली

अशा या समाजातील मुलामुलींना अगदी लहानपणापासून 'फेकून देण्याची' सवय होते आजुबाजूची कुठलीच वस्तू त्यांच्या दृष्टीने कायम नसते. सर्व तात्पुरत्या असतात कॅलिफोर्नियातील एका विद्यापीठाचं बोध-वाक्य आहे 'Nothing is permenant here except the change' आजुबाजूचे शेजारी सतत बदलत असतात शाळेतील मित्र बदलतात कालपरवा दिमाखात उभी असलेली टोलेजंग इमारत साध्या चोवीस तासात जमिनदोस्त झाले असते. एकूण काय भूतकाळ सतत पुसला

जात असतो ५ वर्षांच्या एका मुलीला वडिलानी पुढच्या चौकावरील मोठ्या शॉपिंग सेंटरवरून काही वस्तू आणायला सांगितल्या 'ती इमारत फुटली व तुटली' असे परत येऊन ती वडिलाना म्हणाली, खरं म्हणजे ही इमारत डाव्या बाजूला होती मुलीने उजव्या बाजूकडे पाहिले पण इमारत तुटून जाते, नाहीशी होते ही कल्पना तिच्या मनात पक्की दडून बसली होती म्हणून तिने वडिलाना तो निरोप दिला तांत्रिक प्रगतीने कुठल्याही मोठ्या गोष्टीची उत्पादनक्षमता वाढू लागली. याउलट नादुरुस्त गोष्ट दुरुस्त करणे महागाचे काम होऊ लागले. त्यामुळे नादुरुस्त रेडिओ, घड्याळ, इतकेच काय थोडा फाटलेला सोफासेट, गालिचे, फ्रिज, उसवलेले शर्ट सरळ फेकणं आवश्यक झाले फाउन्टन पेन्सची जागा बॉलपेन्सनी घेतली तीही वापरावयाची व फेकून द्यायची. यामुळेच 'हा पेन मला मी मॅट्रिकमध्ये पहिला आलो तेव्हा बाबांनी घेऊन दिला' म्हणून वीस पचवीस वर्षे तो पेन जपून ठेवणारी व्यक्तीही राहिली नाही पेन हा जीवनाचा एक अविभाज्य भाग झाला नाही लहान मुलांचे रेडिओ, विद्युत खेळणे इतकी स्वस्त मिळायला लागलीत की एकदा ती तुटलीत की सरळ कचऱ्याच्या पेटीत जाऊ लागलीत. वर्तमानपत्र गलेलठ्ठ झालीत ती वाचून झाल्यावर ते ओझं वागविण्याऐवजी बसमधून उतरल्यावर प्रथम गारबेजमध्ये फेकून देण्यात आलं. पुस्तकांची तीच गत झाली आवडणाऱ्या विषयावरची पुस्तकेदेखील जपून ठेवणे फारसे आवश्यक वाटले नाही एकदा वाचलेली पुस्तके सरळ फेकून देण्यात येऊ लागली एकूण ज्या ज्या गोष्टींशी आपला क्षणकाळ संबंध आला तिची आवश्यकता संपल्याबरोबर तिची स्मृती कायमची पुसली गेली त्यामुळेच भावनेचा ओलावा कायमचा कमी झाला. बोलण्याचालण्यात औपचारिकपणा आला, कोरडेपणा आला.

वस्तू विकत घेण्यापेक्षा भाड्याने घेणे सोपे झाले नवीन पद्धतीवर आधारलेली मोठमोठी भाड्याने देणारी दुकाने प्रचंड प्रमाणात वाढली ह्या दुकानात काहीच विकत मिळत नव्हते पण सर्व काही भाड्याने मिळत होते. अगदी टी. व्ही., दागिने, हिऱ्याच्या अंगठ्या, महागडे नाईट गाउन्स,

शँपेनच्या बाटल्याही भाड्याने मिळू लागल्या. अटलांटाहून वॉशिंग्टनला सकाळी जाण्यास निघाले की आपली कार एअरपोर्टवर पार्क करावयाची, वॉशिंग्टन एअरपोर्टवर मोठमोठ्या कंपनीच्या ऑफीसमधून कार भाड्याने घ्यावयाची, दिवसभर तिने फिरावयाचे व संध्याकाळी वॉशिंग्टनहून निघताना ती परत करायची. या थोड्या वेळात त्या मोटारीबद्दल आपल्या मनात काय आत्मीयता निर्माण होणार ? आपल्या आयुष्यात सर्वसामान्य अमेरिकन मनुष्य साधारणपणे २०० कार भाड्याने घेतो असे आकडेशास्त्रज्ञांचं मत आहे. हे सर्व झाले आहे वस्तूंच्या प्रचंड उत्पादनाने ! कार सारख्या गोष्टीही पुष्कळसे अमेरिकन सरळ फेकून देतात कारण या सर्व गोष्टी अगदी मुबलक आहेत केव्हाही त्या उपलब्ध होऊ शकतात व नवरा बायकोला मिळणाऱ्या पगाराच्या मानाने त्यांची किंमत स्वस्त असते दोघे मिळून महिना दीडहजार मिळवत असले तरी वर्तमानपत्र पंधरा सेंटस्, टाईमसारखे मासिक पन्नास सेंटला, कलर टी. व्ही. पाचशे डॉलर व अगदी चार लिटर दूध एक डॉलर ऐंशी सेंटस् इतकी स्वस्ताई, इतकी मुबलकता तेथे आहे. त्याचाच परिणाम म्हणजे भाड्याने देणारी ही दुकाने व वस्तूंचा उपयोग झाल्याबरोबर फेकणारी व्यक्तीही

बदल हाच जीवनाचा खरा स्थायीभाव झाला त्यामुळे अगदी पंधरा—सोळा वर्षांची मुलं, मुली आपले जीवन स्वतः जगण्याची धडपड करू लागली आमच्या लॅबमध्ये काम करणारा जॅक अंडर ग्रॅज्युएटचा विद्यार्थी, सत्तावीस वर्षांचा होता या आधी त्याने गॅसस्टेशन, ग्रोसरी स्टोअर, इलेक्ट्रिशियन म्हणून कामे केली होती. घराच्या भिंतींना वॉल पेपर लावून देणाऱ्या कंपनीत त्याने काम केले होते. व मागील तीन—चार वर्षे तो खाजगी जहाजांवर खलाशाचे काम करून सारे जग त्याने पालथे घातले होते. तो मुंबई बंदरात आला नव्हता. पण सिलोन, सिंगापूर, टोकियो, हाँगकाँग त्याला सारे माहीत होते आणि आपण औरंगाबाद पुणे रस्त्यावरची वाळूज, नगर, शिरूर, ही गावे जशी भराभर सांगतो तसा तो लंडनपासून सिंगापूरचा मार्ग सांगायचा याच काळात त्याचे माझ्यावर प्रेम झाले. आपले प्रेम 'पोटापुरते' असते, त्याचे 'मनापासून' होते.

उन्हाळयाची सुटी लागली की हा सोनेरी रंगाचे मासे पकडण्यासाठी जॉर्जीया, फ्लोरिडा येथील नद्या पालथ्या घालायचा त्याच्या काठावर तबू ठोकून राहायचा यासाठी आवश्यक असलेली शास्त्रीय पुस्तके घ्यायचा व मला दाखवायचा. फिशरी सायन्समध्ये एम. एस ची डिग्री मिळवून फ्लोरिडात त्याला सशोधन करायचे होते. आमच्या टामफेबरचा धाकटा भाऊ टिम नवव्या वर्गात आहे. त्याला पळण्याचा शौक आहे म्हणून दररोज तो पाच–सहा मैल पळतो. शिवाय त्याला गिर्यारोहणाची आवड आहे एकोणीसशे सत्याहत्तरमध्ये तो जॉर्जिया पर्वतावर गेला होता. १९७९ मध्ये मेक्सिकोला व यावर्षी आल्पस् पर्वताची शिखरे तो चढणार होता अजून ३–४ वर्षात हिमालय चढण्याची त्याच्यात हिंमत आहे कॉम्प्युटर सेंटरचा हॅरी लाझरस हा उन्हाळयाच्या सुटीत पॅराशूट क्लबमध्ये पॅराशूट उडीचे शिक्षण घेत होता, तर मागील नाताळात आमच्या डिपार्टमेंटचे साधे सेक्रेटरी फक्त आठवडयाच्या सुटीत इंग्लंड व फ्रान्सचा दौरा करून आली व या नाताळात ब्राझील पाहाण्याचा तिचा विचार आहे. अगदी लडन एअरपोर्टवर कॅलिफोर्नियाच्या शाळेतील Teenagers भेटलेत. तो व त्याची मैत्रीण अगदी नार्वेपर्यंत जाणार होते तर एअर-इंडियामध्ये भेटलेला प्रवासी मद्रासला कथ्थक शिकायला निघाला होता गमत म्हणजे या सर्व मंडळींचे हे इंटरेस्ट कायम राहातील किंवा काही काळाने ते दुसऱ्या क्षेत्रात जातील टिम कदाचित पेंटींग करेल हॅरि स्कुबा डायव्हिंग शिकेल आणि एअरइंडियात भेटलेला तो सहप्रवासी कथ्थक सोडून न्युक्लियर केमेस्ट्री सशोधन करील. आयुष्याच्या थोडया कालावधीत जीवनाची विविध अगे त्यानी जोपासली असतात. सारे विपुल आहे, उपलब्ध आहे ज्याच्यात मन रमेल ते करावे त्याचा कंटाळा आला तर दुसरे काही शिकावे असे अगदी आयुष्यभर करता येण्यासारखे आहे. यामुळेच या माणसांचा अनुभव दांडगा असतो. निरनिराळया क्षेत्रात संचार केल्यामुळ लहानसहान तांत्रिक उपकरणांची यांना चागली माहिती असते एरवी ही अगदी आपल्यासारखी सामान्य माणसे ! आपल्या-इतकीच विद्वान, उन्हाळयाच्या सुटीत लहानपणी आमचे वडील नगर-

पालिकेच्या लायब्ररीची दोन रुपये महिना वर्गणी देताना विचार करायचे, इतकी ओढग्रस्त परिस्थिती असताना सारा उन्हाळा झोप आणि अगदी जुनी मासिके वाचण्यात जाईल नाहीतर काय ? अमेरिकेतील ही तरुण पिढी भाग्यवान म्हणायला हवी.

जीवनाच्या ह्या वेगाला हातभार लावला आहे मोटार कंपन्यानी. सामान्य व्यक्ती दरवर्षी साधारण दीड हजार मैल चैन म्हणून प्रवास करते व एकूण सर्व प्रवास म्हणजे ऑफिसला जाणे येणे, गावात भटकणे जमेस धरले तर हा आकडा दहा हजार मैल इतका होतो.

मागील वर्षी न्यूयॉर्कला नोकरी करणारा या वर्षी फ्लोरिडाला जातो व पुढल्या वर्षी टेक्सासमध्ये नोकरीच्या शोधात तो असतो तसे नोकरी मिळणे सोपे आहे, आधी फोनवर बोलायच व मग प्रत्यक्ष इंटरव्ह्यू इंटरव्ह्यू म्हणजे अगदी खेळीमेळीच्या गप्पा पानिपतच्या पहिल्या लढाईत बाबर नैऋत्येकडून आला की ईशान्येकडून ? किती सैनिक ठार झाले ? किंवा टांगानिका या देशाचे प्रेसिडेंट कोण ? किंवा बर्लिनमध्ये १९३६ साली झालेल्या ऑलेंपिकमध्ये मॅरथॉन शर्यत कोणी जिंकली ? असे जीवघेणे प्रश्न कोणी विचारणार नसल्यामुळे मनावर ताबा नाहीच, इंटरव्ह्यू घेणारे कंपनीचे डायरेक्टर आणि इंटरव्ह्यूला असणारा आमचा ग्रॅज्यूएट स्टूडंट स्टीव्हवेल दोघेही माणसेच स्टीव्हची योग्यता त्याच्या मार्कस् मेमोहून डायरेक्टरनी ओळखली आहेच आता फक्त त्याचे इतर इंटरेस्ट त्यांना हवे असतात. स्टीव्हचेही नोकरी न मिळाली तर काहीच अडणार नसते त्यामुळे तोही मनमोकळा असतो. डायरेक्टर त्याला लंचला घेऊन जातात. हे शहर त्याला आवडले का, लॅब आवडली का व मुख्य म्हणजे तुझ्या बायकोला येथे राहाणे आवडेल का असे प्रश्न व सरळ दुपारी पगाराची बातचीत स्टीव्हचे Dow Chemicals मध्ये सिलेक्शन होते व त्याचा पगार १७ हजार डॉलर्स ठरतो बायकोला दहा हजार दुसऱ्या नोकरीत. दोघे मिळून वयाच्या २२ व्या वर्षी महिन्याला २७००० डॉलर्स मिळविणार. त्यामुळे जीवनाच्या सर्व सोयी त्यांच्यापुढे उभ्या आहेत मी येथे यण्यापूर्वी स्टीमला भटलो होतो. पुढील वर्षी एल्ड्रीच

कंपनीत २२ हजार डॉलर्सवर डेनव्हर स्टेटमध्ये तो जाणार होता यामुळेच जॉर्जिया, फ्लोरिडा, टेक्सास, आलाबामा या राज्यात स्टीव्ह फिरलेला होता पण तो कुठेच स्थिरावला नव्हता त्यामुळेच त्याला कुठल्याही प्रांताची उगाच अस्मिता नव्हती. तो होता फक्त अमेरिकन नागरिक कुठल्याही प्रांताचा त्याला अभिमान नव्हता. त्यामुळे प्रादेशिकता नव्हती इतकेही असले तरी उत्तरेकडचे लोक दक्षिणभागाकडे जरा तुच्छतेने पाहातात असे कोणीतरी म्हणाले. उत्तर औद्योगिकदृष्ट्या खूपच प्रगत आहे त्यामुळे तिकडे उतू जाणारी श्रीमंती आहे. शेवटी माणसे इथून तिथून सारखीच

वाळवंटी प्रदेशात राहाणारे लोक किंवा एस्किमो लोक भटक्या जमातील मोडतात ही मडळी सतत फिरत असतात पण आपली झोपडी, आतील गाडगे मडके, इडूक मिडूक इतकंच काय आपला कुत्रासुद्धा आपल्याबरोबर नतात वीस वर्षापूर्वी आमच्या काकांची बदली भंडाऱ्याहून नागपूरला झाली तेव्हा काकीने अगदी कुंच्यापासून वस्तू ट्रकमध्ये कोंबल्या ‘ दहा वर्षापासून हा वरवंट्याचा दगड ’ मी वापरते म्हणून तो देखील तिने सोडला नाही भटक्या लोकांना परिस्थितीमुळे सतत प्रवास करणे भाग होते पण ते आपले घर घेऊन हिंडत असत. अमेरिकेतील स्टीव्हसारखी मडळी पण भटकीच पण या तंत्र युगातील भटक्यांना घर सोडताना त्यातील काहीही नको असते घरातील कुठल्याच गोष्टीबद्दल त्यांच्या मनात प्रेम निर्माण झाले नाही लोभ झालेला नाही. हे प्रेम नसल्यामुळे घर सोडण्याचा सोहळा म्हणजे घराचे दार बंद करायचे, नवीन मालकाला किल्ली देऊन आपण आपल्या कारमध्ये जाऊन बसायचे. तिकडे कोणी आजूबाजूची मंडळी त्यापूर्वी एक आठवडा सतत चहा जेवणासाठी बोलावीत नसतील व तुम्ही चालले म्हणून कुठल्याही मित्राच्या डोळ्याच्या कडा ओलावत नसतील अर्थात त्यामुळेच भावनेपासून अलिप्त असता कुठेही जाण्याची धडाडी असते. मागे कुठलाच पाश नसतो जीवन कसे स्वैर असते.

प्रत्येक गोष्ट तात्पुरती असावी. तिचा उपयोग संपला की तिचा

पाश सोडून द्यावा हा अनुभव व जीवनातील प्रत्येक गोष्ट स्वमताने करावयाची आहे ही जिद्द ह्या दोहोंची सांगड ज्या समाजात झाली आहे तेथे घटस्फोटाचे प्रमाण भरीव असेल तर नवल काय ? बरे, वस्तू जशा मुबलक तसे स्त्रीला पुरुष मिळणे अथवा पुरुषाने स्त्रीची पारख करणे सोपे एकत्र राहायचे तेही कायमच असा निर्बंध नाही त्यामुळे शिकणारी सर्व तरुण मुले आपल्या मैत्रीणींबरोबर अपार्टमेंट घेऊन राहतात. किंबहुना रुममेट ही व्यक्ती विषम लिंगी असावीच हा जवळपास तेथे नियमच आहे म्हणाना ! अर्थात ही मंडळी राजरोसपणे राहातात. त्यांचे तसे राहाणे समाजाने मान्य केले आहे. आईवडिलांची त्याला संमती आहे टॉम व प्रिसिल्ला एकत्र राहू लागले तेव्हा त्यांचे [illegible]साठी माझ्या सर्व कुटुंबाला टॉमने पार्टीला बोलावले होते. गायमॅक मास्टरची मैत्रीण त्याच्याबरोबर दीड वर्ष राहत होती. शेवटी त्याने लग्न करायचेच ठरविले. आम्हाला निमंत्रण द्यायला गाय आला तेव्हा अगदी सज्जन, सद्वर्तनी माणसासारखे त्याने आम्हाला हे सारे सांगितले. कुठेही लपवाछपवीचा प्रकार नाही. याला कारण समाजाच्या संमतीपेक्षाही स्त्रीची याला संमती असते. ती आनंदाने तिला आवडत असलेल्या माणसाबरोबर राहात असत स्वतःचे बरे वाईट पाहाण्याइतपत, कळण्याइतपत ती सुज्ञ असते यामुळे तिच्यात आणि पुरुषात त्यांच्या कर्तृत्वात फारसा फरक नाहीच. सॅंडी आपला नवरा जॉनला घेऊन आली तेव्हा अगदी त्याच्यासमोर म्हणाली, "जॉन माझा दहावा date" सुहासिनीला थोडे जास्तच कुतुहल. तिने विचारले की, "डेटींगमधे तुम्ही काय करता" तिने लाजत विचारले. सॅंडीने मोकळपणाने सांगितले. "सर्वकाही अर्थात दोघांच्या संमतीने."

स्त्रियांच्या या हिंमतीमुळे सामाजिक जीवनात त्यांचा विलक्षण प्रभाव पडतो. बॅंकेत कॉम्प्यूटर सेंटरला किंवा विद्यापीठात स्त्रीने नोकरी करणे यात फारसे धाडस नाही पण अगदी आड बाजूला एकट्या असलेल्या रेस्टॉरंटमध्येही रात्रपाळी तिने करणे, बस चालविणे, किंवा अगदी १८ टन वजनाचे ट्रक्स् चालविणे, इलेक्ट्रीशियन म्हणून उंच खांबावर चढून

काम करणे किंवा माणसाबरोबर वॉटर सर्फ करणे, शार्क माशाची सर्कस दाखविणे इतकेच काय आता तिची धडपड आहे अंतराळात जाण्याची. ही सारी धडाडीची कामे ती करू शकते, करत असते, कारण स्त्रीत्वाच्या आपल्या लज्जा, संकोच यापासून ती अलिप्त असते

स्वतःचे व्यक्तिमत्व जागृत असल्यामुळे आपल्या मनाविरुद्ध झाले ते बिलकुल चालत नसावे. तिकडील लहान मुले, मोठी माणसे किंचाळताना दिसतात आदळआपट करणे, राग आल्यावर घरातल्या वस्तू एकमेकावर फेकून मारणे हे टी व्ही वर सतत दिसत असते. ट्रॅफिक सिग्नलचा हिरवा लाईट, म्हणून वेग वाढवावा, आणि लाईटच्या अगदी जवळ आल्यावर लाल झाला की एकदम कारला ब्रेक लावून आमचे प्रो विल्सन डॅमइट, ' डॅमइट ss ' असं भसाडया आवाजात, वेगाने निदान दहा बारा वेळा त्या दहाबारा सेकंदात म्हणायचे. लाल दिवा लागल्यावर थांबण्याइतके ते सुसंस्कृत होते. पण आपण ' थांबलो ' हे जणू काय त्यांना सहन होत नसावे. हे सहन होत नसल्यामुळेच घटस्फोट अगदी मुबलक ! विवाहोत्तर प्रेम हे खर त्यागातूनच फुलायला हवे शिवाय ते सहवासोत्तरही असत ! पण काही आक्रस्ताळी स्त्री-पुरुषाना दुसऱ्याचे व्यक्तिमत्व फार काळ सहन होणारे नसते आपल्या स्वतःच्या पैशाने विकत घेतलेल्या वस्तूला परवानगी न घेता नवऱ्याने हात लावला तर स्त्रीला चालण्यासारखे नसते बरं लग्ना-नतर सबंध जास्त प्रेमाचे म्हणून सदोदित पुरुषाने ' हाय हनी. . ' चा जप करायला हवा ही प्रत्यक पत्नीची सुप्त इच्छा असते. तसे नवरा म्हणून जीवन जगणे म्हणजे आपल्याकडे सों आहे नुसता म धून मधून फक्त " माझे पुस्तक पाहिलेस का ग ?" ान माडलेस का ? इतका उशीर का ? एवढच बोलण्याचा तोंडाला त्रास. तिकडे डिरोश टेबलावरून उचलणे त्या धुवून डिशवॉशरमध्ये टाकून कोरडया करण्याचे काम नवऱ्याचे ! आपण कधी इकडे चहाही करत नाही. आणि तिकडे स्वतः वाइन घेण्यापूर्वी ' Honey what shall fix for you ? ' अस विचारल्याशिवाय ग्लास तोंडाला लावता येत नाही Lift मधून बाहेर

पडताना स्त्रियांना आधी बाहेर जाऊ द्यायला हवे, बसमध्येही तेच. हे सारे सव्यापसव्य पाळायचे म्हणजे खरे तर तारेवरची कसरतच !

घटस्फोटाचे प्रमाण साधारणपणे जीवनात थोड्या फार प्रमाणात अयशस्वी झालेल्या लोकामध्ये आहेत. आमच्या Chemistry Dept च्या दहाबारा प्रोफेसरांच्या खासगी जीवनाची फारशी चौकशी न करताही ते अगदी सुखाने कौटुंबिक जीवन जगताना दिसत होते ह्यातील कोणीही घटस्फोटित नव्हते. एवढे मात्र खरे की या घटस्फोटांचा कुणालाही अभिमान नव्हता, किंवा मी पाच वेळा घटस्फोट घेतल्याचा डिंडीम् पिटता-नाही कोणी दिसत नव्हता.

काही माणसे आयुष्यभर लग्न न करणारी होती कुठल्याही बंधनात स्वतःला अडकून घेण्याची त्यांना इच्छा नसावी बसमध्ये माझ्या बाजूला बसून कधी कधी गप्पा मारणाऱ्या एका साधारण पन्नाशी ओलांडलेल्या माणसाशी बरीच घसीट झाली 'तुला मुलबाळ किती ?' त्याने एकदा विचारले मी उत्तर दिल्यावर तो म्हणाला, 'मला तुझ्या घरी येण आवडेल' मी म्हणालो, 'तुम्हाला किती ? ' तो एकदम उत्तरला, 'माझे लग्नच झाले नाही' तेव्हा मी म्हणालो, 'एकटे रहाणे तसे बोअरींग असेल, कंटाळवाणे असेल.' तेव्हा तितक्याच शांतपणे तो म्हणाला, 'No, one sh'ld be one's company' मला वाटते जीवनाचे काही गमतशीर पण बोधप्रद सत्य त्याच्या तोंडून अजाणता बाहेर पडले होते. आपण आपल्यात सुखी असलो, आपली करमणूक स्वतःच करून घेऊ शकत असलो, तर खऱ्या अर्थाने, वृत्तीने आपण वानप्रस्थी झालो. जीवनाच्या संध्याकाळी खरे म्हणजे स्वतःच स्वतःची करमणूक करायला हवी ती जमली तर जगण्यात मजा, एरवी सतत काळजी, चिंता आणि त्या योगे निर्माण होणारी चिडचिड.

पण अशाप्रकारचे वानप्रस्थी विचार अमलात आणणे किती अमेरिकन म्हाताऱ्यांना जमत असेल तेथे आयुष्यही पुष्कळ ! माणसाचे वय साधारण ६९ तर स्त्रीचे ७६. म्हणजे अगदी ८०–८५ चे खूप लोक मुले विचारीत नाहीत, मुख्यतः भेटत नाहीत ही खंत ह्या म्हाताऱ्यांना सतत टोचत असते

पण या म्हाताऱ्यानी आपल्या तरुणपणी मुलाना काय प्रेम दिले असते ? घर मोठे असते आणि आत दिवाणखान्यात Rocking chair वर म्हातारा –म्हातारी दिवसभर पडलेली असतात खर म्हणजे म्हातारपण हाच शाप आहे, इकडे किंवा तिकडे ! म्हाताऱ्यांचे वृद्धाश्रम आहेत Social security तून ह्याना पैसे मिळतात म्हणून आपल्यासारखी आर्थिक विवंचना नसते. खरं म्हणजे ह्याची घर एवढी मोठी असतात व आर्थिक परिस्थिती इतकी भक्कम असते की सारी मंडळी एका घरात राहिले तर सारे सुखात राहतील पण मानसशास्त्राचे एवढे विचारवंतदेखील असा तोडगा सुचवत नाही यावरून तो रदबादल असावा. अमेरिकन जीवनाची एक मजेशीर विसगती मला आठवली एखाद्या आजीबाईचे सामान उतरविण्यासाठी बस ड्रायव्हर जागा सोडून खाली उतरेल, तिचा हात धरून हळूच तिला खाली उतरवून देईल व have a nice day असे तिला अगदी सस्मित म्हणेल हाच बस ड्रायव्हर आपल्या आईवडिलाना मागील दोन वर्षांत भेटलेला नसेल. म्हणजेच वृद्ध व्यक्तीबद्दल ह्या लोकांच्यामध्ये आकस आहे, अशातलाही प्रकार नाही वृद्ध आईवडिलांनी वेगळे रहाणे हे त्या समाजाने मान्य केल्यासारखे आहे तिकडे घर मोठे झाले पण कुटुब लहान झाले म्हणून जीवनाच्या आपल्या मोजपट्टीने त्यांची समाजमूल्ये तपासून पहाणे त्यांच्यावर अन्यायकारक होणारे आहे त्यांचे मार्ग वेगळे आपले मार्ग वेगळे उगाच तुलना कशाला ?

एकूण हा समाजच औपचारिक सबधावर विश्वास ठेवणारा आहे. आपल्यासारखी जीवश्चकंठश्च मैत्री तेथे नसावी. आपण विशाल कुटुंबात वाढलेले असतो. हे छत्र विशाल वृक्षासारखे असले की लहान मोठी झाडे त्याच्या सावलीत वाढत नाही. खुटलेली ही झाडे मात्र आपण त्या विशाल वृक्षाचे वशज म्हणून भाव खाऊन जातात. एकदा कुणाच्याच सावलीत वावरायच नाही, असे ठरविले की मुक्तपणे सूर्याची किरणे अगावर घ्यावी जलधारानी वाटेल तितके नहावे आणि स्वतःची वाट स्वतः आखावी. तिकडे कोणालाही विचारावे तुझे नाव काय ? तो सांगणार I am Tom. ती सागणार I am Diana. वडिलाचे नाव नाही. घराण्याचे नाही.

त्यामुळे जन्मजात चिकटलेला मोठेपणा खुलवून सांगण्याचा हव्यासही नाही. आपले जीवन हे आपले एकट्याचे आहे, त्याला कसे वळवायचे, त्याची वाढ कोणत्या दिशेने करायची, आपण जायचे कुठे हे सर्व ठरविण्याची मुखत्यारी स्वत.च्या खांद्यावर घेतली की हे खांदे आपोआपच बलदंड होऊ लागतात

तेथे आईवडील मुलाच्या परीक्षाची काळजी करीत नसावेत. त्याने कुठला कोर्स घ्यावा हे ठरवीत नसावेत आणि अर्थात त्याने कुठल्या मुलीशी लग्न करावे हेही सागत नसावेत इतकेच काय मुलाच्या लग्नात ते पाहुण्यासारखे येतात व पाहुण्यासारखाच लहानसा अहेर देतात असे काही पाहिले की ही माणसे फारच आत्मकेंद्री आहेत असे आपल्याला वाटते.

या समाजाची आणखी एक गमत माझ्या लक्षात आली आपल्याकडे श्रीमत किंवा अधिकाराने मोठा असलेला माणूस हा एकदम ओळखू येतो कारण साधारणपणे तो ‘ एकटा ’ असा कधी नसतोच साधा बसचा प्रवास असला तरी त्याचे हाताखालील दोनतीन जण त्याला पोहचवायला व त्याची एकूण व्यवस्था पाहायला जातीने हजर असतात साऱ्या प्रवाशांना ‘ साहेब चालले ’ म्हणून ते सांगतात लहानपणी शेगावच्या बसस्टँडवर एका ‘ साहेबा ’चा असा रुबाब पाहून मलाही आपण साहेब व्हावे असे वाटले साहेबासाठी खाजगी कपनीची मोटार मे महिन्याच्या भरदुपारी अर्धातास तिष्ठत उभी होती आणि आमच्या अगावर होत्या घामाच्या धारा. साहेब आलेत आणि ड्रायव्हरच्या शेजारी बसलेत त्याचा पट्टेवाला आमच्या बाजूला त्याला कुतुहलाने विचारले, ‘ कोण आहेत ?’ तेव्हा तो म्हणाला, ‘ मुन्सफ साहेब आहेत ’ वयाच्या दहाव्या वर्षी त्या घटनेचा इतका ठसा उमटला की पुढे शाळेत ‘ मोठेपणी कोण होणार ’ या निबधात ‘ मुन्सफ ’ म्हणून मी खूपसे काही लिहिले

अमेरिकेत आमच्या विद्यापीठाचे चॅन्सेलर श्री लँगडेल हे दुपारच्या जवणास कॅफेटेरियामध्ये यायच, ते ओळखू यायचेत ते त्यांच्या बलदड शरीरयष्टीने चर्चिलसारखे यांचे व्यक्तिमत्व होते. सरळ ते क्यूमध्ये उभे रहावयाचे. घेतलेल्या पदार्थांचे पैसे द्यायचे व मग एखाद्या कोपऱ्यावरील

टेबलावर आपली प्लेट ठेवून जेवायचे कोणीही त्यांच्याजवळ जायचा नाही तेही कोणाला बोलावीत नसावेत

रॉकफेलरसारखी धनाढ्य व्यक्ती गमत म्हणून बसने प्रवास करते व बसमध्ये बसल्यावर आपले नाव इतराना समजावे म्हणून प्रयत्नही करीत नाही साधे जीन आणि टीशर्ट घालून हे महाशय एकदा आपल्या भावाला भेटायला गेलेत भाऊ त्यावेळेस उपराष्ट्राध्यक्ष होता दरवानाने त्याना ओळखले नाही. त्याचे काहीही दुःख न वाटता हे आपल्या घरी परत आले अशाच प्रकारचा एक प्रसग टी व्ही वर पाहण्यात आला एक मल्टीमिलोनियर माणसाला कोणीतरी पळवितात सारे पैसे काढून घेण्यात येतात, त्याची सर्व Identification कार्डस् पळवतात व एका लहानशा गावात आणून सोडतात त्याच्या कपनीची त्या गावात एक ब्रँच असते तेथे हे गृहस्थ जातात. त्यांना कोणीही ओळखत नाही कारण या गावातील त्या ब्रँचमधील कुठल्याच माणसाने आपल्या मॅनेजिग डायरेक्टरला पाहिलेले नसते इतकेच काय त्याचा फोटोही कुठे लावलेला नसतो

या साऱ्या वागणुकींचे रहस्य एकच आहे – सारी माणसे एकाच मापाने मोजली जातात म्हणूनच की काय चॅन्सलेर लॅंगडेल कार पार्किंग लॉटमधून बाहेर आल्यावर समोर भेटलेल्या एखाद्या जॅनिटरला (स्वीपर) म्हणतात, Hey William आणि तो जॅनिटरही म्हणतो, Hey David आणि प्रेसिडेंट कार्टर विद्यापीठात व्याख्यान देतात त्यावेळेस, टाइमटेबलमध्ये असलेले सर्व पिरीयडस् व्यवस्थित चालू असतात कोणीही पिरीयड सोडला नसतो हे सारे आहे निराळे आणि म्हणूनच आगळे! अधिकाराचे महत्त्व ब्रिटिशांनी आम्हाला शिकविले व आम्ही त्याचा अंगिकार केला. साहेबाचा प्रश्न समजला नाही–समजणे कठीणच होते कारण त्यांचे उच्चार! तरी आपण वाकून म्हणायचे Beg your pardon Sir ' या चारही शब्दातील प्रत्येक शब्द आपल्याकडे कमीपणा आणणारा आहे आपली लाचारी दाखविणारा आहे तिकडे प्रोफेसरचा प्रश्न समजत नाही तर स्टीव्हड म्हणणार, ' Please say again यात बरोबरी आहे, कोणाकडेही कमीपणा नाही.

हे सारं असूनही या समाजाने ' काळ्या ' लोकांना दिलेली वागणूक विसरता येणार नाही

डाऊनटाऊनच्या फाइव्ह पाइंटस 'च्या मध्यवर्ती बगिच्यात खूप निग्रो दिसायचे त्यांना तिकडे ' काळे म्हणतात आफ्रिकेतून गुलाम म्हणून आणलेले हे सर्व लोक अगापिंडाने खूपच दणकट, उंचपुरे आणि काटक वाटतात याच्या या सर्व गुणांचा त्यांना पुरेपूर फायदाही होतो. सध्या अमेरिकेतील सर्वश्रेष्ठ फुटबॉल किंवा व्हॉलीबॉल खेळाडू काळे आहेत. स्पोर्टस्‌मध्ये तसेच संगीतातही ते पुढे दिसतात त्यांच्या आवाजाची झेप, उंच ताना सहजतेने घेण्याची पद्धत व अगदी न थकता तासन्‌तास गाणं म्हणण्याचा त्यांचा उत्साह या सर्व जमेच्या बाजू डिस्कोम्युझिक गाताना व तासन्‌तास डिस्को नाचाचे ते सतत शरीराला वाकविण्याचे व सोबतीला असलेल्या मैत्रिणीला निरनिराळ्या अंगाने लीलया उचलण्याचे कसब ते करू शकतात हे सर्व ते करू शकतात, कारण त्यांचा स्टॅमिना फार चांगला आहे.

---

जॉन स्टाइनबॅक नावाच्या लेखकाने America and American People " या पुस्तकात एक मजेशीर विधान केले आहे त्याच्या मते It is the irony of slavery that it makes a slave stronger than a master मूलत: यांच्या पिढीतल्या आद्यपुरुषांना क्रूरपणे आफ्रिकेतून पकडून आणताना साखळदंडाने बांधून आणीत त्यांचा लिलाव झाल्यावर प्रत्येक गुलामाची ओळख म्हणून त्याच्या पाठीवर तप्त लाल लोखंडाचा एक ब्लॉक, ठप्पा मारल्यासारखा मारीत त्याचे तितके मांस जळून जाई यानंतर अमेरिकेत आल्यावर त्याला नवीन नाव देत त्याची भाषा विसरण्याचा जाणूनबुजून प्रयत्न केला जाई. त्यांनी नवीन नाव सांगपर्यंत मालक चामडी फटके त्याला मारीत त्याची जन्मभूमीची खूण पुसली जाई तो फक्त एक असे पशुतुल्य कामासाठी मालकाने क्षुल्लक किंमतीला विकत घेतलेला एक क:पदार्थ मानव ! त्याच्याकडून वाटेल ते काम करवून घेण्यात येई त्याची राहण्याची जागा अत्यंत निकृष्ट असे गुलामांना हे गोरेमालक सतत ओरडून सांगत असत, तुला मी भीत नाही

कारण तू माझ्यापेक्षा सर्व दृष्टीने नीच आहे. बुद्धीने कमी आहेस. संस्कृतीने क्षीण आहेस स्टाइनबॅकच्या मते असे म्हणणे म्हणजे मी अधाराला भीत नाही असे सांगण्यासारखे होते त्यांना दिवसाच्या दहा–बारा तास कष्ट उपसावे लागत, जंगलात रहावे लागे यामुळेच ह्या माणसांनी खडतर जीवन अनुभविले आहे ते काटक आहेत. मालक जे काम करू शकत नाही ते यांनी केल्यामुळे मालकापेक्षा ताकदवान झाले आहेत.

आफ्रिकेतून पकडून आणलेल्या गुलामांपैकी जे अशक्त असत आणि जे मनाने कमजोर असत ते नुसत्या नैराश्याने मृत्यूमुखी पडत या सर्व संकटातून उरलेसुरलेले जीवत रहाणारे निग्रो बलदड असतात शिवाय संपूर्ण गोऱ्या समाजाच्या सैन्यापुढे आपला टिकाव लागणार नाही ही कल्पना त्याना होती पण या भीतीपोटी, या सामाजिक संकटामुळे हा सारा समाज, ह्या साऱ्या व्यक्ती एकसंघ झाल्यात. काळ्या लोकांचे जीवन म्हणूनच गोऱ्यापेक्षा निराळे वाटते

गोऱ्यासारखे ते हळू आवाजात बोलत नाहीत. बसमध्ये चढले की सतत हसत असतात मोठ्याने बोलत असतात. आपल्याच कादंबरी वाचनात गोरा त्याकाळात मग्न असतो. यांच्या घरात आईवडील, सून, मुलगा सर्व एकत्र राहातात साधारण घरे डाऊनटाऊनच्या जवळ असतात.

घरे एकमेकांना लागून असतात. त्यांच्या वस्तीतून बस जाताना एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात यायची घराच्या बाहेरील व्हराड्यात वयस्कर मंडळी एकत्र येऊन गप्पा मारीत असत चौकात मुलं मुली एकत्र येऊन आवाज करताना आढळतात गोरे मंडळी या वस्तीपासून दूर राहताना आढळतात किंबहुना मनुष्य जितका श्रीमंत तितका त्याचं घर डाऊनटाऊनपासून दूर हा तेथील अलिखित नियम ! खरे म्हणजे आधीच सर्व दूर शांतता तरी आमचा मित्र टॉम डाऊनटाऊनपासून चाळीस मैल दूर राहतो त्याला मी याचे कारण विचारले तेव्हा तो म्हणतो, ' It is quiet these ' त्याच्या घरी एवढी शांतता की समोरच्या रस्त्यावरून ५–१० मिनिटांना एखादी कार जायची.

या काळ्यांना जो जीव घेणारा त्रास या गोऱ्या लोकांनी दिला तेही काळी मंडळी एकाएकी कसा विसरतील ? पदोपदी त्यांचा अपमान झाला रस्त्यावरून संध्याकाळी काळा दिसला की गोरे पोलीस त्याची चौकशी करीत त्यामुळे स्वतंत्रपणे हिंडणे कठीण ग्रोसरी स्टोअरमधून सामान घेता येत होते पण तिथले पिण्याचे पाणी घेण्याची मनाई होती. बस स्टँडवर रेस्टरूमसुद्धा नव्हती. तेव्हा एखाद्या वेळेस घाईची लघवी लागली तरी पाचसहा फर्लांग रेस्टरूमसच्या शोधात जावे लागे बसेसमध्ये नेहमी मागे बसायचे. कमाल म्हणजे समोरून एखादी गोरी स्त्री येत असेल तर निग्रोने आपला चेहरा खाली केला पाहिजे असा नियम होता याचं परा-कोटीच टोक म्हणजे सिनेमाच्या जाहिरातीत एलिझाबेथ टेलर, मर्लीन मन्रो किंवा एखाद्या गोऱ्या नटीच्या चित्राकडेसुद्धा त्यांना पाहणे मना होते. समृद्ध देशात ते रहात पण त्यांच्या समृद्धीला ते वंचित होते. पदोपदी अपमान होता. अतिशय अस्वस्छ, घाण वस्तीत रहावे लागत होते शिक्षणाचा गंध नव्हता तेव्हा पिढ्यान् पिढ्या दारिद्र्य सुटण्याची शक्यता नव्हती हे सर्व मागील २५-३० वर्षांपूर्वी होते

जॉन हावर्ड ग्रीन या लेखकाचा 'Black like me' 'ब्लॅक लाईक-मी' ही एक नितांत रमणीय कादंबरी आहे निग्रोंचे जीवन जवळून पाहण्यासाठी औषधे वापरून जॉन हा गोरा मनुष्य आपले संपूर्ण शरीर काळे करून घेतो. डोक्यावरचे केस काढून टक्कल करतो व अलाबामा जॉर्जिया या राज्यात हिंडतो त्याचे या जीवनाचे विश्लेषण अतिशय बोलके आहे. निग्रोंना मुले फार असतात असे म्हणतात. त्यावर जॉन म्हणतो अतिशय दमट अस्वच्छ घरात ते राहतात. मनाने, वृत्तीने जीवघेणा एकटे-पणा यांना सतत भेडसावीत असतो त्यामुळे आपण साऱ्या मानवी समाजा-पासून अलग आहोत ही जाणीव त्यांना सतत ग्रासत राहते. या जाणीवेची तीव्रता वाढते. त्यामुळे एकतर त्याचा नैराश्याने जीव गुदमरून जातो, किंवा यातून क्षणकाळ सुटका वाटावी म्हणून आपल्या स्त्रीला तो जवळ करतो निराशातून आशा निर्माण करण्याचा तो अगदी शेवटचा प्रयत्न करतो. बुद्धीने निग्रो आमच्यापैकी कमी आहेत हा या गोऱ्या लोकांचा एक

आवडता युक्तिवाद, पिढ्यान्‌पिढ्या ज्याचा पुस्तकाशी संबंध आला नाही भविष्य नैराश्येने सतत ग्रासले आहे आपण अगदी कर्मदरिद्री आहोत म्हणून या देशात रहायचं असे ज्या माणसाच्या मनावर आहे त्याला खरं शिक्षण कळणार तरी काय आणि त्यासाठी तो धडपडणार तरी कशाला ? कोणीतरी मोठे होण्यासाठी शिकणे आवश्यक आहे ही महत्त्वाकांक्षा गोऱ्या मुलाला असणार ती काळ्यात कशी असणार ?

दारिद्र्य हाच खरा शाप आहे खेड्यात राहणारा काळा मनुष्य निदान निसर्गरम्य प्रदेशात तरी असतो तो अज्ञानी असतो, शिक्षणापासून वंचित असतो आणि आर्थिक परिस्थितीने ग्रासला जातो तो शहरात राहण्यास जातो आणि ‘घेट्टो’ (Ghetto)मध्ये राहून आपल्याच पायावर धोंडा पाडून घेतो मोठ्या शहरात त्याचे कुणीच नसते बायकोही नोकरी करत असते. मुलाकडे कुणाचेच लक्ष नसते. ती सतत ‘दादा’ लोकांच्या नजरेखाली जीव घाबरून राहत असतात आपण मुलांना काहीच सुख देऊ शकत नाही याची सतत खंत त्याला लागून असते नैराश्याने कुठलीही व्यक्ती ग्रासली की सद्‌गुणाचा जोर कमी होतो तो मग कशाचीही काळजी करत नाही, करू इच्छित नसतो या नैराश्येतून क्षणकाल स्वतःची सुटका व्हावी म्हणून तो वाटेल ते कुमार्ग पत्करायला तयार होतो. तो चोरी करू शकतो हाणामारी करू शकतो गुन्हा करू शकतो बलात्कार करू शकतो, सर्वांनी वंचित केलेला हा पुरुष स्वतःचा पुरुषीपणा दाखवितो तो अशाप्रकारे ! थोड्याच कालावधीत मग तो इतका लहरी होतो, विचित्र वागतो की त्याला घर सोडावे लागते किंवा त्याला घरातून हाकलून देतात.

जॉन ग्रीफनचे भाष्य जीवघेणे वाटते. त्याच्या मते निग्रोच्या आततायी स्वभावाचे रहस्य आहे त्यांच्या नैराश्यात, एकाकीपणात आणि त्यांच्या दारिद्र्यात !

यातून चुकला माकलेला शिक्षणाची कास धरतो शिकतो मोठा होण्यासाठी पण त्याला त्याच्या काळ्या रंगामुळे नोकरी मिळत नाही गमत म्हणजे अशा प्रकारच्या शिक्षित माणसाचे कर्तृत्व चांगली वर्तमान

पत्रेसुद्धा जनतेसमोर आणीत नाहीत ती आणतात तेच त्यांचे नेहमीचे चरित्र व तेच त्यांच्या जीवनावरील मसालेदार हकीकती

पन्नाशीला आलेली कैक काळी मंडळी डाऊनटाऊनला संध्याकाळच्या वेळेस बीअरच्या बाटल्या तोंडाला लावताना दिसतात. आणखी दारूच्या बाटल्या त्यांच्या आजुबाजूला पडलेल्या असतात. पाहतापाहता कोणी तुमच्यासमोर येऊन २५ सेंटची मागणी करतो पोशाखाच्या बाबतीतही यांचे राहणे निराळे वाटते मागील दहा पधरा वर्षांत मात्र 'काळ्यां'ना खूपच अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यांचे गमावलेले स्वत्व त्यांनी बऱ्याच अंशानी मिळविलेले आहे म्हणूनच विद्यापीठात शिक्षण घेणारे किनन, मायकेल, Williamson ही मुले अगदी गोऱ्या मुलाइतकीच अदबशीर, नम्र होती किनन तर इंग्रजी कथाही लिहीत होता आता त्यांच्या तोंडावर कोणी गोरा त्याना Nigger म्हणत नाहीत पण त्यांच्यातला कडवटपणा असा एकाएकी जाणार नाही हेही खरे!

मी एकदा किननला विचारलं, तुझे विषय कोणते ?'

'इंग्रजी, फिजिक्स वगैरे '

'इंग्रजी ? तुला इंग्रजी भाषा कशाला शिकायची !'

'वा का नाही ? इंग्रजी भाषा मला परकी नाही का ? म्हणून ती माझी दुसरी भाषा.' आजुबाजूच्या गोऱ्या मुलाचा चेहरा एकदम बदलल्याची जाणीव मला झाली पण त्याच्या मनावर काही परिणाम न होऊदेता किनन म्हणाला, 'जॅग आम्ही मूळ रहाणारे आफ्रिकेचे. यामुळे इंग्रजी माझी मातृभाषा नाहीच खरे नाही का ?

मोठ्या भावाने इस्टेटीची वाटणी करून द्यावी पण दोघांच्या घरात भिंत घालावी आणि बोलणे बंद व्हावे. तसलासा कहीतरी प्रकार झाल्या-सारखा दिसतो. दोन्ही प्रकारची माणसे एकमेकाशी प्रेमाने बोलताना दिसत नाहीत. किंबहुना बोलण्याचेच टाळतात. गोऱ्या मुलांचे दोस्त म्हणून काळे मुले नसावीत आणि काळ्या मुलीची date कोणीही गोरा मुलगा मागताना आढळत नाही. वस्तीचे विभाजन झाल्यासारखं आहे काळ्या वस्तीत एकही गोरा राहत नाही. तर गोऱ्या वस्तीत काळा ! आणि डाऊन-

टाऊनपासून दूर असलेल्या शॉपिंग सेंटरमध्येदेखील एकही काळा सापडत नाही. शिक्षण माणसाला नम्र करते. माझ्या मुलाची शिक्षिका मिसेस जेन किन्स ही याचा आदर्श. बाई बोलण्यात अगदी गोड आणि चेहरा सतत हसरा. आम्ही परत चाललो असं त्यांना सांगायला गेलो तेव्हा पन्नाशीला आलेल्या त्या उंचथिप्पाड काळया बाईने आपण आपल्या मुलाला अगदी जवळ घेतो, तसे माझ्या मुलाला घेतले, गोंजारले, पापे घेतलेत. तू मला पत्र पाठव. असं पुनःपुनः सांगत बाई दरवाज्यापर्यंत आम्हाला पोहचविण्यास आल्या. शेवटी माणसे काय इथून तिथून सारखीच जाती, शरीराचे रंग याच्या कृत्रिम भिन्नतेमळेच खरं माणसे माणसांना वेगळे करतात.

# ८. अमेरिकेतील भारतीय

या शतकाच्या पहिल्या दशकात स्वामी विवेकानंद व त्याच सुमारास आनंदीबाई जोशी यासारखे श्रेष्ठतम भारतीय अमेरिकेत गेले होते व त्यांनी आपल्या आगळेपणाची साक्ष तेथील जनमानसावर उमटविली होती. साधारण १९५० च्या आधी अमेरिकेत गेलेले भारतीय प्रवासी म्हणूनच तेथे गेलेत, त्यानंतर मात्र बरेचसे भारतीय तेथे कायम राहण्याच्या इच्छेने गेलेत त्यांनी तेथे नोकऱ्या केल्यात व ते आता तेथे स्थायिक झाले आहेत. यातील बरीचशी मंडळी इंजिनियर्स, डॉक्टर्स, विद्यापीठातील प्राध्यापक, मान्यवर प्रयोगशाळेतील संशोधक आहेत. शिकागोला तीस ते चाळीस हजार, न्यूयॉर्कला त्यापेक्षा थोडे जास्त ह्युस्टनला पाचसात हजार तर आमच्या अटलांटासारख्या अठरा लाख वस्तीत दोन ते तीन हजार भारतीय लोक आहेत

खऱ्या अर्थाने भारतीयांची ही पहिली पिढी आहे यापैकी काही मंडळी पुढील पाच दहा वर्षांत नोकरीतून सेवानिवृत्त होतील (तिकडे निवृत्तीचे वय ६५ आहे) त्यांची मुलेबाळे अमेरिकन समाजात मोठी होतील, तेथेच नोकरी करतील व सामाजिक जीवनाचे चक्र तेथेही सुरू होईल. या भारतीय मंडळींवर सर्व जुने संस्कार झालेले आहेत. तेथील सणावाराची यादी त्यांना माहीत आहे. मुंबईच्या देशपांड्यांना आपल्या घरी दहा दिवस चालणारा गणपतीउत्सव सतत आठवत असतो, तर नागपूरच्या दुसऱ्या देशपांड्यांचे होळी आणि शिमगा आला की हात शिवशिवायला लागतात. शोभाताई गाडगिळांना भोंडल्याची गाणी पाठ असतात व अमेरिकेत २२ वर्षे राहूनदेखील नवरात्राच्या त्या काळात जुन्या आठवणींना त्या उजाळा देतात. चित्राताई विनोदांचे आजोबा प्रकांडपंडित, संस्कृतचे गाढे अभ्यासक होते त्यामुळे त्यांना गीता काय, रामरक्षा काय तोंडपाठ आहे, आणि या सर्वांची गंमत म्हणजे जुन्याकाळचे आचारविचार

ही मंडळी विसरलेली नाहीत, विसरण्याची शक्यता नाही आपल्या मुलाबाळांनीसुद्धा या गोष्टींची आठवण ठेवावी म्हणून याची सतत धडपड असते. शरीराने अमेरिकेत असलेली ही सारी मंडळी मनाने, वृत्तीने सतत भारतातच असतात अर्थात यात त्यांचाही काही दोष नाही म्हणूनच आपल्या घरात दिवाळीला गोडधोड करण्यासाठी इंडियन ग्रोसरी स्टोअर-मधून बासुंदीचा बेडेकर मसाला आणि ओले नारळ आणतात, वीकएंडच्या एखाद्या शनिवारी त्या त्या गावातील ही सर्व मंडळी एकत्र येतात गप्पा होतात. गप्पांचे विषय चौफेर असतात फुटबॉलच्या गेमची चर्चा रंगते. मेलबीन ब्रुक्सचा 'हाय ॲन्क्झायटी'ची कथा कोणी रगवून सांगतो. मग माणसे पूर्व पदावर येतात जनता पार्टीच्या पडझडीची चर्चा सुरू होते मराठी नाटकांच्या गोष्टी निघतात आणि मुंबई-एक दिनांक नुकतेच मला मेहुण्याने मुंबईहून पाठविले असे कोणीतरी अभिमानाने सांगतात प्रत्येकजण मग आपले मन ठामपणे मांडतो, आजुबाजूचे वातावरण सोडले तर सारी माणसे भारतातच गप्पा मारीत असतात नुकतेच पुण्याहून आलेले पाध्ये तिथे पाहिलेल्या नाटकांची चर्चा करीत असतात. सर्वजण खुलले असतात. रात्रीचे साडेदहा अकरा वाजतात.

'निघायलाच हवं! घरी पोहचता पोहचता बारा वाजतील.' सौ. गाडगीळ दिवाणखान्यात येऊन वर्दी देतात आणि बाजूच्या खोलीत जमलेल्या मुलांना बोलवायला जातात

'कोणीच यायला तयार नाही' त्या परत येऊन सांगतात.

'अहो इतक्यात कोणीही टी. व्ही. सोडणार नाही. JAWS चालू आहे' कोणीतरी म्हणते. मुलंमुली JAWS मध्ये रंगलेली असतात. त्यांना JAWS सोडवत नाही व आम्हाला 'कस्तुरी मृगाची' चर्चा सोडवत नाही. मुलांना 'कस्तुरीमृगात' बिलकुल इंटरेस्ट नाही. त्यांना डिस्को हवा असतो, लीफ गॅरेटचे संगीत हवे असते, डायना सॉमर्सचा बलदंड आवाज त्यांना प्रिय असतो तर जॉन ट्रिव्होल्टासारखा डान्स करण्याची त्यांची ख्वाईश असते. पिढीमधले हे अंतर असते, ते नैसर्गिक आहे. त्यात कृत्रिमपणाचा अशही नसतो.

आईवडील भारतीय असतात, त्यांची मुलंमुली अमेरिकन व्हायचा प्रयत्न करीत असतात शारीरिक ताकदीने, अमेरिकन तरुणाइतके हे बलवान नसतात पण सर्वचजण अमेरिकन उच्चाराचं इंग्रजी बोलतात, मराठी भाषा साधारणपणे कोणालाच येत नाही सर्वच जण जीन्स घालतात व स्पायडर मॅनचा मुखवटा असलेला टी शर्ट घालतात कधीमधी पाचसात वर्षात एकदा ते भारतात गेलेले असतात तेथे त्यांच्या आईवडिलांचे, त्यांचे स्वतःचे खूप कौतुक झालेले त्यांना आठवते तेथील धूळ त्यांना आवडली नाही, जिकडे तिकडे माणसेच माणसे दिसलीत कारच्या समोर एखादी म्हैसही येऊ शकते तेव्हा त्यांना नवल वाटले, त्यांच्या तब्येतीची आईवडिलांनी फार काळजी घेतली मावशीच्या घरचे कांद्याचे भजे फार आवडले पण ते तळकट म्हणून डॅडींनी मना केलेत तर आत्याच्या घरचा थालीपीठाचा पहिला घासच कहीतरी नवीन चव जिभेवर ठेवत गेला पण हे काही आमच्या मुलांना आवडणार नाही म्हणून ममी नाही म्हणाली. खाण्याची इच्छा होती, पण ममी आणि डॅडींच्या विरुद्ध बोलण्याची कोणाची इच्छा दिसली नाही. सर्वजण त्यांच्याशी अगदी आदराने बोलत होते. डॅडींचे डॅडीसुद्धा आपल्याशी किती प्रेमाने वागायचे आणि निघण्यापूर्वी त्यांच्या डोळ्याना किती वेळा पाणी आलं होतं! थोडक्यात म्हणजे ही मोठ्या घरची मुलं आहेत म्हणून त्यांना सन्मानाने वागविण्यासाठी सर्व झटत होते. सर्व ठिकाणी त्यांना VIP ट्रीटमेंट मिळाली होती. हे सारे या मुलामुलींना आठवते

अटलांटाच्या एक लेखिका उमा मुजुमदार यांनी जवळपास पन्नास भारतीय मुलामुलींना प्रश्न विचारून निरनिराळ्या प्रश्नावरील त्यांचे मत विचारले. ही सर्व मुलंमुली तेरा ते वीस या वयोगटातील होते. कोडकौतुक होते म्हणून भारतात जावेसे वाटते पण रहावे मात्र अमेरिकेतच असे सर्वांचे मत पडले अमेरिकन मुलामुलींवर त्यांचे आईवडील जितका विश्वास टाकतात तितके आपले टाकीत नाहीत ही व्यथा बहुताशी मुलामुलींनी मांडली. विश्वास टाकण्याचा हा प्रश्न फारच नाजूक आणि भावनात्मक आहे दिवेलागणीच्या आधी घरी परत आलेच पाहिजे असे

ज्यांच्या लहानपणी दडक होता त्या स्वातंत्र्य स्वातंत्र्य म्हणून जास्तीत जास्त किती सवलत देणार ? दिवेलागणीच्या नतर आणखी दोन तीन तास ? पण रात्री दहापर्यंतही त्याची लाडकी लेक घरी परत आली नाही तर विन्नाताईंनाच काय रमेशरावानादेखील झोप यायची नाही. क्षणभर एकमेकाची समजूत काढतील पण हे त्याना मानवणारे नाही एवढे मात्र खरे! खरे म्हणजे पहिल्या पिढीला हा त्रास. हे मानसिक आघात सहन करावे लागणार आहेतच ही लाडकी लेक आई झाल्यावर, आजी झाल्यावर परिस्थिती बदलेल तिचे बालपण अमेरिकेत गेले आहे त्यामुळेच तिची लेक रात्री केव्हाही कुलूप उघडून आत आली तरी ती फारसे मनावर घेणार नाही पण या साऱ्या गोष्टींना वेळ लागेल कमीत कमी पन्नास साठ वर्षांचा कालावधी गेल्याशिवाय सपूर्ण अमेरिकन वृत्तीची ही पिढी तयार होणार नाही. हे सारे होईस्तो एकविसाव्या शतकाचे डोके पांढरे झाले असेल.

बहुतांशी तरुण मुलांना भारतीय मुली फारच लाजाळू वाटतात तर बहुतेक सर्वच मुली म्हणतात आपली मुले म्हणजे अगदी शांत, सभ्य अमेरिकन मुलासारखी धसमुसळी नाहीत किंबहुना आपल्या कुठल्याच भावना निःसंकोचपणे ते सांगू शकत नाहीत अर्थात लग्नच करायचे झाले तर मात्र आपल्याला अमेरिकन नवरा चालणार नाही असे यांचे म्हणणे आहे.

आपल्या मुलींचे पुढे काय हा येथे सर्वांना भेडसावणारा प्रश्न आहे. अगदी भारतीय पद्धतीप्रमाणे ‘ दाखविणे ’ आपल्या लेकींना पचण्यासारखे नाही याची सर्वांना जाणीव आहे ओरिसातून आलेली मंडळी दरवर्षाला एक समेलन घेतात. वडिलधारी मडळी जावईशोध घेतात. कोणाचा होतकरू मुलगा लग्नाचा आहे याची माहिती येथे मिळवितात. काही मंडळी मात्र उन्हाळ्याची सुटी लागली की आपल्या मुलीला घेऊन भारतातच येतात वडिलांचे ‘ डॉलर्स ’ आणि मुलीचे अमेरिकन उच्चार ’ यामुळे इकडच्या भल्यामोठ्या घराण्यातला डॉक्टर किंवा इंजिनियर नवरा मिळविणे फारसे कठीण नाही. अर्थात वयाची वीस वर्षे तिकडे राहिलेल्या या मुली ‘ सुना ’

म्हणून इकडे कशा राहत असतील हा एक संशोधनाचा विषय होईल. गमत म्हणजे अशी मौलिक सासुरवाडी मिळाल्यावर जावईबोवा आईवडिलाना रामराम ठोकून सरळसरळ अमेरिकेत कायमचे राहणे पसत करतात.

उपवर तरुणांची व्यथा या मुलींपेक्षा थोडी काकणभर जास्तच आहे. अमेरिकन विद्यापीठात Ph. D. वगैरे करायचे. त्यानतर एकदोन वर्षं नोकरी करून भारतात येण्यासाठी पैसे शिल्लक ठेवायचे व तेथे जाऊन वधूसंशोधन करायचे म्हणजे पाहाता पाहाता वयाची तिशी येते. लग्नाच्या बाजारात खरे म्हणजे डिग्रीइतकच वयालाही महत्त्व आहे. इकडे यावे तर आपल्याबरोबर इटरसायन्सला असलेल्या सान्या कॉलेजक्वीन्स आपल्या तीन चार वर्षांचा मुलाचा हात धरून फिरताना दिसतात. बरे अमेरिकेत इतके वर्षे राहिलेल्या इतक्या qualified माणसाकडेसुद्धा ‘अमेरिकेत इतकी वर्षे होता ! त्याची काय गॅरेंटी घेता !’ म्हणून पचवीस वर्षांपूर्वी इग्लडहून Ph D घेऊन आलेले होतकरू सासरेबुवासुद्धा शकाकुल होतात. खरे म्हणजे तसे काही नसते. एकतर अमेरिकन मुली ताडमाड वाढलेल्या पुरुषासारख्या धिप्पाड गप्पा कधीकधी होतात पण त्यांच्या सहाफुटी बॉयफ्रेंडसमोर आपला फारसा प्रभाव पडत नाही. बरे नुसत्या बुद्धिमत्तेवर भाळणाऱ्या त्या काही आपल्याइकडच्या कादबरीच्या नायिका नव्हेत. माझ्या विद्यापीठात वीस पंचवीस भारतीय विद्यार्थी-विद्यार्थिनी होते सपूर्ण दोन वर्षात कुठल्याही एका मुलाला मी सतत अमेरिकन मुलीबरोबर हिंडताना पाहिले नाही. चारपाच मुलीही होत्या पण त्याही भारतात असल्यासारख्या आपला एक लहानसा गट करून चबुतऱ्यावर बसलेल्या दिसायच्या. तिकडे म्हणजे प्रत्येक अमेरिकन मुलाच्या बाजूला त्याची मैत्रिण व दोघे आपल्याशीच दग. आजुबाजूची फारशी तमा नाही त्यामुळे हिंदी सिनेमात जी दृश्ये सेन्सॉरच्या कात्रीतून वाचणार नाहीत ती येथे विद्यापीठाच्या प्रागणात सजीव झालेली असतात, जीवत झालेली असतात.

काही मुले मात्र तिकडून आल्यानतर उगाच ‘भाव’ खातात. सतत अमेरिकन उच्चाराचे इंग्रजी बोलतात, मराठी विसरल्याचा आव आणतात

आणि आपण काहीतरी मोठे झाल्याच दाखवतात. गमत म्हणजे अशा या सुपुत्राकडे पाहून आईवडिलांनाही धन्यता वाटत असावी कारण त्याचे-बरोबर खूप खूप श्रीमंत घरच्या मुली पाहण्याच्या कार्यक्रमाला ही सारी मंडळी जातात अमेरिकेत साधीभोळी राहणारी ही मंडळी मुंबईला उतरल्याबरोबर का बदलतात हे मला तरी अजून समजले नाही तिकडे लग्न आटोपून हे परत येतात आणि आपण इतक्या मोठ्या माणसाचे जावई झालो हे सांगत राहतात अमेरिकेत पाच सहा वर्षे राहूनही अशा गोष्टीतच ज्याना रस आणि अभिमान वाटतो तेही माझ्यामते एका अर्थाने मनाने भारतातच राहतात

तशी ही तरुणमंडळी भारतात हुषार विद्यार्थी असतात. सर्वजण मॅट्रिकला पहिल्या दहात असतात व एम. ए किंवा एम एससी. ला पहिल्या तिघात ! आठ वर्षे अमेरिकेत राहूनही प्रदीप लहानपणी पाठ केलेले गगालहरीचे एक अक्षरही विसरला नाही तर पाध्ये गणेशचतुर्थीला अगदी खड्या आवाजात गणपती अथर्वशीर्ष पाठ म्हणून दाखवितात आणि मागील बारा वर्षात भारतात न आलेला पुण्याचा राहणारा प्रभू मराठ-वाड्यातील देगलूर उदगीर ही गावे विसरला नाही, आणि नागपूरहून मुबईला जाताना लागणारी टिमटाला, काटेपूर्णा, भादली, म्हसावद सारखी स्टेशनेसुद्धा त्याच्या लक्षात आहेत याचे खरे कारण म्हणजे मुळात ही मडळी हुषार आहेतच. म्हणूनच संपूर्ण नवीन वातावरणात राहून ह्यानी Ph D. मिळविलेली असते. पाच-सात वर्षे आईवडिलांपासून अगदी वेगळ्या सांस्कृतिक वातावरणात राहूनही अभ्यासात ही सारी मडळी अमेरिकन मित्रांच्या पुढे असतात ही सारी तपश्चर्या ते करतात पण येथे राहून RTO किंवा Incometax च्या ऑफीसमध्ये इन्स्पेक्टरची नोकरी असलेल्या तरुणाइतकीदेखील किंमत त्यांना लग्नाच्या बाजारात नसावी ही अगदी चिंतनीय बाब आहे तो अमेरिकेत राहूनही बिघडला नाही ह्याचा दाखला आईवडिलांना पदोपदी द्यावा लागतो व चांगल्या शिकल्या सवरलेल्या मुलीही त्याच्या स्पष्टवक्तेपणाला, उथळपणाला मानतात व असा पती स्वीकारीत नाहीत.

तिकडून निघणाऱ्या ' इंडिया ॲब्रॉड ' या साप्ताहिकात अखिलानंद झा नावाच्या लेखकाचा ' Brain drain a myth ' हा लेख प्रसिद्ध झाला होता. त्याच्यामते खुराना, चंद्रशेखर यांचेसारखे थोर वैज्ञानिक किंवा झुबेन मेहतासारखे थोर पियानोचे कंडक्टर सोडलेत तर बाकीची तेथे राहणारी मंडळी सर्वसाधारण आहेत. ती येथे राहिली काय किंवा तेथे राहिलेत काय ते सारखेच त्यांच्या येथून जाण्याने आपली कुठलीही हानी होत नाही. वरवर पाहता झाचा हा युक्तिवाद अगदी बिनतोड वाटतो पण तो बराचसा फसवा आहे अगदी नोबेल प्राइझ मिळाल्याशिवाय तो मनुष्य विद्वान आहे हे आम्ही मानणारच नाहीत तर मग अगदी अमेरिकेतदेखील शंभराच्या आसपासच विद्वान मंडळी आहेत! मागे एकदा तेथून निघणाऱ्या ' केमिकल एज्युकेशन ' या मासिकात एका थोर शास्त्रज्ञाने एक मूलभूत विचार मांडला होता. त्याच्यामते फॅरेडे, बोहर, आइनस्टाइन या थोर वैज्ञानिकाइतकेच साधे शोध लावणाऱ्या शास्त्रज्ञानीदेखील विज्ञानाच्या प्रगतीला हातभार लावला आहे व तो आपणाला विसरून चालणार नाही त्या थोर वैज्ञानिकाचे हे मत ग्राह्य मानले तर मग झाच्या विचाराचा फोलपणा जाणवतो. अमेरिकेतील चांगल्या विद्यापीठात प्रोफेसर असलेले भारतीय आपण braindrain चा विचार करताना विचारात घेणार आहोत किंवा नाही ? NASA मध्ये अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात मग्न असणारे भारतीय कुठल्या सदरात मोडतील ? आणि वैचारिक पुस्तके लिहून अमेरिकन विद्वानांच्या तोडीस तोड असलेली ही मंडळी काय, आपण त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले नाही म्हणून अगदी जमेसच धरायची नाहीत ? मी तर म्हणेन सतत पहिला नंबर असलेली ही व्यक्ती परदेशात जाऊन कायमचे वास्तव्य करते ही आपल्या दृष्टीने हानीकारक आहे, तो निश्चितच loss आहे आणि म्हणूनच ती काळजी करण्यासारखीच गोष्ट आहे

झाचा दुसरा एक मुद्दा आहे आपल्या योग्यतेपेक्षा खालच्या जागेवर ही भारतीय मंडळी काम करतात असं झा म्हणतात यात ' योग्यता ' ठरवायची कुणी व कशी याबाबत मात्र झा मौन पाळतात, आपल्याकडचा माझ्यासारखा विद्यापीठातील प्रपाठक तेथे पोस्ट डॉक्टरल रिसर्च फेलोशिप

घेऊन जातो तो येथील विद्यापीठास सध्या ज्या जागेवर आहे त्याच जागेवर जाऊन काम करीत नाही ह्याच कारण असं की प्रत्येक क्षेत्रात मोजमाप करण्याची त्याची पद्धत आपल्यापेक्षा भिन्न आहे तन्त्रज्ञानाच्या प्रचंड वेगाने त्याचे सर्व जीवनच कॉम्प्युटरमय झाले आहे. म्हणून आपल्याकडचा डॉक्टर तेथे गेल्याबरोबर 'डॉक्टर' म्हणून काम करू शकत नाही, त्याला आधी Residency च्या परीक्षा द्याव्या लागतात यात विषाद वाटण्यासारखे काही नाही. आपल्याकडून शिकलेली ही मंडळी जातात ते सर्व तेथेही चांगले यश मिळवितात, यावरूनच आपण त्यांच्यापेक्षा कुठल्याही अंशाने कमी नाही फक्त आपल्या training मध्ये काही त्रुटी आहेत, उणीवा आहेत त्या आपण भरून काढायला हव्यात.

शिकागोला एका श्रीमंत वस्तीत राहणारे भारतीय डॉक्टर आहेत त्यांची प्रॅक्टीस वर्षाला एक लाख डॉलर्स इतकी म्हणजे प्रथितयश अमेरिकन डॉक्टराच्या तोलामोलाची आहे. ह्रा त्यांना भेटलेत व आपल्या प्रॅक्टीसचे रहस्य काय असे त्यांना विचारले माझे सर्व पेशंटस श्रीमंत पण वयस्कर अमेरिकन असतात मुलाबाळापासून ते वेगळे राहतात. नातूपणतूंची त्यांना सतत आठवण येत असते पण भेट होते नसते त्यामुळेच ते एकटे असतात अगदी terribly lonely, त्याना त्यांचे दुःख, व्यथा ऐकणारे कोणीतरी हवे असतात. मी डॉक्टर म्हणून त्यांना वैद्यकीय सल्ला तर देतोच पण त्यांच्याशी चार घटका बोलतो बसतो. यामुळेच माझेवर त्यांचा लोभ आहे, असे आपले भारतीय डॉक्टर म्हणालेत

अमेरिकेतील एकटेपण हा अगदी स्वतन्त्र विषय होऊ शकतो तेथे गेल्याच्या पहिल्याच शनिवारची गोष्ट घ्या टी. व्ही आणला होता पण अजून तो interesting वाटत नव्हता टेलिफोन होता पण फोन कुणाला करायचा ? ओळखीचे कोण होते ? सकाळचे नऊ वाजले असावेत पण आजुबाजूला नीरव शांतता होती घराच्या काचेच्या खिडक्या बंद होत्या अपार्टमेंट complex मधील इतर भाडेकरू अगदी निवांत झोपल्यासारखे होते. रस्त्यावर चिटपाखरू नव्हते मधूनमधून कार्स पळत होत्या. भारतातील मित्रांना एक दोन पत्रे लिहिलीत, लिहिलेली पत्रे पुनःपुनः चारपाच

वेळा वाचून पाहिली मनुष्य खऱ्या अर्थाने होमसिक होतो तो अशा वेळेस.
पुस्तके होती पण एक दोन पाने वाचून ती बाजूला ठेवली मग उगाच
स्नान करण्यात एक तास घालविला सर्व आटोपले होते आणि दुपारचे
फक्त बारा वाजले होते. संपूर्ण दिवस आ वासून माझ्या समोर उभा होता.
झोप देखील येत नव्हती. सोफासेटवर सुन्न होऊन मी बसलो होतो मग
सहज डिरेक्टरी उचलली कुळकर्णी, देशपांडे ही आपली 'सामान्य'
नावे लगेच एक देशपांडे सापडले त्यांना फोन केला ते नागपूरचेच
निघाले ते म्हणालेत तुमचा पत्ता सांगा. मी तुम्हाला घ्यायला येतो ते
आले मैत्री वाढली पुढे मग कधीही फारसे कंटाळवाणे झाले नाही
त्यांच्यामुळे आणखी मित्र मिळत गेलेत

विद्यार्थी म्हणून अमेरिकेत गेलेल्या भारतीय तरुणांना हा एकांतवास
चांगलाच तापदायक असतो तेथे गेल्या गेल्या परीक्षा द्याव्या लागतात
इकडे नेहमी सत्तर टक्के मार्कस् मिळणाऱ्यांना तेथील वेगळ्या परीक्षा
पद्धतीमुळे वीस पंचवीसच्यावर गुण मिळत नाही अशावेळेस तुमचे दुःख
ऐकणारे कोणी नसतात मुख्य म्हणजे तुम्हाला आत्मविश्वास देणारे
आईवडील नसतात मग त्यांची आठवण येते आणि दहा हजार मैलाचे हे
अंतर भेडसावीत राहते. अमेरिकेच्या वास्तव्यातील पहिले तीन चार महिने
फार महत्त्वाचे नवीन घरात सोशीकपणे वापरून आपले स्थान निश्चित
करणाऱ्या नववधूसारखे हे व्रत आहे यश पचविणे जितके कठीण,
त्यापेक्षा कैकपट अपयश पचविणे कठीण असते ही अपयशी मुले मग
उगाच दारूच्या प्याल्यात आपले अपयश विरघळण्याचा प्रयत्न करतात.
अपयश वाढत जाते आणि त्याला विरघळण्यासाठी दारूचे हे प्याले मोठे
होत जातात. अशा या अपयशी व्यक्ती वर्षाच्या आतच खालच्या मानेने
परत येतात. अर्थात त्याची संख्या फारशी नसावी माझ्या मते हे अपयश
हा सारा एकांतवासाचा परिणाम आहे माणसांच्या गुणांची, सत्वृत्तीची
वाढ होण्यास आजुबाजूची परिस्थिती फार महत्त्वाची असते. 'सागरा प्राण
तळमळला' याची आर्तता आणि खोली मला अमेरिकेच्या वास्तव्यात
समजली. आठ ते दहा जून १९७६ ला त्यावेळेसचे पंतप्रधान मोरारजी

घेऊन जातो तो येथील विद्यापीठास सध्या ज्या जागेवर आहे त्याच जागेवर जाऊन काम करीत नाही ह्याच कारण असं की प्रत्येक क्षेत्रात मोजमाप करण्याची त्यांची पद्धत आपल्यापेक्षा भिन्न आहे तंत्रज्ञानाच्या प्रचंड वेगाने त्यांचे सर्व जीवनच कॉम्प्युटरमय झाले आहे म्हणून आपल्याकडचा डॉक्टर तेथे गेल्याबरोबर 'डॉक्टर' म्हणून काम करू शकत नाही, त्याला आधी Residency च्या परीक्षा द्याव्या लागतात. यात विषाद वाटण्या-सारखे काही नाही! आपल्याकडून शिकलेली ही मंडळी जातात ते सर्व तेथेही चांगले यश मिळवितात, यावरूनच आपण त्यांच्यापेक्षा कुठल्याही अंशाने कमी नाही फक्त आपल्या training मध्ये काही त्रुटी आहेत, उणीवा आहेत त्या आपण भरून काढायला हव्यात

शिकागोला एका श्रीमंत वस्तीत राहणारे भारतीय डॉक्टर आहेत त्यांची प्रॅक्टीस वर्षाला एक लाख डॉलर्स इतकी म्हणजे प्रथितयश अमेरिकन डॉक्टराच्या तोलामोलाची आहे. ज्ञा त्यांना भेटलेत व आपल्या प्रॅक्टीसचे रहस्य काय असे त्यांना विचारले, माझे सर्व पेशंटस श्रीमंत पण वयस्कर अमेरिकन असतात मुलाबाळापासून ते वेगळे राहतात नातूपणतूंची त्यांना सतत आठवण येत असते पण भेट होते नसते त्यामुळेच ते एकटे असतात अगदी terribly lonely, त्यांना त्यांचे दुःख, व्यथा ऐकणारे कोणीतरी हवे असतात. मी डॉक्टर म्हणून त्यांना वैद्यकीय सल्ला तर देतोच पण त्यांच्याशी चार घटका बोलतो. बसतो. यामुळेच माझ्यावर त्यांचा लोभ आहे, असे आपले भारतीय डॉक्टर म्हणालेत

अमेरिकेतील एकटेपण हा अगदी स्वतंत्र विषय होऊ शकतो तेथे गेल्याच्या पहिल्याच शनिवारची गोष्ट ह्या टी. व्ही आणला होता पण अजून तो interesting वाटत नव्हता. टेलिफोन होता पण फोन कुणाला करायचा ? ओळखीचे कोण होते ? सकाळचे नऊ वाजले असावेत पण आजुबाजूला नीरव शांतता होती घराच्या काचेच्या खिडक्या बंद होत्या अपार्टमेंट complex मधील इतर भाडेकरू अगदी निवांत झोपल्यासारखे होते. रस्त्यावर चिटपाखरू नव्हते मधूनमधून कार्स पळत होत्या. भारता-तील मित्रांना एक दोन पत्रे लिहिलीत, लिहिलेली पत्रे पुनःपुनः चारपाच

वेळा वाचून पाहिली मनुष्य खऱ्या अर्थाने होमसिक होतो तो अशा वेळेस. पुस्तके होती पण एक दोन पाने वाचून ती बाजूला ठेवली मग उगाच स्नान करण्यात एक तास घालविला. सर्व आटोपले होते आणि दुपारचे फक्त बारा वाजले होते संपूर्ण दिवस आ वासून माझ्या समोर उभा होता झोप देखील येत नव्हती. सोफासेटवर सुन्न होऊन मी बसलो होतो मग सहज डिरेक्टरी उचलली. कुळकर्णी, देशपांडे ही आपली सामान्य नामे लगेच एक देशपांडे सापडले त्यांना फोन केला ते नागपूरचेच निघाले ते म्हणालेत तुमचा पत्ता सांगा मी तुम्हाला घ्यायला येतो ते आले मैत्री वाढली पुढे मग कधीही फारसे कंटाळवाणे झाले नाही. त्यांच्यामुळे आणखी मित्र मिळत गेलेत

विद्यार्थी म्हणून अमेरिकेत गेलेल्या भारतीय तरुणांना हा एकांतवास चांगलाच तापदायक असतो तेथे गेल्या गेल्या परीक्षा द्याव्या लागतात. इकडे नेहमी सत्तर टक्के मार्कस् मिळणाऱ्यांना तेथील वेगळ्या परीक्षा पद्धतीमुळे बीस पंचवीसच्यावर गुण मिळत नाही अशावेळेस तुमचे दुःख ऐकणारे कोणी नसतात मुख्य म्हणजे तुम्हाला आत्मविश्वास देणारे आईवडील नसतात. मग त्याची आठवण येते आणि दहा हजार मैलांचे हे अंतर भेडसावीत राहते अमेरिकेच्या वास्तव्यातील पहिले तीन चार महिने फार महत्त्वाचे नवीन घरात सोशीकपणे वापरून आपले स्थान निश्चित करणाऱ्या नववधूसारखे हे व्रत आहे यश पचविणे जितके कठीण, त्यापेक्षा कैकपट अपयश पचविणे कठीण असते. ही अपयशी मुले मग उगाच दारूच्या प्याल्यात आपले अपयश विरघळण्याचा प्रयत्न करतात अपयश वाढत जाते आणि त्याला विरघळण्यासाठी दारूचे हे प्याले मोठे होत जातात. अशा या अपयशी व्यक्ती वर्षाच्या आतच खालच्या मानेने परत येतात अर्थात त्याची संख्या फारशी नसावी. माझ्या मते हे अपयश हा सारा एकांतवासाचा परिणाम आहे माणसाच्या गुणाची, सत्वृत्तीची वाढ होण्यास आजुबाजूची परिस्थिती फार महत्त्वाची असते 'सागरा प्राण तळमळला' याची आर्तता आणि खोली मला अमेरिकेच्या वास्तव्यात समजली. आठ ते दहा जून १९७६ ला त्यावेळेसचे पंतप्रधान मोरारजी

देसाई आले होते. एबीसीच्या बार्बरा वॉल्टर्सने टी व्ही. वरील मुलाखतीत त्यांना प्रश्न केला होता, ' आणीबाणीच्या काळात तुम्हाला एकांतवासाची कैद होती, तेथे असताना तुम्हाला एकटे वाटले की नाही ?' देसाई पटकन उत्तरलेत, ' आपण या जगात केव्हाच एकटे नसतो, कारण परमेश्वर नेहमीच आपल्या सोबतीला असतो ! बार्बराला हे कितपत समजले किंवा पटले असावे ते सागता येत नाही पण मला ते म्हणणे अगदी सयुक्तिक व अचूक वाटले

काही भारतीय मडळी आपण ' अमेरिकन ' झाल्याच्या गोड समजुतीने अमेरिकन जीवनाची नक्कल करतात पण सत्यप्रत ही केव्हाही पहिल्या प्रतीपेक्षा कमी प्रतीचीच असणार. अर्थात अशा व्यक्तींची सख्या फारशी नाही मायामीला जायचे म्हणून येथे पूर्वी विद्यार्थी असलेल्या व नुकत्याच अमेरिकेत ' सेटल ' झालेल्या शहांना फोन केला मी त्यांना आम्ही या या तारखेला तुमचेकडे आल्यास तुम्हास सोईस्कर होईल का ते विचारले तेव्हा typical अमेरिकन accent मध्ये ते फोनवर उत्तरलेत, ' Sorry Sir, We are expecting my wife's relation this weekend, I cannot certainly say anything about her programme for the next weekend I shall have to consult her before I say O K to you ' त्यांना उगीच पत्नीशी consult करण्याची तकलीफ नको म्हणून ' thank you so much ' असे म्हणून मी फोन खाली ठेवला.

आमच्या वहिनी सांगत होत्या कॅलिफोर्नियाला त्या ऑफिसच्या कामासाठी गेल्या होत्या. यजमान सकाळी म्हणालेत, ' आज सध्याकाळी गणेशचतुर्थीचा समारभ आहे. तुम्ही लवकर घरी या. तेथे बरोबर सात वाजताच्या आरतीला पोहचण्यासाठी निदान सहा वाजता आपल्याला निघायला हवे कारण चाळीस मैलाचा ड्राइव्ह आहे ' सध्याकाळी वहिनी घरी आल्यात तर नेहमी जीन्स घालणाऱ्या यजमानीणबाई अगदी बनारसी शालूत ! गळ्यात भरीव तन्मणी आणि कानात हिऱ्याच्या कुड्या, शिवाय कपाळावर मोठं कुकू आणि केसातही कुकवाची लाल रेष ! ' तुम्हाला

ही साडी चांगलीच खुलून दिसते हो' काहीतरी बोलायचे म्हणून वहिनी म्हणाल्यात

चॅनेल ५ चा सेंट साऱ्या अंगावर स्प्रे करताना बाई थोड्याशा कडवटपणे उत्तरल्यात, 'मागच्या वर्षी भारतात गेलो तेव्हा बनारसला नऊशे रुपयाला घेतली खरे म्हणजे लग्नातच घ्यायला हवी होती पण अशोकचे आईवडील एक नंबरचे चिक्कू.' सासरच्या माणसांचा राग दहा हजार मैलावरदेखील कायम होता ! अशोक वेळेवर आला कारने सर्व निघालेत संपूर्ण कार नुसत्या सेंटने भरून गेली होती

गणेशचतुर्थीच्या त्या शुभप्रसंगी सर्वच बाया साडीत होत्या व एकदोन पुरुष अगदी पायजमा व नेहरू शर्ट घालून आले होते वहिनी IBM मध्ये मोठ्या अधिकारी शिवाय त्यांना नटवेपणाचा भारी राग ऑफिसमध्ये साडी घालून जातात तीच साडी घालून त्या अशा प्रसगात. यामुळेच बायाना त्यांच्यात काहीच interest नव्हता. त्या आपल्या शांत बसून गप्पा ऐकत होत्या

आरतीची वेळ झाली यजमानीण बाईंनी पर्समधून आरसा काढून लीपस्टीकची कांडी ओठावर फिरविली पर्स बद केली केसांचा बॉब उगाच ठीक केला आणि सर्वांना ऐकू जाईल अशा आवाजात म्हणाल्या, 'अशोक शू बाहेर काढ हो, देवाची आरती करायची आहे' वहिनींना हसू आलं.

'काय वहिनी ? तुम्हाला फारसा interest आलेला दिसत नाही.' परतताना अशोक विचारीत होता

'तुम्ही म्हणता ते खर ! माझे interest वेगळे आहेत.' वहिनी उत्तरल्यात.

वहिनीचे हे असे आहे. घरातल वातावरण अगदी प्रसन्न आणि साधे ! आग्रह करून वाढतात आणि तुम्ही मॅनहॅटन पाहून या मी फर्स्टक्लास बटाटेवडे व शिरा करून ठेवते म्हणून सांगतात व महत्त्वाचे म्हणजे आल्या-वर तावडतोब पान मांडतात. खूप गप्पा करतात पण ॲकडेमिक प्रेसने स्वतःची दोन पुस्तके प्रसिद्ध केलीत व बऱ्याचशा अमेरिकेतील विद्यापीठात

स्टॅटिस्टिक्स या विषयासाठी एक पुस्तक textbook म्हणून लावले आहे हे कधीही सांगत नाही. ते आमचा भाऊही सांगत नाही ते कळले त्याच्या शेल्फवरची पुस्तके चाळली तेव्हा !

मला अमेरिकेत भेटलेली बहुतांशी माणसे ही अशीच प्रेमळ व साधीभोळी होती. अटलांटाचे कोल्हे, विजय देशपांडे, राऊत, तांबे, भोळे, कुळकर्णी, डॉ भूमकर, भार्गव ही एकजात घरगुती माणसे. सहज त्यांना फोनवर सांगावे आज जरा कंटाळा आला तर फोनवरच रमेश देशपांडे सांगणार, ' या जेवायला या, संकोच करू नका पद्मा स्वयंपाक करते आहे. चिकन आहे आणि मुख्य म्हणजे बीयरचा स्टॉक आहे.' तांबे तर लहान भावासारखे ! अमेरिकन बॉलगेम त्यांनीच समजावून दिला आणि अमेरिकन समाजाचे वैचारिक विश्लेषण त्यांनीच केले डॉ. सौ. प्रज्ञाताई तांबे यांना सुहासिनीने मुलाला थोडे temperature आहे सांगितले की फोनवरच त्या symptom विचारतील tablets सांगतील काही काळजी करू नका म्हणून सांगतील व न चुकता दर दोन तासांनी फोन करत राहतील या सर्वांची ना इकडची ओळख ना आधीची मैत्री या सर्वांनी आमचे जीवन फार सुखी केले यांच्या प्रेमात आम्ही पडलो, तिकडे lab मध्ये टॉम, सीला, सॅंडीच्या प्रेमात पडलो म्हणूनच अमेरिकेच्याही प्रेमात पडलो हेच खरे !

सर्वांचे आईवडील अमेरिकेत एकदा तरी येऊन गेले आहेत एप्रिल ते सप्टेंबर महिन्यात आपलेकडील इतके वयस्कर पालक अमेरिकेत जातात की त्या काळात एअर इंडियाच्या जम्बोमध्ये कमीतकमी पचवीस टक्के प्रवासी साठीच्या पुढील वयाचे असतात ! या सर्वांना न्यूयॉर्कच्या केनेडी एअरपोर्टवर घेण्यास सारी तरुणमंडळी आलेली असतात. हिंदी सिनेमातल्या हिरोसारखं 'माँ'चा हबरडा कोणी फोडत नाही पण आई-वडिलांच्या भेटण्याने सर्वांनाच झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येतो. अमेरिकेत असूनही सॅंड्राचे आईवडील तिला तीन चार वर्षात भेटले नाहीत किंवा मागील पाच वर्षांपासून स्टीव्ह आपल्या आईला भेटला नाही या पार्श्वभूमीवर आपला कौटुंबिक जिव्हाळा लक्षणीय दिसतो, वेगळा दिसतो.

कोणाचेही घरी कधीही कोणी अमेरिकन मित्र आल्याचे मला आठवत नाही. इतकेच काय सुरवातीचे आठ दिवस मी प्रोफेसर हॉफकिन्स याचे घरी राहत होतो त्या काळात त्यांचेकडेदेखील एकही मित्र आलेला मला आढळला नाही. मित्राकडे सहज गप्पा मारायला जाण्याची तेथे परंपरा नसावी भारतीय मंडळी म्हणूनच वेगळी वाटतात, जपानी वेगळी वाटतात तर मेक्सिकनाचे बोलणेही वेगळ्याच धाटणीचे असते. ही सर्व मंडळी आपआपले लहान लहान गट करून या प्रचंड देशात राहतात शिकागोसारख्या मोठ्या शहरात भारतीय माणसे आपले प्रांतीय गट करून राहतात महाराष्ट्र मंडळात अगदी मंगळागौरीचे हळदीकुंकू असते तर बंगाल्यांचा दुर्गा उत्सव दणक्यात साजरा होतो या साऱ्यात वेगळेपणाची जाणीव दिसते ही सर्व मंडळी आज तेथे राहत आहेत पण कायम तेथे राहण्याचा विचार ठामपणे कोणीही सांगत नाही रिटायर झालो की मांडवी नदीच्या काठी एखादा मोठा बंगला बांधून राहू असं स्वप्न राऊत पाहत आहेत, तर नागपूरच्या देशपांड्यांना रिटायर झालो की रामदासपेठेत राहायचं आहे, ते विद्यार्थी असताना ' जगत 'मध्ये चहा पीत होते तो पुनः पुनः प्यायचा आहे आपट्यांचे वडील वारकरी होते. म्हणून वडिलां-सारखच पैठणहून पंढरपूरला त्यांना रिटायर झाल्यावर वारीत चालत जायचे आहे.

म्हातारपणाचे एक व्यवच्छेदक लक्षण असते पन्नास वर्षांपूर्वीच्या घटना स्पष्ट डोळ्यासमोर उभ्या असतात मात्र कालपरवा घडलेल्या घटना आठवत नाहीत. हे सारं म्हणजे आपल्या जीवनातील आनंदाच्या क्षणांची उजळणी आहे, बालपणाचा तो रम्य काळ पुनः पुनः जगण्याचा प्रयत्न आहे तिकडे राहणारी ही सारी साधीभोळी, प्रेमळ मंडळी त्याची विद्यार्थी-दशा, पुनः पुनः आठवीत असतात

आपण जितके दूर असतो तितके आपले प्रेम वाढते म्हणूनच की काय दहा हजार मैल दूर राहणाऱ्या या सर्वांचे त्यांच्या आप्तेष्टांवरील प्रेम निदान आपल्यापेक्षा कमीतकमी दहापट तरी असावे.

# ९. चटका लावून गेलेले प्रसंग

प्रिन्सिपॉल क्लोव्हरनी आम्हाला आत बोलाविले

मुलाच्या ॲडमिशनबाबत मी त्यांना विचारले

पासपोर्ट दाखविला

हा तुमचा मुलगा का ?'

होय' मी म्हणालो

What is your name ?'

Girish

From which place do you come ?"

उत्तर नाही....

पुनः पोच प्रश्न

उत्तर नाही. ..

अमेरिकेत येऊन मुलाला फक्त वीस दिवस झाले होते. प्राचार्यांचे इंग्रजी उच्चार मुलाला समजले नसावे. इतके साध इंग्रजी ज्याला येत नाही त्याला मी काय ॲडमिशन देणार ? असे प्राचार्य म्हणतील असं मला वाटलं.

— कारण इकडचा अनुभव जमेस होता. प्राचार्य खुर्चीतून उठलेत मुलाच्या समोर ते चक्क गुडघ्यावर बसलेत मुलाला जवळ घेतल आणि हळूवार आवाजात म्हणाले,

'You are a nice boy. You come from a great country I had seen Delhi, it is very beautiful Now tell me from which place you come from ?'

Aurangabad'

'Good. he is a smart fellow.'

त्यानंतर प्राचार्यांना भेटणे काही जमले नाही
पण ती भेट सतत जीवत राहिली.

' Big Star ' एक ग्रोसरी स्टोअर
शुक्रवारची सध्याकाळ म्हणून गर्दी.
माझ्या समोर एक धडंदाड ' काळा ' मनुष्य
साधारण चाळीशीचा.
' मी तुला पुष्कळ वेळा पाहतो, कुठला तू ?'
मी भारताचा
' सुदर देश तुझे कुटुंब कुठे ?'
' मी येथे एकटा (alone) आहे ' (I am alone here)
एकटा ! तू एकटा नाहीस आम्ही सर्व तुझ्याबरोबर आहोत.'
(Alone ? You are not alone. We all are with you)
स्वारी लगबगीने बाहेर पडली

तेच ग्रोसरी स्टोअर
सामान गाडीत आम्ही सर्व कॅशियरच्या लेनमध्ये
' तुझी मुलगी फार क्युट आहे ' मागचा पन्नाशीचा मनुष्य सांगत होता
' आभारी आहे '
' तिला पाहिल आणि मला नातीची आठवण झाली.'
' साहजिक आहे '
' तिला मी चॉकलेट दिलेत तर तुम्हाला आवडेल का ?
' अवश्य '
तो आत गेला परत आला स्वतःचे पाकीट उघडले
दहा डॉलरची नोट काढली आणि ती मुलीच्या हातात कोंबली.
' हे काय ?'
' नाही सहज, माझे प्रेझेंट '
' माफ करा मला हे घेता येणार नाही. पैसे मी घेऊ शकत नाही '

'का ? काय हरकत नाही.'

'हरकत नाही पण नको.'

त्याची नोट मी परत दिली.

तो बाजूच्या कोपऱ्यात.

अक्षरशः हसमसून रडतो आहे.

मी त्याचे जवळ जातो.

'तुम्हाला मी दुखविले तर नाही ना ? माफ करा'

'नाही, ठीक आहे'

आमच्या दोघाच्याही सदिच्छा होत्या, पण त्या प्रसंगाने दोघेही नाराज झालोत.

अटलांटा एअरपोर्ट....

टॉमफेवर, मिस्टर आणि मिसेस बोस, देशपांडे, तात्रे एअरपोर्टवर आम्हाला पोहचविण्यास

टॉम अगदी गेटपाशी आला

त्याच्याशी मी शेकहँड केला. त्याने माझ्या मुलाला लहान भावासारखे जवळ घेतले

'आपण पुनः लवकरच भेटू' टॉम म्हणाला

'होय निश्चित, भारतात' मी उत्तरलो.

पाच पावले पुढे आलो.

सहज मागे वळून पाहिले.

टॉमच्या डोळयात अश्रू आले होते.

'कोस्टल गॉर्डचे' धाडसाचे काम करणारा टॉम पेपर नॅपकिनने डोळे पुसत होता.

आणि असाही एक प्रसंग—

सांताक्रूझ एअरपोर्ट–

'तुम्ही काहीच सामान आणलेले दिसत नाही'

'नाही'

'एखादा स्टिरिओ, कॅमेरा, रेकॉर्डर–तरी आणला असेल'

'नाही'

'तुम्ही खरेच अमेरिकेत गेला होता का ?'

'अर्थात, माझा VISA पहा....

'नाही, मला संशय आला, तुम्ही काय आणलं ?'

'आणले आहे'

'दाखवा, इतका विलंब का ? मागे लोक खोळंबले आहेत'

'मी जी गोष्ट आणली तिच्यावर मला वाटते टॅक्स नाही'

'कोणती ? चटकन सांगा'

'गोड आठवणी'–

– मी चालू लागलो.

REFBK-0024217